म. ग्रं. सं. ठाणे.
विषय इतिहास
सं. क्र. ३९७

# …ासनपद्धति

( मध्यवर्ती सत्तेचें वर्णन )

लेखक व प्रकाशक

गोविंद अनंत मोडक, बी. ए.

४१० नारायण पेठ, पुणें.

---

मुद्रक

गणेश काशिनाथ गोखले,

सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स; ४९५ शनिवार पेठ, पुणें.

---

१९२७

REFBK-0003425

---

किंमत दोन आणे.

# प्रस्तावना.

लोकमतास जबाबदार राज्यपद्धति हिंदुस्थानांत सुरू करणें हें आमचें ध्येय आहे असें १९१७त ब्रिटिश साम्राज्यसरकारनें जाहीर केलें व १९१९त त्या वचनास अनुसरून जबाबदारीच्या स्वराज्याचा पहिला हप्ता हिंदुस्थानास दिला. यापुढें पुढील हप्ते मिळून लवकरच जनतेस जबाबदार असलेलें स्वराज्य येथें सुरू होईल असा रंग आहे अशा वेळीं इंग्लंडचा इतिहास वाचल्यानंतर हिंदी नागरिकास इंग्लिश लोकांच्या चळवळींचा जणूं परिपाक अशी जी त्यांची हल्लींची राज्यपद्धति तिच्या स्वरूपाची माहिती करून घेण्याची इच्छा होणें अगदीं साहजिक आहे. तसेंच मुंबई विश्वविद्यालयानें 'स्कूल लीव्हिंग' परिक्षेच्या इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमांत नुकताच इंग्लंडच्या शासनपद्धतीचा अन्तर्भाव केला आहे. तेव्हां या दोन्ही दृष्टींनीं उपयोगीं पडेल असें इंग्लंडच्या शासनपद्धतीचें वर्णन तरुण विद्यार्थ्यांचा मगदूर व ग्रहणशक्ति ध्यानीं घेऊन शक्य तितक्या विस्तारानें या पुस्तकांत केलें आहे. शेवटीं सनदशीर इतिहासांतील महत्त्वाची सनावली, शासन-संस्थेसंबंधीं स्मरणीय वचनें, पारिभाषिक शब्द-कोश, व हल्लींच्या मंत्रिमंडळांतील मुख्य मुख्य मंत्र्यांच्या चरित्रांसह एकंदर मंत्र्यांची यादी, अशीं चार परिशिष्टें जोडिलीं आहेत. प्रो. द. वा. पोतदार व प्रो. रा. वि. ओतूरकर यांनीं या पुस्तकासंबंधीं महत्त्वाच्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. हा प्रयत्न उपयुक्त ठरेल व इंग्लंडचा इतिहास भाग पहिला व दुसरा या पुस्तकाची पुरवणी म्हणून हें **इंग्लंडच्या शासनपद्धतीचें वर्णन** महाराष्ट्रास ग्राह्य होईल अशी उमेद वाटते.

ज्येष्ठ शु॥ ६, रविवार शके १८४९ पुणें. **गो. अ. मोडक.**

---

## अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १. लोकशाहीचें युग ... | १ | २. राजपद. ... ... | ३ |
| ३. पार्लमेंट ... ... | १० | ४. कॉमन्स-सभा ... | १५ |
| ५. लॉर्ड्स-सभा ... | २३ | ६. पार्लमेंटची कार्यपद्धति ... | २८ |
| ७. मंत्रिमंडळ (क्याबिनेट) | ३५ | ८. इंग्लंडच्या शासनसंस्थेचें स्वरूप | ४६ |
| परिशिष्ट १ :—सनावली | ५१ | परिशिष्ट २ :—स्मरणीय वचनें | ५२ |
| परिशिष्ट ३ :—पारिभाषिक कोश | ५६ | परिशिष्ट ४ :—हल्लींचें मंत्रिमंडळ | ६४ |

REFBK-0003425

# इंग्लंडची शासनपद्धति.

## १. लोकशाहीचें युग.

१. **प्रातिनिधिक लोकशाही.** हल्लीं जगांतील बहुतेक देशांत लोकशाही शुद्ध वा शबल स्वरूपांत चालू आहे. अठराव्या शतकाच्या समाप्तीच्या सुमारास अमेरिकेंतील संस्थानें स्वतंत्र झालीं व त्यांनीं १७८९त प्रसिद्ध अमेरिकन लोकसत्ताक राज्य स्थापिलें. तसेंच त्या वर्षी फ्रान्सांत राज्यक्रांति होऊन पुढें लोकसत्ताक राज्य स्थापिलें गेलें. जगांतील राजकीय जीवनक्रमास हे दोन जबर धक्केच बसले व त्याचा परिणाम म्हणजे राजकीय विचारांस चालन मिळून एक नवीन युग सुरू झालें. पुढें एकोणिसाव्या शतकांत या विचारांचा जोरानें फैलाव होऊन राज्यव्यवस्थेवर लोकमताचा ताबा चालला पाहिजे हें तत्त्व चोहोंकडे विजयी झालें. पुढें विसाव्या शतकाच्या आरंभीं तर राज्यव्यवस्था नीट चालावयाची म्हटली तर लोकशाहीच अंमलांत आणिली पाहिजे ही गोष्ट सर्वमान्य झाली. प्राचीन काळीं अथेन्स व रोम येथें लोकसत्ताक राज्यें अस्तित्वांत होतीं व तीं मोठ्या वैभवास चढलीं होतीं. पण हल्लींच्या लोकसत्ताक राज्यांत व या प्राचीन राज्यांत एक मोठा फरक आहे. अथेन्स व रोम हीं नगर-संस्थानें (City states) असल्यानें त्यांचा प्रदेश फार लहान असे व गुलाम बाळगण्याची पद्धति चालू असल्यानें नागरिकांस मुबलक फुरसत मिळे. त्यामुळें तेथें कायदे करण्यास सर्व प्रौढ नागरिक जमत. पण हल्लींच्या राज्यांतून तसें होणें शक्य नाहीं. हल्लीं राज्यांचा विस्तार शेंकडों मैल असल्यानें सर्व नागरिकांनीं एका ठिकाणीं वारंवार तर राहोच, पण एखाद्या प्रसंगींदेखील गोळा होणें दुर्घट आहे. तसेंच राज्यव्यवस्थेचें काम पार पाडण्यास अवश्य अशी फुरसत व ज्ञान या दोन्ही गोष्टी सर्व नागरिकांचे ठिकाणीं सांपडणें कठिण झालें आहे. अशा स्थितींत लोकमतानुसार

राज्य चालण्यास एक सुरेख युक्ति निघाली आहे. ती म्हणजे ' प्रातिनिधिक पद्धति ' (Representative System) होय. निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांनीं आपले प्रतिनिधि निवडावयाचे; मग त्या प्रतिनिधींनीं राजधानीच्या शहरीं जमून सर्व राज्यास उपयोगी व हितावह असे कायदे करावयाचे व राज्यचालक सरकारावर दाब ठेवावयाचा अशी ही पद्धति आहे. तेव्हां हल्लींचीं राज्यें प्रातिनिधिक लोकसत्ताक स्वरूपाचीं ( Representative Democracies ) आहेत; प्राचीन राज्यांसारखीं नागरिक राज्यें ( Direct Democracies ) हल्लीं कोठें आढळत नाहींत.

२. **इंग्लंडमधील लोकशाही.** आजचें इंग्लंडच्या राज्याचें बाह्य स्वरूप पाहिलें तर तेथें नियंत्रित राजसत्ता ( Limited Monarchy ) प्रचलित आहे असें दिसून येतें. तेथील राजावर लोकमताचें बंधन आहे. तेराव्या शतकांत इंग्लिश राजांनीं आपल्याला सुलभरीतीनें पैसा मिळावा व बलिष्ठ सरदारांस पायबंद बसावा या दुहेरी हेतूनें लोकप्रतिनिधींना लंडन शहरीं बोलावण्याचा प्रघात पाडिला. तेव्हां पार्लमेंटचा उदय झाला. ती पार्लमेंट किंवा लोकसभा प्रबल होत होत आज सहाशें वर्षांनीं सर्वाधिकारी झाली आहे. देशांतील जवळजवळ सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि तींत बसतात. ते प्रतिनिधि कायदे करण्याचें व सरकारवर दाब राखण्याचें काम करितात. आतां इंग्रज लोकांनीं राजा नांवचा कां होईना कायम ठेविला आहे व निर्भेळ लोकशाही स्थापिली नाहीं या गोष्टीचा त्यांना एका महत्त्वाच्या बाबतींत चांगला उपयोग होतो. साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांची निष्ठा राजपदाच्या ठिकाणीं केंद्रीभूत होते व त्यामुळें सर्व साम्राज्यभर ऐक्यभावना जागृत राहण्यास चांगली मदत होते. असा जरी इंग्लंडच्या राजपदाचा उपयोग असला तरी तेथील राजाचे बहुतेक अधिकार लुप्त झाले आहेत व जे थोडे अवशिष्ट आहेत त्यांचा अंमलही त्याचा सल्ला घेऊन मंत्रिमंडळच करितें. देशाचा प्रत्यक्ष राज्यकारभार चालविण्याचें काम तर सर्वस्वीं मंत्रिमंडळाकडे असतें व हें मंत्रिमंडळ पार्लमेंटांत ज्या पक्षाची सरशी असेल त्याच्या पुढाऱ्यांचें बनलेलें असतें म्हणजे तें पार्लमेंटास जबाबदार असतें. एकंदरीनें इंग्लंडमधील राज्यकारभार राजाच्या नांवानें चालत असला तरी तो लोकप्रतिनिधींच्या मतानुसार चालतो हें अगदीं उघड आहे. तेव्हां हल्लींच्या

लोकशाहीच्या युगांत इंग्लंडांत नामतः राजसत्ता चालू असली तरी इतर मुख्य मुख्य देशांप्रमाणें वास्तविकपणें लोकशाहीच नांदत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां ब्रिटिश राज्याच्या मध्यवर्ती सत्तेचीं हल्लींचीं मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे राजा, कॉमन्स व लॉर्ड्स या दोन सभांची बनलेली पार्लमेंट, आणि राज्यचालक मंत्रिमंडळ हीं होत. तेव्हां या अंगांचा विकास कसा होत गेला, त्यांची आजची स्थिति कशी आहे व त्यांचे व्यापार कसे चालले आहेत याचें वर्णन यापुढें करूं.

## २. राजपद.

**१. राजपदाचा इतिहास.** अँग्लो-सॅक्सन लोकांच्या वसाहती झाल्यावर वेसेक्सचें एकछत्री राज्य इंग्लंडांत सुरू झालें (८२७). या अँग्लो-सॅक्सन काळांत राजा सल्लामसलत घेण्यासाठीं एक शहाण्या लोकांची सभा (Witan) बोलवी. हींत मुख्य धर्माधिकारी (बिशप) व बडे सरदार बसत. पुढें विजयी वुइल्यमच्या हस्तें नॉर्मन अंमल इंग्लंडवर चालू झाला. मग सरंजाम-पद्धति इंग्लंडांत रीतसर सुरू झाली. देशांतील सर्व जमीन राजाच्या मालकीची व ती राजानें लष्करी चाकरीच्या बदल्यांत सरदारांस वहिवाटावयास द्यावयाची हें सरंजाम--पद्धतीचें मुख्य तत्त्व होय. आतां राज्य चालवितांना सरदारांची सल्ला व मदत घेण्यासाठीं 'ग्रेट कौन्सिल' बोलावण्याची पद्धति पडली. पुढें सरदारवर्ग प्रबल होत चालला व राष्ट्राचें पुढारीपण त्याजकडे गेलें. जॉन राजाच्या जुलमी कारकिर्दींत सरदारांनीं सामान्य जनतेचा पाठिंबा मिळवून राजापासून मोठी सनद (मॅग्ना चार्टा) मिळविली. तींत राज्य चालवितांना राजांनीं लोकांच्या इच्छेस मान दिला पाहिजे या तत्त्वास राजानें नाखुषीनें कां होईना मान्यता दिली. राजसत्तेवर यानंतर जे निर्बंध घातले गेले त्यांचा असा पाया घातला गेला. पुढें राजांचा खर्च वाढला. तेव्हां ग्रेट कौन्सिलमध्यें सामान्य जनांचे प्रतिनिधि परगण्यांतून व शहरांतून बोलावण्याची चाल पडली, व या सभेस पार्लमेंट हें नांव पडलें. चौदाव्या व पंधराव्या शतकांत फ्रान्सशीं युद्धें जोरानें चाललीं. तेव्हां

राजास पैसा अधिकच लागूं लागला. अर्थात् पार्लमेंटचा नेता जो सरदार-वर्ग त्यानें पार्लमेंटच्या हक्कांची पुष्कळ वाढ करून घेतली. कायदे पार्लमेंटच्या संमतीनें व्हावे, कर पार्लमेंटच्या संमतीनें बसवावे, राजमंत्र्यांवर पार्लमेंटची हुकमत चालावी, या सर्व गोष्टी राजांनीं कबूल केल्या. पण या राजकीय प्रगती-पासून देशास खरा लाभ झाला नाहीं. कारण समाजस्थिति नीट नव्हती. युद्धांनीं सरदारवर्ग जास्तच प्रबल व चढेल झाला व फ्रान्सशीं युद्धें संपल्या-वर त्यानें देशांतल्या देशांत मारामारी सुरू केली. अर्थात् देशांतील स्वास्थ्य बिघडलें, व शांतता नाहींशी झाली. राजसत्ता तर दुर्बल व पंगु होऊन बसली. अशा वेळीं जोरदार राजा पुढें येऊन दंगल थांबवील तर बरें असें जनतेस वाटूं लागलें. शेवटीं सरदारवर्गाचीं हाडें बरींच खिळखिळीं झाल्यावर यादवी थांबली ( १४८५ ), व जनतेस पाहिजे होता तसा हेन्री टयूडर हा धूर्त राजा सत्ताधीश झाला. त्यानें व त्याच्या वंशजांनीं अनियंत्रित सत्ता भोगिली; मात्र त्यांनीं शांतता, धर्मस्वातंत्र्य, नाविक सत्ता इत्यादि अमूल्य देणग्या इंग्लंडला दिल्या. त्यामुळें त्यांचा अंमल लोकप्रिय झाला. या वेळीं सरदार-वर्ग मागें पडला व व्यापार व उद्योगधंदे वाढल्यानें मध्यमवर्ग उदय पावला. पुढें त्याला राजकीय सत्ता मिळविण्याची साहजिकपणेंच इच्छा झाली व सतराव्या शतकांत स्टुअर्ट राजांचा त्याच्याशीं झगडा झाला. १६८८च्या क्रांतीनें या झगड्याचा निकाल लागला. राजा श्रेष्ठ कीं पार्लमेंट श्रेष्ठ, अथवा राज्यचालक अधिकारीवर्ग ( Executive ) श्रेष्ठ कीं कायदेमंडळ ( Legislature ) श्रेष्ठ, हा वादांतील मुख्य मुद्दा होता. त्याचा निकाल राजाच्या उलट लागला, व नंतर मर्यादित राजसत्ता ( Limited Monarchy ) इंग्लंडांत सुरू झाली. कायदा हा राजापेक्षां श्रेष्ठ असून सनदशीर पद्धतीनेंच इंग्लंडचा राज्यकारभार चालावा हा प्रघात रूढ झाला आणि राजा व पार्लमेंट यांजमध्यें क्याबिनेट ( मंत्रिमंडळ ) हा महत्त्वाचा दुवा घडला जाऊन सनदशीर पद्धतींतील राजाचें स्थान निश्चित झालें.

२. **राजाधिकार** ( Royal Prerogatives ). राजा हा अधि-कारीवर्गाचा मुख्य असून बजावणीचा अधिकार सर्वस्वी राजाचा अशी पद्धति पूर्वापार चालत आल्यानें अनेक बाबी खास राजाच्या हक्काच्या म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं मुख्य मुख्य बाबी पुढील होत. १ राजा

सर्व सन्मानाचा उगम ( Fountain of Honour ) अशी समजूत असल्यानें लॉर्ड बनविण्याचा व पदव्या देण्याचा हक्क त्याला आहे. २ राजानें पार्लमेंटच्या संमतीनें राज्य करावयाचें असल्यानें पार्लमेंट बोलावणें, तहकूब करणें व बरखास्त करणें या सर्वस्वी त्याच्या हक्काच्या गोष्टी आहेत. ३ परराष्ट्रीय राजकारण हा राजाच्या अखत्यारांतील विषय असल्यानें इतर सरकारांशीं बोलणीं करणें, युद्ध पुकारणें किंवा तह करणें ही त्याच्या खास हक्काची बाब होय. ४ राजा हा धर्मखात्याचा, सैन्याचा व अधिकारिवर्गाचा मुख्य असल्यानें सर्व खात्यांतील मोठमोठे अधिकारी नेमणें किंवा त्यांना कमी करणें हा त्याचाच अधिकार होय. ५ जाहीरनामे ( Proclamations ) काढून लोकांचें विशिष्ट कायद्यांकडे लक्ष वेधण्याचा त्याला हक्क आहे. ६ व्यक्तीला गुन्ह्याबद्दल शिक्षेची माफी देण्याचा राजाधिकारही पुरातन काळापासून मान्य असून तो दयेचा अधिकार ( Prerogative of mercy ) म्हणून प्रसिद्ध आहे. ७ देशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठीं माहिती जमविण्याच्या कामावर शोधक अधिकारी नेमण्याचा राजाधिकारही पुरातन आहे. कोणताही कायदा नीट व्हावा यासाठीं अगोदर माहिती मिळविणें जरूर असतें. तेव्हां सामाजिक किंवा राज्यकारभारविषयक सुधारणा घडवून आणण्यापूर्वी त्या प्रश्नासंबंधीं शोधपूर्वक माहिती जमविण्यासाठीं 'रॉयल कमिशन' नेमण्याची वहिवाट आहे. मग या कमिशननें केलेल्या रिपोर्टांतील शिफारसींच्या आधारें नवीन कायदे करण्यांत येतात. अशा रीतीनें हा राजाधिकार हल्लीं उपयुक्त ठरत आहे. १९०९चें 'पूअर लॉ कमिशन' व १९२०चें 'कौल कमिशन' हीं प्रसिद्ध आहेत. आतांपर्यंत सांगितलेले अधिकार हे खास राजाचे अधिकार असल्यानें ते उपयोगांत आणतांना पार्लमेंटची अगाऊ मंजुरी लागत नाहीं. हल्लीं क्याबिनेटकडे राज्यकारभार करण्याची सर्व जबाबदारी गेली असल्यामुळें हे सर्व राजाधिकार मंत्रिमंडळाकडून बजावले जातात. मात्र ते राजाच्या नांवानें बजाविले जातात इतकेंच. तेव्हां कायदेशीर रीतीनें हे अधिकार राजाचे, पण सनदशीर पद्धतीच्या दृष्टीनें मंत्रिमंडळाचे असून प्रधानांकडूनच त्यांचा वापर होतो. विशिष्ट राजाधिकार विशिष्ट प्रधान बजावितात. उदाहरणार्थ, धर्माधिकाऱ्यांच्या व इतर बड्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका मुख्य प्रधान करितो व दयेच्या हक्काची

बजावणी गृहमंत्री करतो. राज्याभिषेकासारख्या उत्सवप्रसंगीं पुष्कळ बंदिवान मुक्त होतात हें तर प्रसिद्धच आहे. कांहीं बाबतींतील राजाधिकार हल्लीं लुप्त झाले आहेत. उदाहरणार्थ १६८८च्या क्रांतीपूर्वी व्यापारनियंत्रण किंवा देश-संरक्षण या निमित्तानें आपल्या खास अधिकाराचा उपयोग करून मक्ते व जकाती या रूपानें राजे पैसे वसूल करीत. पण हक्कांच्या सनदेंतील ( Bill of rights ) एका कलमानें "राजानें कोणत्याही कारणाकरितां पार्ले-मेंटच्या संमतीशिवाय पैसा वसूल करावयाचा नाहीं," असा राजसत्तेवर स्पष्ट निर्बंध घातला, व त्यामुळें हा राजाधिकार लुप्त झाला. तसेंच राजा हें न्यायाचें उगमस्थान ( Fountain of Justice ) आहे अशी पूर्व-कालापासून समजूत आहे. पूर्वकालीं राजा स्वतः न्यायदान करी. पुढें न्यायाधीश नेमण्यांत येऊं लागले व न्यायदानाचें काम त्यांजकडे गेलें. पार्लमेंटशीं झगडा चालू असतां स्टुअर्ट राजांनीं न्यायाधीश नेमण्याच्या सत्तेचा प्रतिपक्षास शिक्षा देण्याकडे उपयोग केला. तेव्हां क्रांतीनंतर १७०१ सालीं झालेल्या वारशाच्या कायद्याच्या एका कलमानें न्याथाधीश राजसत्ते-पासून स्वतंत्र होत असें ठरविलें. एव्हांपासून राजप्रमुख बजावणी–खात्याची न्यायखात्यावरील हुकमत नाहींशी झाली, व न्यायदेवतेचें स्वातंत्र्य हें ब्रिटिश सनदशीर राज्यपद्धतीचें महत्त्वाचें लक्षण प्रस्थापित झालें. पार्ले-मेंटच्या दोन्ही सभांनीं एखादें बिल पास केलें तरी तें नामंजूर करण्याचा राजाधिकार ( Right of veto ) राजास आहे; परंतु तो १७०७पासून केव्हांही अंमलांत आणिला गेला नसून हल्लीं लुप्तप्रायच आहे. मात्र वसाहतीं-तील कायदेमंडळांतून जे कायदे पास होतात त्यांच्या बाबतींत हा अधिकार क्वचित् अंमलांत येतो. अशा रीतीनें कित्येक राजाधिकार लुप्तप्राय झाले असले तरी पुष्कळ राजाधिकार अजून शिल्लक आहेत व ते तसे रहाणें अप-रिहार्य आहे. मात्र आतां त्यांची बजावणी प्रधानमंडळाच्या हस्तें व्हावयाची हा प्रघात पक्का रूढ असल्यानें राजाधिकार अस्तित्वांत असले तरी त्यामुळें इंग्लंडच्या सनदशीर राज्यपद्धतीस मुळींच धोका पोंचण्याचा संभव नाहीं. पूर्वी प्रिव्ही कौन्सिलची सल्लामसलत घेऊन राजा राज्यकारभार चालवी. हल्लीं प्रिव्ही कौन्सिल केवळ नामधारी झालें आहे, व राजास सल्ला देण्याचें काम क्याबिनेट बजावते. मात्र सर्व मंत्री प्रिव्ही कौन्सिलचे सभासद

असतात, व क्याबिनेट प्रिव्ही कौन्सिलची कमिटी मानण्यांत येते. तसेंच क्याबिनेटकडून राजाच्या नांवानें जे हूकूम निघतात ते ' कौन्सिलच्या सल्ल्यावरून राजा ' ( King in Council ) काढतो; तेव्हां औपचारिक दृष्ट्या हल्लींसुद्धां प्रिव्ही कौन्सिलच्या सल्ल्यानेंच राज्यकारभार चालतो असें म्हणतां येईल. मंत्रिमंडळानें बजावावयाच्या राजाधिकारांखेरीज कांहीं थोडे अधिकार असे आहेत कीं ते राजपदारूढ व्यक्तीस वापरावे लागतात. अशा अधिकारांपैकीं मुख्य म्हटला म्हणजे निवडणूक झाल्यावर मुख्य प्रधान नेमावयाचा हा होय. पण कॉमन्समधील बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यासच मुख्य प्रधान नेमावयाचें असा प्रघात असल्यानें त्या अधिकाराचा उपयोग करणें फारसें अवघड नाहीं. तसेंच मंत्रिमंडळास सल्ला, उत्तेजन व इशारत देण्याचा अधिकार ( Right to be consulted, to encourage and to warn ) राजास असून त्याचा उपयोग देशाला हितकारक असा राजांनीं वेळोवेळीं केला आहे. व्हिक्टोरिआनें परराष्ट्रीय प्रधान पामर्स्टन हा आपल्याला परराष्ट्रांशीं चाललेल्या पत्रव्यवहाराची नीट माहिती पुरवीत नाहीं असें पाहून त्याला पहिल्यानें इशारत दिली व पुढें त्याला आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. पीलनें १८४६त धान्याचा कायदा रद्द केला, त्या वेळीं राणीनें त्याला त्या कामीं एकसारखा पाठिंबा देऊन आपला उत्तेजन देण्याचा अधिकार गाजविला. सारांश कागदावर पाहूं गेले तर राजाचे विशेष अधिकार पुष्कळ आहेत; परंतु ते अंमलांत आणण्याचें काम त्याच्याकडे फारसें राहिलें नाहीं. मात्र राजपदाच्या पाठीमागें एक हजार वर्षांची परंपरा आहे व त्यामुळें राजा या संस्थेस वजनदारपणा आलेला आहे. जेथें जेथें कायदेशीर व्यवस्था लंगडी पडते तेथें तेथें अनुभवी राजाच्या मध्यस्थीचा चांगला उपयोग होतो, असा वेळोवेळीं अनुभव आला आहे, व त्यामुळें इंग्लिश लोकांस राजपद हवेंसें वाटणें साहजिक आहे.

३. **राजपदाचे हल्लींचे उपयोग.** इंग्लिश कायद्यांत अशी एक म्हण आहे कीं, राजा अमर आहे ( The king never dies ). तिचा अर्थ असा कीं, एक राजा मृत्यु पावला कीं त्याच क्षणीं त्याचा वारस गादीवर येतो, गादी कधीं रिकामी पडत नाहीं व राजांची परंपरा एकसारखी सुरू रहाते. तसेंच राजा एकदां गादीवर आला कीं मृत्यूपर्यंत तो गादीवर रहातो. मात्र

मंत्रिमंडळ वेळोवेळीं बदलतें. तेव्हां दीर्घकालीन अनुभवामुळें राज्यकारभाराची माहिती करून घेण्याची राजास अधिक संधी मिळते, व प्रधानांस सल्ला देते-वेळीं राजाच्या अनुभवापासून राष्ट्रास फायदा होतो. एकोणिसाव्या शतकांत राजा राष्ट्रास भारभूत होय अशी समजूत होती. परंतु अलीकडे व्हिक्टोरिआ, ग्लॅडस्टन आदिकरून लोकांचे पत्रव्यवहार व लेख प्रसिद्ध झाले आहेत; त्यावरून ही समजूत कशी चुकीची होती व व्हिक्टोरिआसारख्या अनुभवी राजपदारूढ व्यक्तीच्या सल्ल्याचा प्रधानांस वेळोवेळीं कसा उपयोग होत होता हें आपणांस कळून येतें. प्रधानांस कोणत्या बाबतींत राजाचा प्रत्यक्ष उपयोग होण्यासारखा असतो हें सांगणें कठिण आहे. तथापि राजाचा सल्ला घेतला जाण्याचा जो अधिकार आहे, त्याचा परराष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतींत फार उपयोग होतो. १८६१-त ट्रेंट प्रकरणावरून इंग्लंडचें अमेरिकेशीं युद्ध होण्यापर्यंत पाळी आली होती; पण अमेरिकेस प्रधानांनीं लिहिलेल्या खलित्यांत आपल्या नवऱ्याच्या सूचने-वरून व्हिक्टोरिआनें केलेल्या फेरफारावरून तें युद्ध टळलें. पुढें विसाव्या शत-काच्या आरंभीं बोअर–युद्ध संपल्यावर इंग्लंडनें सर्व राष्ट्रांची सहानुभूति गमा-वली होती व तें एकाकी बनलें होतें. अशा वेळीं सातव्या एडवर्डनें निरनि-राळ्या युरोपिअन देशांना भेटी दिल्या व खुबीनें वागून इंग्लंड व फ्रान्स यांचें सख्य घडवून आणिलें (१९०४). त्यावरून त्याला शांततास्थापक ( Peace-maker ) म्हणतात. तेव्हां इंग्लंडचा राजा हा राष्ट्राचा परंपरागत पुढारी असल्यानें व सरकारी कारभाराशीं दीर्घकाल अखंड परिचय ठेवण्याची त्याला संधी मिळत असल्यानें, तसेंच इतर देशांतील राजघराण्यांशीं नातेंसंबंध अस-ल्यानें परराष्ट्रांशीं शांतता राखण्याच्या कामीं त्याच्या ज्ञानाचा, अनुभवाचा व खुबीदार वर्तनाचा अत्यंत उपयोग होतो. इंग्लंडच्या राजपदारूढ व्यक्तीचा एका महत्त्वाच्या बाबतींत राष्ट्रास उपयोग होण्यासारखा आहे असें अलीकडे दिसून आलें आहे. गेल्या पन्नास वर्षांत साम्राज्यासंबंधीं इंग्लंडचे विचार पार पालटले आहेत. आगबोटी, तारायंत्र व विमानें यांजसारखीं दळणवळणाचीं साधनें निघाल्यानें सर्व प्रमुख युरोपिअन राष्ट्रांस साम्राज्य मिळविण्याची इच्छा झाली. इंग्लंडला तर अगोदरच मिळविलेल्या साम्राज्याबद्दल अत्यंत अभिमान व आपलेपणा वाटूं लागला, व साम्राज्य बळकट करण्याकडे इंग्रजांचें लक्ष वेधलें. इंग्लंडच्या वसाहती व हिंदुस्थान यांस ब्रिटिश पार्लमेंटबद्दल प्रेम वाट-

ण्याचें फारसें कारण नाहीं; उलट आपले या पार्लमेंटांत प्रतिनिधि नसतां तिनें आपल्याला बंधनकारक नियम करावे हें अस्वाभाविक असल्यानें साम्राज्यान्तर्गत लोकांना तिजबद्दल अविश्वास वाटला तर त्यांत कांहींच वावगें नाहीं. मात्र साम्राज्याचा वंशपरंपरागत धनी या नात्यानें ब्रिटिश राजपदारूढ व्यक्तीकडे साम्राज्यांतील लोक पाहतात व त्यामुळें त्या व्यक्तीबद्दल त्यांना आदरभाव वाटतो. 'साम्राज्यांतील स्वराज्योपभोगी घटकांमधील राजकारणी पुरुषांना इंग्लंडमधील पक्षांच्या बऱ्यावाईट कृत्यांबद्दल वाटणारी बेफिकिरी ते उघड बोलून दाखवितात; मात्र राजपदाबद्दल ते आपली पूर्ण राजनिष्ठा व्यक्त करितात.' तेव्हां साम्राज्यांत ऐक्यबुद्धि कायम ठेवण्यास राजपद उत्कृष्ट रीतीनें उपयोगीं पडतें हें सांगणें नको. परस्परांना परस्परांची माहिती होऊन साम्राज्यांतील इतर घटकांची ब्रिटिश राजपदाबद्दलची निष्ठा दृढ व्हावी यासाठीं युवराजानें (Prince of Wales) साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत जाऊन तेथील लोकांस भेट द्यावी अशी व्यवस्था अलीकडे रूढ झाली आहे. राजपदाचा आणखी एक उपयोग म्हटला म्हणजे सामाजिक बाबींतला होय. समाजांतील अत्यंत उच्चस्थान म्हणजे राजपद. तें आनुवंशिकरीतीनें प्राप्त व्हावयाचें अशी व्यवस्था ठेविल्यानें व त्या पदावर आंरूढ होणाऱ्या व्यक्तीस अनेक राष्ट्रोपयोगी कामें करण्याची सवड ठेवल्यानें इंग्लंडचा पुष्कळ फायदा झाला आहे. एकतर हें स्थान प्रयत्नसाध्य नसल्यानें तें मिळविण्यासाठीं क्षुद्र कारस्थानें किंवा दिखाऊ थाटमाट कोणी करील अशी भीति नाहीं. राजा पक्षभेदातीत असून सर्व राष्ट्राचा प्रतिनिधि म्हणून त्याला मान असतो. कोणाही एखाद्या व्यक्तीस सर्व राष्ट्रातर्फे मान द्यावयाचा असल्यास किंवा एखादा उत्सव साजरा करावयाचा असल्यास त्या कामीं राजाची योजना होते. प्रसिद्ध वैमानिक कॉब्हॅम याचा सन्मान सर्व इंग्लिश राष्ट्रातर्फे करावयाचा तो नुक्ताच पांचवे जॉर्ज यांचे हस्तें करण्यांत आला ( १९२६ ). तसेंच गरिबांना घरांचा पुरवठा, औषधोपचाराची व्यवस्था, शिशुसंगोपन, इत्यादि जनहिताच्या चळवळींत राजपदारूढ व्यक्ति व राजघराण्यांतील इतर मंडळी यांनीं भाग घ्यावा अशी वहिवाट चालू झाली आहे. त्यामुळें समाजांतील श्रेष्ठस्थान व समाजसेवा यांचा योग्य मिलाफ या ठिकाणीं दिसून येतो.

---

करितांना चौथा वर्ग हिशेबांत घेण्याचें कारण नाहीं. लोकांपासून राजे कर घेत ते त्यांनीं खुषीनें द्यावेत यासाठीं धर्मगुरु, जमीनदार व शैहरवासी या तीन वर्गांच्या प्रतिनिधींच्या सभा भरविण्याची राजांनीं सुरुवात केली; त्यामुळें दर वर्गापासून या प्रतिनिधींच्या द्वारां पैशाची मागणी करणें सुलभ झालें. या एकंदर सभेंतील प्रत्येक वर्गसभा निराळी बसे व आपल्या वर्गाच्या तर्फेची रक्कम निराळी मंजूर करी; तसेंच कायदे करतांना आपलें निराळें मत त्या कायद्यास अनुकूल व प्रतिकूल असे देई. फ्रान्समधील एकंदर सभा स्टेट्स जनरल (States General) म्हणून प्रसिद्ध होती. तींत धर्मगुरु, जमीनदार व नागरिक यांच्या वर्गसभा निराळ्या असत. फ्रान्समध्यें हे वर्गभेद इतके तीव्र होते कीं, त्यांतलि कांहीं जातिरूप पावले. जमीनदारांचीं सर्व मुलें जमीनदारवर्गांत सामील होत. अर्थात् स्टेट्स-जनरलमध्यें जमीनदारांची एक खास सभा असे. याचा परिणाम असा झाला कीं, आपआपसांत निरनिराळ्या वर्गांची चुरस वाढली, स्टेट्सजनरल दुर्बल झाली, व फ्रेंच राजांनीं तिला १६१४ ते १७८९पर्यंत म्हणजे पाउणे दोनशें वर्षें नांवचें अस्तित्वसुद्धां ठेविलें नाहीं. १७८९त फ्रेंच राज्यक्रान्तीच्या वेळीं फ्रेंच प्रतिनिधींनीं आपल्या वर्गसभा मोडून एक राष्ट्रीय सभा केली व मग राजसत्तेवर निर्बंध घालण्याचें काम जोरानें चाललें. फ्रान्सप्रमाणें युरोपांतील इतर देशांतही वर्गसभांच्या बेकीमुळें राजांचा फायदा झाला व ते प्रबल बनले.

**३. इंग्लिश पार्लमेंटची अपूर्वता.** मध्ययुगांत धर्मगुरु, सरदार व नागरिक असे तीन वर्ग इंग्लंडांतही होते. पण त्यांच्यामधील भेद स्पष्ट व तीव्र केव्हांच नव्हता. एस्टेट (Estate) म्हणजे वर्ग. 'थ्री एस्टेट्स' म्हणजे धर्मगुरु, सरदार व नगरवासी हे तीन वर्ग होत. पार्लमेंटपैकीं लॉर्ड्ससभेंत धार्मिक उमराव (Spiritual Peers) व लौकिक उमराव (Temporal Peers) असे पहिले दोन वर्ग असून कॉमन्समध्यें सामान्यजन (Citizens) हा तिसरा वर्ग समाविष्ट आहे व यावरून तीस Three Estates (त्रिवर्गात्मक सभा) असें नांव दिलेलें आढळतें. विशेषतः अठराव्या* व एकोणि-

* अठराव्या शतकांत पार्लमेंटमधील राजा, लॉर्ड्स, व कॉमन्स असे तीन वर्ग समजत असत. तसेंच हल्लीं सुद्धां छापखान्यांना (The press) राज्यव्यवस्थेंत भाग घेणारा चौथा वर्ग (Fourth Estate) हें नांव केव्हां केव्हां लावितात.

साव्या शतकांत हें नांव विशेष प्रचारांत आलें. परंतु हें इंग्लिश पार्लमेंटचें केलेलें वर्णन फारसें बरोबर नाहीं. इंग्लिश पार्लमेंटला सुरुवातीनंतर लवकरच द्विसभात्मक रूप आलें. अर्थात् तींत धर्मगुरु, जमीनदार व नगरवासी या प्रत्येक वर्गाची एक एक वेगळी सभा अशी केव्हांच झाली नाहीं. उलट धर्माधिकारी जे बिशप व अॅबट ते बड्या जमीनदारांबरोबर उमरावसभेंत बसत. तेव्हां पहिला वर्ग व दुसरा वर्ग यांचें त्या सभेंत मिश्रण झालें. शिवाय राजाचे न्यायाधीश व इतर कांहीं कामगार लॉर्ड्स–सभेंत बसत. हे बहुधा तिसऱ्या वर्गांतील असत. तेव्हां तिन्ही वर्गांची तेथें सरमिसळ दिसते. समाजाच्या त्रिवर्गात्मक दृष्टीनें पाहिलें तर नाइट ( छोटे जमीनदार ) हे दुसऱ्या वर्गांत मोडत, व नगरवासी तिसऱ्या वर्गांत मोडत. या दोघांची मिळून हाउस ऑफ कामन्स ही सभा झाली. तेव्हां कामन्ससुद्धां एका वर्गाची सभा अशी नव्हती. दुसरी गोष्ट अशी कीं, खालचे धर्मगुरु पार्लमेंटच्या सुरुवातीनंतर लवकरच पार्लमेंटांत मुळींच येतनासे झाले. त्यामुळें धर्मगुरूंची सभा असा पार्लमेंटचा एक निराळा भाग झालाच नाही. धर्मकार्याकरितां त्यांच्या उत्तर इंग्लंडांत एक व दक्षिण इंग्लंडांत एक अशा दोन धर्मसभा ( Convocations ) असत; त्यांत ते राजास पैसा मंजूर करीत. १६६४पासून धर्मसभांनीं पैसा मंजूर करण्याचें सोडून दिलें व राष्ट्रावर कर बसवून पैसा उभारण्याचें काम पूर्णपणें कॉमन्स-सभेकडे आलें. तिसरा मुद्दा असा कीं सरदार किंवा जमीनदार ही इंग्लंडांत निराळी जात अशी झाली नाहीं. तिचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे लॉर्डोचा वडील मुलगा तेवढा बापामागें लॉर्ड होई व त्याच्या कनिष्ठ संततीस सामान्य लोकांत मिसळून जावें लागे. एकंदरीनें इंग्लिश पार्लमेंटांत तिन्ही वर्गांतील सभासद असत हें खरें; पण प्रत्येक वर्गाला निराळी सभा नव्हती व सभासदांना आपल्या वर्गाची विशिष्ट जाणीव होती असेंही दिसत नाहीं. इंग्लिश पार्लमेंटची ही परिस्थिति विशेष महत्त्वाची होय. कारण या परिस्थितीमुळें इंग्लिश पार्लमेंट म्हणजे वर्गविशिष्ट दृष्टीच्या लोकांची सभा न होतां राष्ट्रदृष्टि तींत लवकरच झळकूं लागली. याचा महत्त्वाचा परिणाम असा झाला कीं, मध्ययुग संपल्यावर युरोपमधील इतर देशांतील वर्गप्रधान राजकीय सभा निर्वीर्य किंबहुना लुप्त झाल्या, त्या वेळीं इंग्लिश पार्लमेंटच्या दोन्ही सभांत पुरेशी एकी राहिली व तिनें स्टुअर्ट राजांशीं झगडा करून

आपलें वर्चस्व स्थापिलें. पुढें एकोणिसाव्या शतकांत तर, इंग्लिश पार्लमेंटच्या अनुकरणानें सर्व जगभर द्विसभात्मक कायदेमंडळें अस्तित्वांत आलीं व इंग्लिश पार्लमेंटला "पार्लमेंटांची जननी" ( Mother of Parliaments ) हें भूषणास्पद नांव प्राप्त झालें.

४. **पार्लमेंटची सत्ता** (Sovereignty of Parliament). पार्लमेंट ही कायदेमंडळ असल्यानें स्वाभाविकपणेंच कायदे करण्याचें काम तिच्याकडे आहे. आतां पार्लमेंटला अमका कायदा करतां येईल व अमका करितां येणार नाहीं असें मुळींच नाहीं. अर्थात्, तिच्या कायदे करण्याच्या अधिकाराला कसलीच मर्यादा नाहीं. १९११च्या पार्लमेंट ॲक्टसारखा हाउस ऑफ लॉर्ड्सचें अधिकारहरण करणारा महत्त्वाचा विषय असो किंवा एखाद्या स्थानिक रेल्वेला मंजुरी देण्याचा सामान्य विषय असो, या दोन्ही बाबतींत पार्लमेंटची कायदा करण्याची पद्धति एकच असते. दोन्ही सभांतून बहुमतानें तो पास व्हावयाचा व नंतर राजाची त्याला संमति मिळावयाची. युनायटेड स्टेट्ससारख्या देशांत घटनात्मक ( Fundamental ) बाबी व सामान्य ( Ordinary ) बाबी असा भेद केला असून पहिल्या विषयांत कॉंग्रेसला साध्या विषयांप्रमाणें सहज हात शिरकवितां येत नाहीं. पण इंग्लंडांत तसें कांहींच नाहीं. इंग्लिश पार्लमेंटला वाटेल तो कायदा साध्या बहुमताच्या मार्गानें पास करितां येतो किंवा रद्द करितां येतो. याचें प्रत्यक्ष घडलेलें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे १७१६चा सप्तवार्षिक कायदा होय. त्या वेळीं बसलेली पार्लमेंट निवडून आली तेव्हां त्रैवार्षिक कायदा अंमलांत होता. परंतु त्या पार्लमेंटनें पुढील पार्लमेंटची मुदत सात वर्षांची केली, इतकेंच नव्हे तर तिनें स्वतःला तो नवीन कायदा लागू केला व आपली तीन वर्षांवर मुदत वाढविली. अशा रीतीनें कायदे करण्याच्या बाबतींत पार्लमेंट पूर्ण सत्ताधीश ( Legal Sovereign ) असल्याचें उघड झालें. पार्लमेंटच्या कायदे करण्याच्या सत्तेस कोणतीच मर्यादा नाहीं हें तत्त्व अनेक वेळां प्रकट झालें आहे. आणखी एकाच प्रसंगाचा येथें उल्लेख करूं. १८००चा आयरिश पार्लमेंटशीं ऐक्य करण्याचा कायदा पार्लमेंटच्या रचनेंत बदल करणारा असल्यानें महत्त्वाचा होता. त्यांतील एका कलमानें प्रॉटेस्टंट धर्मखातें आयर्लंडांत कायम राखण्याची मान्यता देण्यांत आली होती. पण १८६९ सालीं

नवीन कायदा करून पार्लमेंटनें त्या धर्मखात्याचें उच्चाटन केलें. कायदे करण्याची अमर्याद सत्ता पार्लमेंटच्या हातीं आहे ही गोष्ट खरी; पण पार्लमेंटचे सभासद आपल्या जागेवर कांहीं कायमचे विराजमान नसतात. वेळोवेळीं **मतदारस्वरूपी जनता** त्यांची निवड करिते. तेव्हां पार्लमेंटचे कायदे जनतेस पसंत पडतील असेच असावे लागतात. नाहींतर निवडणुकीच्या वेळीं जुन्या सभासदांस जनता अजिबात धुडकावून लावील व नवीन सभासद निवडील. अर्थात् अंतिम राजकीय सत्ता जनतेच्या हातीं असल्यामुळें पार्लमेंट जरी कायदे करण्यांत सत्ताधीश असली तरी जनता हीच राष्ट्रामधील राजकीय सत्ताधीश ( Political Sovereign ) होय. जनतेच्या या अधिकाराचा प्रत्यक्ष अंमल व्हावा म्हणून एकोणिसाव्या शतकांत अनेक सुधारणा--कायदे पास झाले. त्या योगें मतदारांचा हक्क विस्तृत करण्यांत आला, व १९१८त या दृष्टीनें आणखी एक पाऊल पुढें पडून देशांतील जवळजवळ सर्व स्त्रीपुरुष मतदार बनले. अशा रीतीनें राजकीय सत्ताधीश व कायदे करण्यांतील सत्ताधीश यांच्यांतील मेळ ठेवण्याची व्यवस्था झाली असून यापुढें देशाची प्रगति सनदशीर मार्गांनींच होत जाईल, आणि चालू राज्यव्यवस्थेस व समाजव्यवस्थेस क्रान्तीचा भयंकर धक्का सोसावा लागणार नाहीं असा सुमार दिसतो.

## ४. कॉमन्स--सभा ( House of Commons ).

**१. कामन्ससभेचा इतिहास.** चौदाव्या शतकांत हाउस ऑफ कॉमन्सचा उदय होऊन पंधराव्या शतकांत कायदे करणें, जमाखर्चावर ताबा चालविणें, व सरकारी मंत्र्यांवर दाब राखणें, या तिन्ही बाबतींत महत्त्वाचे हक्क त्या सभेनें मिळविले. पुढें अर्वाचीन युगारंभीं टयूडर राजांची अनियंत्रित सत्ता सुरू झाली. या वेळीं औपचारिक दृष्टया राजांनीं कॉमन्सच्या संमतीनें कारभार चालविला व त्यामुळें पार्लमेंट ही संस्था कायम राहिली. नंतर स्टुअर्ट राजे व पार्लमेंट यांजमध्यें झगडा झाला. शेवटीं १६८८च्या क्रान्तीनें कॉमन्स राजापेक्षां श्रेष्ठ ठरले, व राज्यकारभारावर त्यांचा ताबा चालू झाला. पुढील शतकांत पक्षसंघटना व प्रधानमंडळाची पद्धति या दोन बाबींचा उत्कर्ष होऊन

कॉमन्सचें वजन अतिशय वाढलें. १८३२त मतदानपद्धतींत सुधारणा झाली व कॉमन्स हे लोकांचे खरेखुरे प्रतिनिधि असावेत या दृष्टीनें पाऊल पुष्कळ पुढें पडलें. पुढें १८६७, १८८९ व १९१८ या सालीं आणखी सु[illegible] होऊन हल्लीं देशांतील बहुतेक सर्व प्रौढ पुरुष व स्त्रिया यांस मताधिकार मि[illegible] असून जनतेच्या प्रतिनिधींची सभा हें कॉमन्ससभेचें स्वरूप प्रस्थापित [illegible] आहे. एकोणिसाव्या शतकांत लॉर्ड्ससभेशीं कॉमन्सचे वेळोवेळीं तंटे [illegible] शेवटीं १९११सालीं लॉर्ड्ससभेचे बरेच महत्त्वाचे अधिकार कमी झाले व [illegible]न्सचें वर्चस्व फार वाढलें. अठराव्या शतकांत व्हिग व टोरी आणि एकोणिसाव्यांत लिबरल व कॉन्सर्व्हेटिव्ह हे दोन पक्ष देशांत असून कॉमन्समधील बहुमतवाला पक्ष अधिकारारूढ असावयाचा व दुसरा विरोधी म्हणून वावरावयाचा अशी परिस्थिति होती. गेल्या महायुद्धापासून मजूर पक्ष हा तिसरा पक्ष जोरदार बनला. तेव्हां हल्लीं लिबरल, कॉन्सर्व्हेटिव्ह, व मजूर असे तीन पक्ष कॉमन्ससभेंत वावरत असून इंग्लंडच्या राजकारणास तिरंगी सामन्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आयरिश ऐक्यापासून कॉमन्ससभेंत ६५८ सभासद झाले. ती संख्या १८८५पर्यंत कायम होती. त्या वर्षीं झालेल्या पुनर्रचनेमुळें सभासदांची संख्या ६७० झाली. १९१८च्या सुधारणा-कायद्यानें कॉमन्ससभेच्या सभासदांची संख्या ७०७ करण्यांत आली होती; परंतु १९२२त दक्षिण आयर्लंडला स्वराज्य देण्यांत आल्यानें तेथून येणारे ९२ सभासद कमी झाले व तेव्हांपासून कॉमन्सच्या सभासदांची संख्या ६१५ ही कायम झाली.

**२. कॉमन्ससभेची रचना.** इंग्लंडचे कायदेमंडळ द्विसभात्मक ( Bicameral ) आहे. दोन सभांपैकीं कॉमन्ससभेंत लोकप्रतिनिधि बसतात व तिला विशेष राजकीय अधिकार आहेत; त्यामुळें ही सभा अतिशय महत्त्वाची होय. हींतील एकंदर सभासदांची संख्या ६१५ आहे. या सभासदांची देशवार वांटणी पाहिली तर इंग्लंडमधून ४९२, वेल्समधून ३६, स्कॉटलंडमधून ७४ व अल्स्टर ऊर्फ उत्तर आयर्लंड यांतून १३, अशी प्रतिनिधींची निवड होते. मतदारसंघांचे तीन प्रकार असून शहरांतून ३००, परगण्यांतून ३०३, व विश्वविद्यालयांतून १२ अशी जागांची वांटणी आहे.

**३. मतदानाचा हक्क.** १८३२च्या पूर्वीं मतदानाच्या हक्काची कोणत्याच निश्चित तत्त्वावर उभारणी झालेली नव्हती. त्या वर्षापासून मात्र अनेक

सुधारणा होऊन मतदारीचा हक्क निश्चित तत्त्वांवर उभारला गेला, मतदारीचें क्षेत्र विस्तृत झालें, व एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडांत पुष्कळ [illegible] लोकशाही सुरू झाली. पुढें महायुद्धानंतर १९१८त आणखी एक म[illegible] पुढें टाकण्यांत येऊन स्त्रियांनाही मतदानाचा हक्क मिळाला; या वेळीं जव[illegible]ढ स्त्रीपुरुषांना मतदानाचा हक्क मिळून इंग्लंडांत लोकशाही पूर्णांशानें [illegible]ली. मतदारांची लायकी, त्यांच्या नांवांच्या याद्या, निवडणुकीचे नियम [illegible] यीं हल्लींची व्यवस्था १९१८च्या कायद्यानें निश्चित झाली आहे. यापूर्वी प्राप्तीवर मतदारीचा हक्क अवलंबून असे. परंतु यापुढें प्राप्तीची अट दूर झाली. मतदारीचा हक्क तीन तऱ्हांनीं मिळूं शकतो. १ रहाण्याची जागा, २ उद्योग-धंद्याची जागा, व ३ विश्वविद्यालयाची पदवी. कोणाही मतदारास दोहोंपेक्षां अधिक मतें देण्याचा अधिकार नसतो. त्यांपैकीं एक मत रहात्या जागेवरून असावयाचें व उद्योगधंदा किंवा विश्वविद्यालय यांतून दुसरें मत अशी योजना आहे. मतदानापूर्वी निदान सहा महिने परगण्यांत किंवा शहरांत १० पौंड भाड्याची रहाण्याकरितां किंवा उद्योगधंद्याकरितां जागा आपल्याकडे ठेवणाऱ्या वीस वर्षांवरील वयाच्या प्रत्येक पुरुषास मतदानाचा हक्क असतो. निदान पांच पौंड वार्षिक उत्पन्नावर आकारिलेला स्थानिक स्वराज्यसंस्थेचा कर स्वतः भरणारी किंवा तसा कर भरणाऱ्या पुरुषाची बायको म्हणून तीस* वर्षांवरील स्त्रीस मतदानाचा हक्क देण्यांत आला आहे. लॉर्ड्स, परकीय लोक, वेडे, गुन्हेगार, व अल्पवयी मुलें यांना साहजिकपणेंच मतदानाचा हक्क नाहीं. एकंदर चार कोटि लोकसंख्येपैकीं जवळजवळ दोन कोटि लोक मतदार असून त्यांपैकीं पाऊण कोटि स्त्रिया आहेत. मतदारांच्या याद्या वर्षांतून दोनदां करावयाच्या व त्यांचा खर्च स्थानिक सरकार व मध्यवर्ती सरकार यांनीं निमेनिम वांटून घ्यावयाचा, तसेंच शक्य तोंवर एका मतदारसंघानें एक सभासद निवडून द्यावयाचा व मतदारसंघ समानसंख्येचे असावयाचे अशी पद्धति अंमलांत आहे. एकंदरीनें जवळजवळ सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांना मत मिळालें असल्यानें इंग्लंडमध्यें सार्वत्रिक

*स्त्रियांना वयाची अट तीस वर्षांची आहे ती पुरुषांप्रमाणें एकवीस वर्षांवर आणण्याचें बिल पुढील बैठकींत मंत्रिमंडळ पार्लमेंटपुढें आणणार आहे असें मुख्य प्रधान बाल्डूविन यानें नुक्तेंच बोलून दाखविलें (एप्रिल १९२७).

मतदारीचें तत्त्व ( Universal suffrage युनिव्हर्सल सफ्रेज ) अंमलांत आहे व मताचा हक्क नीट बजावला जावा यासाठीं योग्य खबरदारी घेतली गेली आहे असें दिसून येईल.

**४. सभासद कोणास होतां येतें.** कॉमन्सचा सभासद होण्यास मालमत्तेची किंवा धर्मपंथाची मुळींच अट नाहीं. लॉर्ड्स, धर्मगुरु, वेडे, गुन्हेगार, *सरकारी नोकर, इत्यादि मंडळींखेरीज कोणाही ब्रिटिश नागरिकास उमेदवार म्हणून उभे राहतां येतें. मात्र लॉर्ड्ससभेचें सभासद म्हणून निवडून न आलेल्या आयरिश लॉर्डांना ग्रेट ब्रिटनमधील कोणत्याही भागांतून कॉमन्ससभेंत निवडून येतां येतें. हल्लीं लोकशाहीचें युग चालू असल्यानें मजुरांसारख्या कनिष्ठ समाजांतून कॉमन्ससभेंत सभासद निवडून येतात. तेव्हां पोटाचा काच सभासदाच्या मागें राहूं नये म्हणून त्यास चारशें पौंड वार्षिक वेतन+ ठरविण्यांत आलें आहे

---

*१७०१ च्या ॲक्ट ऑफ सेट्लमेंटमधील एका कलमानें असें ठरविलें कीं कोणाही सरकारी नोकरानें कॉमन्ससभेचा सभासद होऊं नये. १७०५त हें कलम थोडेंसें सैल करण्यांत आलें. तेव्हांपासून सरकारी नोकरास कॉमन्ससभेचा सभासद होतां येत नाहीं व जर निवडून आल्यावर एखाद्यानें नोकरी धरिली तर त्याला सभासदाची जागा सोडावी लागते व फेरनिवडणुकीसाठीं उभें रहावें लागतें. याचा एक महत्त्वाचा परिणाम म्हटला म्हणजे कोणाही सभासदास आपल्या जागेचा राजीनामा देतां येत नाहीं. एखाद्या सभासदाला जर पार्लमेंटांतील आपली जागा सोडावयाची झाली तर 'चिल्टर्न हण्ड्रेड्सचा रक्षक' यासारख्या नामधारी सरकारी जागेचा तो स्वीकार करितो. लागलीच त्याचें पार्लमेंटचें सभासदत्व नाहींसें होतें, व मग तो त्या सरकारी जागेचा राजीनामा देतो. निवडणूक झाल्यावर जे सभासद प्रधानमंडळांत नेमले जात त्यांस १७०५च्या कायद्यान्वयें फेरनिवडणुकीसाठीं उभें रहावें लागे व पुनः निवडून येऊन ते आपल्या प्रधानाच्या व सभासदाच्या जागीं कायम होत. पण अलीकडे प्रधानांना अशा तऱ्हेनें फेरनिवडणूक करून घेण्याची जरूर नाहीं असा कायदा झाला आहे व प्रधानांच्या मागचा फेरनिवडणुकीचा खटाटोप टळला आहे.

+पूर्वीं मध्ययुगांत ज्या परगण्यांना व शहरांना कॉमन्ससभेस सभासद पाठविण्याचा हक्क होता त्या परगण्यांकडून व शहरांकडून आपापल्या सभासदास रोजीं चार शिलिंग व दोन शिलिंग पार्लमेंटांत जाऊन हजर राहण्यासाठीं मिळत असत. त्या कालीं पुष्कळ मतदारसंघ सभासद पाठविण्यास नाखुष असत. त्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्यामुळें त्यांना फार खर्च येई. पुढें कॉमन्सचा सभासद होणें ही गोष्ट मोठ्या मानाची झाली तेव्हां हा मुशाहिरा बंद झाला.

(१९११). प्रत्येक सभासद एम्. पी. ( M. P. Member of Parliament ) ही पदवी आपल्या नांवापुढें लावतो. धर्मपंथाची अट नाहीं, तसेंच ज्या मतदारसंघातर्फे उभें रहावयाचें त्या मतदारसंघांतच तो सभासद मतदार पाहिजे अशीही अट नाहीं. दादाभाई नौरोजी, व भावनगरी हे दोघे हिंदी गृहस्थ कॉमन्सचे सभासद पूर्वी होतें. हल्लीं सकलातवाला हे प्रसिद्ध कम्यूनिस्ट पुढारी कॉमन्ससभेचे सभासद आहेत.

५. **निवडणूक** (Election). १९११च्या कायद्यानें पार्लमेंटची जास्तींत जास्त मुदत पांच वर्षें ठरली. तेव्हां निदान पांच वर्षांनीं कॉमन्ससभेच्या सभासदांची नवी निवड होते. सर्व निवडणुकी ( विश्वविद्यालयाच्या सोडून ) एकाच दिवशीं व्हावयाच्या असें १९१८च्या कायद्यानें ठरविलें आहे. जुनी पार्लमेंट बरखास्त झाली कीं लवकरच सरकारी जाहिरनाम्यानें निवडणुकीचे हुकूम ( Writs ) सुटतात, व निवडणुकीचा दिवस प्रसिद्ध होतो. मग ठिकठिकाणचे निवडणुकीचे व्यवस्थापक ( Returning Officers ) आपल्या मतदारसंघातर्फे सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांचे अर्ज मागवितात व ठरीव दिवशीं उमेदवारांचीं नांवें दाखल करितात. जर एकच उमेदवार पुढें आला तर तो बिनहरकत निवडून आला असें ठरतें व प्रत्यक्ष निवडणूक करण्याचें कारण पडत नाहीं. पण जर एकाहून अधिक उमेदवार पुढें आले तर सरकारी हुकुमांत सांगितलेल्या दिवशीं निवडणुकीची दंगल चालू होते. मतनोंदणीच्या जागीं ( Polling Station ) प्रत्येक उमेदवाराचा मुखत्यार ( Election Agent ) त्याच्यातर्फे काम करीत असतो. मतदान गुप्तपद्धतीनें होतें. मतदाराला ज्या उमेदवारास मत द्यावयाचें असेल त्याच्या नांवापुढें मतपत्रिकेंत ( Voting Paper ) फुली करून कागदास घडी घालून मतदार मतांच्या पेटींत तो टाकून देतो. पुढें लवकरच मतांची मोजणी होते. ज्याला जास्त मतें मिळालीं असें दिसून येतें तो कॉमन्सचा त्या मतदारसंघातर्फे सभासद झाला. गुप्त पद्धतीमुळें ( Ballot ) मतदाराला आपलें मत देतांना कोणास भिण्याचें कारण रहात नाहीं. तसेंच निवडणुकींत लांचलुचपत घडूं नये यासाठीं कडक नियम करण्यांत आले आहेत, व त्यांचें फल म्हणजे निवडणुकी लांचलुचपतीच्या दोषापासून बहुतेक अलिप्त अशा पार पडतात. एखाद्या सभासदाची निवडणूक वादग्रस्त

असल्यास पूर्वी त्या प्रकरणाची स्वतः कॉमन्स चौकशी व निर्णय करीत. पण १८६८पासून वादग्रस्त निवडणुकींबाबत निकाल देण्याचें काम दोन हायकोर्ट जज्जांकडे सोंपविण्यांत आलें आहे.

**६. दी स्पीकर व इतर अधिकारी.** कॉमन्ससभेच्या अध्यक्षास स्पीकर (Speaker) असें म्हणतात. पूर्वी सभेचें म्हणणें राजास कळवावयाचें किंवा राजाचा निरोप कॉमन्सना समजावून द्यावयाचा हें काम त्याच्याकडे मुख्यतः असे व त्यावरूनच त्यास स्पीकर हें नांव पडलें. सभागृहांत शिस्त राखणें, सभेचें मत जाहीर करणें, मंजूर झालेले ठराव ज्याचे त्याच्याकडे पाठविणें, मतांची मोजदाद करून निकाल देणें, जरूर तेव्हां वादविवाद थांबविणें इत्यादि कामें त्याला अध्यक्ष या नात्यानें करावीं लागतात. सभागृहांत गैरशिस्त वर्तन करणाऱ्या सभासदास हांकून देण्याचा अधिकार त्याला असतो व त्याच्या हुकुमाविरुद्ध अपील चालत नाहीं. एकंदरीनें सभेंत उच्च वातावरण कायम राहील अशी तजवीज ठेवण्याचें बिकट काम त्याला करावें लागतें. सर्व सभासद त्याला उद्देशून भाषणें करितात व सभेचें काम चालू असतां कोणतेंही शंकास्थल आढळून आल्यास स्पीकरला निर्णय द्यावा लागतो. १९११-च्या पार्लमेंट-ॲक्टनें कोणतें बिल पैशासंबंधीं बिल (Money bill) आहे हें ठरविण्याचा अधिकार स्पीकरला देण्यांत आला आहे. एखाद्या बिलावर विभागणी (Division) करून मतें घेतलीं व तीं जर दोन्ही बाजूंचीं सारखीं भरलीं तर स्पीकर आपलें मत त्यांपैकीं एका बाजूस देतो, एरवीं आपलें मत तो केव्हांच देत नाहीं. वरील कामांच्या यादीवरून स्पीकरचें काम करणाऱ्या व्यक्तीच्या अंगीं कायद्याचें ज्ञान व निःपक्षपातबुद्धि यांचें वास्तव्य चांगलें पाहिजे हें उघड आहे. पार्लमेंटची निवडणूक झाली कीं कॉमन्ससभेचें पहिलें काम स्पीकरची निवडणूक हेंच असतें. बहुतकरून पूर्वीचा स्पीकर काम चालविण्यास समर्थ असल्यास त्याची या जागीं पुनः पुनः निवडणूक होते. ही जागा पक्षभेदातीत मानली जात असल्यानें कोणता पक्ष अधिकारारूढ होणार या गोष्टीचा स्पीकरच्या निवडणुकीशीं कांहीं संबंध नसतो. काम सोडल्यावर स्पीकरला बहुधा उमराव बनविण्यांत येतें. स्पीकरच्या अधिकाराची साक्ष म्हणजे एक गदा (Mace) असून सभेचें काम चालू असतां ती टेबलावर ठेविलेली असते. डेप्युटी स्पीकर म्हणून दुसरा अधिकारी असतो. स्पीकर गैरहजर असतां किंवा कॉमन्ससभा जेव्हां कमिटी या नात्यानें काम

करिते त्या वेळीं डेप्युटी स्पीकर अध्यक्षपद स्वीकारितो. क्लार्क ऑफ दी हाउस म्हणून आणखी एक अधिकारी असून सर्व हुकुमांवर सह्या करणें, झालेल्या कामाची नोंद ठेवणें वगैरे कामें त्याजकडे असतात. तसेंच प्रत्येक पक्षाचे व्हिप (चाबूक) म्हणून अधिकारी असतात. त्यांचें काम आपापल्या पक्षाचे जास्तींत जास्त सभासद सभेस हजर ठेवण्याचें असतें. अधिकारारूढ पक्षाच्या व्हिपचें काम 'ज्यूनिअर लॉर्ड्स ऑफ दी ट्रेझरी' हे खजिन्याकडील अधिकारी करितात. त्यांना आपल्या पक्षाचे जास्तींत जास्त सभासद हजर ठेवून कॉमन्ससभेंत एकसारखी सरकारची सरशी होत राहील अशी तजवीज करावी लागते.

**७. सभासदांचे हक्क** (Privileges). कॉमन्सच्या प्रत्येक सभासदाचा एक महत्त्वाचा हक्क म्हटला म्हणजे भाषणस्वातंत्र्य (Freedom of speech) हा होय. कोणत्याही सभासदास सभेंत मोकळेपणानें बोलतां येतें व कोणाही इसमाविरुद्ध अथवा संस्थेविरुद्ध आपल्याला असलेली माहिती उघडपणें सभेपुढें मांडतां येते. त्याबद्दल त्याच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद करितां येत नाहीं. मात्र सभेला एखादें भाषण अश्लील अगर शिष्टाचारास सोडून आहे असें वाटल्यास ती सभासदास शिक्षा करूं शकते. सभासदाचा दुसरा महत्त्वाचा हक्क म्हटला म्हणजे कैद केलें न जाण्याचा (Freedom from arrest) होय. बैठक सुरू होण्यापूर्वी चाळीस दिवस, बैठक चालू असतां, व संपल्यानंतर चाळीस दिवस सभासदास कैद करितां येत नाहीं. पूर्वी लंडनला जाण्यायेण्यास बरेच दिवस लागत व त्यामुळें मागें पुढें ही चाळीस दिवसांची पुस्ती ठेवण्यांत आली. खून, मारामाऱ्या, चोऱ्या इत्यादि फौजदारी गुन्ह्यांचे बाबतींत हा हक्क लागू नाहीं. कॉमन्सच्या सभासदांस स्पीकरतर्फे राजाची सामुदायिक भेट घेण्याचा हक्क असतो. हे सर्व हक्क पार्लमेंटची बैठक सुरू होतांना स्पीकरनें राजापासून मागून घ्यावयाचे अशी वहिवाट आहे.

**८. सभेचीं कामें व अधिकार** (Functions and Powers). कॉमन्ससभेचीं मुख्यतः चार प्रकारचीं कामें आहेत. (१) करासंबंधीं सर्व बिलांचा या सभेंत प्रथम उपक्रम होतो व उभारण्यांत आलेला पैसा या सभेच्या संमतीनें खर्च होतो. १९११च्या पार्लमेंट ॲक्टनें असें ठरविलें आहे कीं पैशासंबंधीं बिलें कॉमन्सनीं मंजूर केल्यावर लॉर्डांनीं मंजूर केलीं नाहींत तर एक महिन्यानें राजाच्या सहीनें कायदे बनावीं. अशा रीतीनें

तिजोरीवर कॉमन्ससभेचा अनन्यसाधारण ताबा बसला आहे. ( २ ) राजा व लॉर्ड्ससभा यांच्याशीं सहकार करून कायदे करण्याचें काम ही सभा पार पाडते. ( ३ ) बिल व सूचना पुढें असतां तत्संबंधीं सार्वजनिक प्रश्नावर चर्चा करण्याचें काम ( Deliberation ) ही सभा करते. १८८०च्या सुमारास आयरिश राष्ट्रीय पक्षानें पार्नेलच्या नेतृत्वाखालीं कॉमन्ससभेंत मोकळेपणीं चर्चा चालावी या संप्रदायाचा उपयोग लांब लांब भाषणें करून सभेचा वेळ घ्याव-याचा व तिच्या हातून कोणतेंच काम होऊं द्यावयाचें नाहीं इकडे केला. तेव्हां-पासून पुरेशी चर्चा झाली असें आढळून आलें कीं, शंभर सभासद अनुकूल असल्यास कोणाही सभासदाच्या सूचनेवरून वादविवाद बंद करण्याचा अधि-कार स्पीकरला देण्यांत आला. अशा रीतीनें कोणत्याही प्रश्नावर चर्चा करण्याचा मर्यादित स्वरूपाचा हक्क कॉमन्ससभा हल्लीं वजावते. ( ४ ) सरकारवर दाब ठेवणें हें या सभेचें चौथें काम होय. प्रधानांना सभासद प्रश्न विचारतात, तसेंच ठराव पास करून सरकारी कामकाजावर आपलें मत व्यक्त करण्याची या सभेची पद्धति आहे. प्रश्न व ठराव या सौम्य उपायां-खेरीज तात्पुरत्या तहकुबीची सूचना ( Adjournment Motion ) पास करून घेऊन एखाद्या जिव्हाळ्याच्या सार्वजनिक प्रश्नाचा मोकळेपणें खल करणें, एखाद्या खात्याच्या खर्चांत काट ( Cut ) मंजूर करणें, सरकारवर प्रत्यक्ष निंदाव्यंजक ठराव ( Vote of censure ) पास करणें, किंवा सबंध कर-उभारणीचें बिल ( Finance Bill ) फेटाळून लावणें, असले चढत्या पायरीचे कडक उपाय कॉमन्सच्या हातीं असतात; ते योजून आपला सरकारवरील अविश्वास कॉमन्सना व्यक्त करितां येतो. जर अशा रीतीनें कॉमन्सनीं आपली तीव्र नापसंती प्रदर्शित केली तर प्रधानमंडळानें एक तर राजीनामा द्यावा किंवा पार्लमेंटची नवी निवडणूक करावी याशिवाय या पेंचांतून सुटण्यास तिसरा मार्ग रहात नाहीं. तेव्हां एकंदरीनें आयव्ययावरील नियंत्रण, सार्वजनिक प्रश्नांची चर्चा व नापसंतीचे ठराव या कारणांनीं कॉमन्ससभेचा प्रधानमंडळावर ताबा चालतो; तसेंच त्या सभेंत ज्या पक्षाचें बहुमत असेल त्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें प्रधानमंडळ बनतें व कॉमन्सचा प्रधानमंडळावर अवि-श्वास दिसून आला कीं, प्रधानमंडळ ढांसळतें. यावरून सर जॉन सीली या प्रसिद्ध ग्रंथकारानें कॉमन्ससभेस सरकार निर्माण करणारी संस्था (Govern-

ment-making organ ) असें योग्य नांव दिलें आहे. आतां कॉमन्ससभेच्या हातून आपलीं कामें नीटपणें व बिनहरकत पार पडावीं म्हणून तीस कांहीं अधिकार आहेत. ( १ ) सभेच्या इभ्रतीस धक्का बसेल असें वर्तन करणाऱ्या इसमास अटक करण्याचा अधिकार सभेस आहे. ही अटक पार्लमेंटची बैठक चालू असेपर्यंत करितां येते. बैठक संपली कीं गुन्हेगार मुक्त होतो. ( २ ) मंत्र्यानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यास लॉर्ड्सपुढें त्याची चौकशी ( Impeachment ) चालविण्याचा अधिकार कॉमन्ससभेस आहे. मात्र अलीकडे हा अधिकार उपयोगांत आणण्याची जरूरी पडत नाहीं. ( ३ ) वादग्रस्त निवडणुकीची चौकशी करून निकाल देण्याचा अधिकार कॉमन्ससभेचा आहे; पण हल्लीं हें काम न्यायकोर्टाकडे सोंपविलें आहे. ( ४ ) तसेंच स्पीकर व सर्व सभासद यांना मिळून राजाची भेट घेतां येते. ( ५ ) सभेचें काम कोणत्या क्रमानें व पद्धतीनें चालावयाचें हें सभा ठरवितें. ( ६ ) सभेंत होणारे वादविवाद गुप्त राखण्याचा अधिकार कॉमन्ससभा अठराव्या शतकांत गाजवीत असे व राजाविरुद्ध हा सभेनें मोठा अधिकार मिळविला अशी त्या काळीं समजूत होती. पण हल्लीं सभेची विश्वसनीय हकीकत सरकारी रीतीनें प्रसिद्ध करणें हा कॉमन्ससभेचा मोठा अधिकार म्हणून मानण्यांत येतो.

---

## ५. लॉर्ड्स--सभा ( House of Lords ).

१. **लॉर्ड्ससभेचा इतिहास.** चौदाव्या शतकांत पार्लमेंटच्या दोन सभा वेगळ्या झाल्या तेव्हांपासून धर्मसुधारणेच्या काळापर्यंतचा लॉर्ड्ससभेच्या इतिहासाचा पहिला भाग होय. या काळीं लॉर्डांची संख्या थोडी म्हणजे सवाशेंच्या जवळपास असून त्या सभेंत पारमार्थिक उमरावांचें माताधिक्य असे. तसेंच सरंजामी पद्धतीमुळें समाजावर उमरावांचें वर्चस्व असे; तेव्हां राजावर दाब पाडून पार्लमेंटच्या हक्कांची वाढ या काळीं उमरावांनींच केली. पंधराव्या शतकांत झालेल्या यादवींत अनेक सरदार-घराणीं नष्ट झालीं. सातव्या हेन्रीच्या कारकीर्दीच्या आरंभीं ऐहिक उमरावांची संख्या अवघी एकुणतीस होती. लवकरच धर्मसुधारणेच्या वेळीं मठविध्वंस झाल्यानें

पारमार्थिक उमराव कमी झाले व तेव्हांपासून लॉर्ड्ससभेंत ऐहिक उमरावांचें मताधिक्य झालें. लॉर्ड्ससभेच्या इतिहासांतील दुसरा काल म्हणजे धर्मसुधारणेपासून क्रांतीपर्यंतचा (१५३४--१६८८) होय. या वेळीं लॉर्डांची मोठी हलाखीची स्थिति होती. ट्यूडर राजांनीं मध्यमवर्गास उत्तेजन दिलें. त्यामुळें कॉमन्स--सभा जोरदार झाली व तिनेंच स्टुअर्टांशीं झगडा केला. १६४९पासून १६५७पर्यंत लोकसत्ताकाच्या वेळीं तर लॉर्ड्ससभा अजिबाद बंद करण्यांत आली होती. १६८८च्या क्रांतीपासून १८३२पर्यंत तिसरा खंड होय. या कालांत इंग्लंडांत श्रीमंत व्हिग घराण्यांची सत्ता चालू होती. कॉमन्समधील बरेच सभासद लॉर्डांचे मिंधे असत; त्यामुळें या काळांत लॉर्डांनीं राजकीय वैभव भोगिलें. याच अवधींत मंत्रिमंडळाची वाढ होत होती व त्यांत उमरावांचे पुढारी प्रमुखपणें असत. १७०७त स्कॉटलंडचा संयोग व १८००त आयर्लंडचा संयोग होऊन तेथील उमरावांची लॉर्ड्ससभेंत भर पडली. तसेंच तिसऱ्या जॉर्जच्या वेळीं व पुढें व्हिक्टोरिआच्या वेळीं नवीन लॉर्ड बनविण्याच्या राजाधिकाराचा उपयोग करण्यांत येऊन उमरावांची संख्या फार फुगली. १८३२-नंतरचा काल म्हणजे लॉर्ड्ससभेच्या इतिहासाचा चौथा खंड होय. या कालांत मध्यमवर्ग सत्ताधीश झाला व लॉर्डांचा अधिकार कमीकमी होत गेला. लॉर्डांनीं आर्थिक बिलांत ढवळाढवळ करूं नये याबद्दल १८६१त ग्लॅडस्टननें व १९०९त लॉइड जॉर्जनें आग्रह धरिला. शेवटीं १९११च्या पार्लमेंट--अॅक्टनें आर्थिक बाबतींत लॉर्डांचा अधिकार नाहींसा झाला व इतर कायदे करण्याच्या बाबतींत कॉमन्सहून दुय्यम दर्जा त्या सभेस प्राप्त झाला.

२. **लॉर्ड्ससभेची रचना.** (१) लॉर्ड्ससभेंत धर्माधिकारी सभासद सहवीस आहेत. हेच धार्मिक उमराव (Spiritual Peers) होत. इंग्लिश धर्मखात्यांतील दोन आर्चबिशप व चोवीस बिशप असा त्यांच्यांत भेद असून ते आपल्या जागेवर असतपर्यंत लॉर्ड्ससभेचे सभासद असतात. (२) बाकीचे लॉर्ड्ससभेचे सभासद म्हणजे लौकिक उमराव ( Temporal Peers ) होत. त्यांत इंग्लिश, स्कॉटिश व आयरिश उमराव असे तीन प्रकार आहेत. इंग्लिश उमराव दोन तऱ्हांनीं बनलेले असतात. मध्ययुगांत मोठ्या जमीनदारांना बॅरन ( Baron ) म्हणत व ते लॉर्ड्ससभेचे सभासद असत. पुढें राजांनीं जे लोक आपल्या राष्ट्राची श्रेष्ठ कामगिरी बजावीत त्यांस राज-

पत्र ( Letters Patent ) देऊन उमराव बनविण्याचा क्रम सुरू केला व तो अजून चालू आहे. पुढें उमरावाचा ज्येष्ठ पुत्र आपल्या बापामागें उमराव व्हावयाचा अशी पद्धति पडली. अशा रीतीनें हल्लींचे पिढीजाद उमराव अस्तित्वांत आले व त्यांच्यांत पांच दर्जे रूढ झाले. व्हायकाउन्ट, बॅरन, अर्ल, मार्क्किस व ड्यूक असा त्यांचा चढता क्रम आहे. इंग्लिश पदवी धारण करणारे ऐहिक उमराव ६४९ असून ते सर्व व्यक्तिशः निमंत्रणावरून लॉर्ड्स-सभेंत बसतात. लॉर्ड सिंह हे हिंदी गृहस्थ बॅरन असून लॉर्ड्ससभेचे सभासद झाले आहेत ( १९१९ ). ( ३ ) दर पार्लमेंटच्या आरंभीं स्कॉटिश उमरावांनीं निवडून दिलेले सोळा स्कॉटिश उमराव स्कॉटलंडच्या वतीनें लॉर्ड्ससभेंत बसतात. ( ४ ) आयर्लंडमधील उमराव आपल्यापैकीं सोळा प्रतिनिधि निवडतात व ते आपल्या हयातीपर्यंत लॉर्ड्ससभेचे सभासद असतात. त्यांच्या जागा जसजशा रिकाम्या होतील तसतशा नव्या निवडणुकी करून भरल्या जातात. ( ५ ) याशिवाय आपल्या हयातीपर्यंत लॉर्ड बनविलेले सहा कायदे-पंडित लॉर्ड्ससभेचे सभासद असतात. राजांनीं पिढीजाद उमराव बन-विण्याचा अधिकार प्राचीन कालापासून अनुभविला आहे; पण तहाहयात उमराव ( Life Peer ) बनविण्याचा अधिकार त्यांस नव्हता. तेव्हां १८७६ व १९१३ या वर्षी ' अपीलेट ज्युरिस्डिक्शन ॲक्ट ' पास होऊन राजास प्रथम तीन व नंतर सहा कायदेपंडितांस तहाहयात उमराव बनवि-ण्याचा अधिकार मिळाला. वरचेवर राजीनामे दिले गेल्यानें तहाहयात लॉर्डांची संख्या वाढूं शकते. हल्लीं लॉर्ड्ससभेच्या सभासदांची संख्या पुष्कळच फुगली असून ती सातशेंवर आहे; पण सभेच्या बैठकीस बहुतकरून फार थोडे सभा-सद हजर राहतात. या सभेंत आनुवंशिक सभासदांचें जंगी बहुमत अस-ल्यानें ही सभा पिढीजाद श्रीमंतांचें आगर म्हणण्यास हरकत नाहीं. लॉर्ड चॅन्सेलर हा क्याबिनेटमधील प्रधान या सभेचा अध्यक्ष असतो. लोंकरीची गादी घातलेली खुर्ची ( Woolsack ) हें चॅन्सेलरचें आसन असून लोंकर हा पदार्थ इंग्लंडच्या व्यापारांत एके काळीं अतिशय महत्त्वाचा समजला जात होता याची साक्ष वुल्सॅक अजून देत आहे. चॅन्सेलर हा लॉर्ड असलाच पाहिजे असा नियम नाहीं. तथापि ही जागा मिळतांच ती धारण करणारास बहुशः लॉर्ड बनविण्यांत येतें. स्पीकरची जशी कॉमन्ससभेवर हुकमत चालते तशी

चॅन्सेलरची लॉर्ड्ससभेवर चालत नाहीं. उमरावमंडळी सभासदांना उद्देशून भाषणें करितात; तसेंच दोन सभासद एकदम बोलावयास उठले तर त्यांपैकीं कोणास बोलूं द्यावयाचें हें सभाच ठरविते. एकंदरींत हाउस ऑफ लॉर्ड्स-मध्यें बहुतेक सर्व गोष्टींचा निकाल सभेंतील बहुमतानें होतो. चॅन्सेलर केवळ सभेचें काम चालू ठेवण्यासाठीं अध्यक्षपदावर आरूढ असतो इतकेंच. चॅन्सेलर हा न्यायखात्यांतील मुख्य अधिकारी असून सर्व वडे न्यायाधिकारी नेमण्याचें काम त्याजकडे असतें. तसेंच नवीन पार्लमेंट बोलवावयाची असतां सभासदांना निमंत्रणपत्रिका ( Writs ) त्याच्या कचेरींतून रवाना होतात.

**३. लॉर्ड्ससभेचीं कामें.** कायदे करणें, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करणें व न्यायदान करणें हीं तीन कामें लॉर्ड्ससभेकडे आहेत. (१) कायदे करण्याच्या बाबतींत कॉमन्स व राजा यांशीं उमरावांस सहकार करावयाचा असतो. या बाबतींत लॉर्ड्ससभेस १९११पासून कॉमन्सपेक्षां दुय्यम दर्जा प्राप्त झाला आहे. एखादें बिल कॉमन्सनीं पास केल्यावर लॉर्डांस नापसंत असेल तर दोन वर्षे थोपवून धरितां येतें. या मुदतीनंतर एकट्या कॉमन्सच्या पसंतीनें त्यास कायद्याचें स्वरूप येतें. पैशाच्या बिलासंबंधीं तर काडीचीही सत्ता लॉर्डांस राहिली नाहीं. ( २ ) कोणत्याही सार्वजनिक प्रश्नावर चर्चा करण्याचें काम ही सभा कॉमन्सप्रमाणेंच करिते व या सभेंत बरेच ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध असे राजकारणांतील मुरब्बी बसत असल्यानें तेथील वादविवाद मोठे ज्ञानप्रद होतात. ( ३ ) लॉर्ड्ससभेचें तिसरें व महत्त्वाचें काम म्हणजे न्यायदानाचें. मध्ययुगांत राजे उमरावांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करीत व न्याय देत. त्या काळापासून या सभेचें न्यायदानाचें काम चालत आलें आहे. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी तहाहयात लॉ-लॉर्ड्स बनविण्याची तजवीज होऊन लॉर्ड्ससभेच्या हातून वरिष्ठ न्यायकोर्टाचें काम योग्य रीतीनें बजाविलें जाण्याची व्यवस्था झाली आहे.

**४. लॉर्डांचे हक्क** ( Privileges ). भाषणस्वातंत्र्य, कैद केलें न जाण्याचा हक्क, व लॉर्ड्ससभेस उपद्रव करणाऱ्या इसमास अटक करण्याची सत्ता हे हक्क कॉमन्सप्रमाणें लॉर्डांनाही असतात. प्रत्येक उमरावास राजाची व्यक्तिशः भेट घेतां येते; तसेंच या सभेच्या प्रत्येक सभासदास पार्लमेंट भरतेवेळीं व्यक्तिशः आमंत्रण ( Individual writ ) जातें. एखाद्या उमरावास सभेंतील बहुमतवाल्यांचा निर्णय मान्य नसल्यास आपल्या मुद्द्यांसह

तक्रारीची नोंद लॉर्ड्ससभेच्या हकीकतनाम्यांत (Journal) करून ठेवतां येते. १८६८पर्यंत उमरावास आपलें मत सभेस हजर न राहतां इतर सभासदातर्फें (By proxy) देतां येत असे; पण त्या सालापासून ही व्यवस्था बंद झाली. एखादा सभासद हाउस ऑफ लॉर्ड्समध्यें बसण्यास लायक आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार लॉर्ड्ससभेस आहे. १८५६त लॉर्ड वेन्स्लीडेल या तहाहयात उमरावास सभेंत बसण्याची मनाई करून हा अधिकार सभेनें गाजविला. तसेंच लॉर्ड्ससभेंत बसण्यास पात्र असणाऱ्यास सभेचें आमंत्रण गेलेंच पाहिजे असा आग्रह ही सभा धरिते; १६२६सालीं अर्ल ऑफ ब्रिस्टल यास पहिल्या चार्लसनें आमंत्रण पाठविलें नव्हतें; लॉर्ड्ससभेनें यावर तक्रार करून ब्रिस्टलला आमंत्रण पाठविणें राजास भाग पाडिलें. व प्रत्येक उमरावाचा सभेंत बसण्याचा हक्क शाबूत राखिला.

**५. लॉर्ड्ससभेचे उपयोग व सुधारणा.** लॉर्ड्ससभेचे उपयोग मुख्यतः तीन आहेत. लॉर्ड्ससभेंत शांत डोक्याचे व अनुभवी मुत्सद्दी बसत असल्यानें सामाजिक व राज्यकारभारविषयक अनेक उपयुक्त प्रश्नांची चर्चा त्या सभेंत होते व लोकमत त्या प्रश्नांकडे वेधण्यास तिचा चांगला उपयोग होतो. दुसरें असें कीं बऱ्याच प्रधानांस आपल्या खात्यावर देखरेख ठेवावयाची व कॉमन्समधील जोरदार टीकेस तोंड द्यावयाचें हें दुहेरी काम करण्याची ताकद नसते. तेव्हां त्यांना उमराव बनून लॉर्ड्ससभेच्या थंड वातावरणांत जातां येतें व कॉमन्समधील दगदग चुकवितां येते. पण लॉर्ड्ससभेचा मुख्य उपयोग म्हटला म्हणजे तींत अनुभवी व श्रीमंत लोक असल्यानें कोणताही कायदा विकाराच्या भरांत घाईनें पास होत नाहीं हा होय. १९११सालापासून लॉर्ड्ससभेचा बिल फेटाळून लावून तो प्रश्न जनतेपुढें मांडण्यास सरकारास भाग पाडण्याचा हक्क लुप्त झाला. आतां त्यांना एखादें बिल फार तर दोन वर्षें थोपवून धरितां येतें. हा लॉर्डांच्या हातीं राहिलेला क्षुद्र अधिकार पाहिला कीं, ही सभा केवळ बांडगुळासारखी झाली आहे असें वाटतें व इंग्लंडच्या हल्लींच्या राज्यव्यवस्थेच्या सुस्थितीबद्दल मन साशंक होतें. तथापि हा केवळ संक्रमणाचा काल आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. १९११च्या कायद्याच्या पूर्वभागांत लॉर्डांच्या सभेची पुनर्रचना करण्याच्या प्रश्नाचा उल्लेख आहे. पुढें महायुद्ध झालें नसतें तर व आपल्याला

विरोध करणाऱ्या लॉर्ड्ससभेला निष्प्रभ करणारा लिबरल पक्षच अधिकारारूढ राहाता तर कदाचित् हा पुनर्रचनेचा प्रश्न सुटलाही असता. महायुद्धानें बिकट परिस्थिति उत्पन्न झाली असतांही मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यानें १९१७सालीं लॉर्ड्ससभेची सुधारणा करण्याच्या हेतूनें चौकशी करून उपाय सुचविण्याकरितां लॉर्ड ब्राइसच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमिली. सुमारें सहा महिने काम करून त्या कमिटीनें कांहीं उपाय सुचविले. (१) लॉर्डांची संख्या कमी करून ती ३५० ते ४०० याच्या दरम्यान ठेवावी. (२) केवळ आनुवंशिक हक्कानें लॉर्ड्ससभेचे सभासद बनलेले नसावे, तर सुखवस्तु व अनुभवी श्रीमंत निवडणुकीच्या तत्त्वानें तींत यावे. (३) अशा सुधारलेल्या सभेस आर्थिक बाबतींत कांहीं अधिकार असूं नयेत; पण इतर कायदे करण्याच्या बाबतींत १९११च्या पूर्वीप्रमाणें कॉमन्सच्या बरोबरीनें हक्क असावेत. कमिटीच्या रिपोर्टांतील वरील शिफारसी मुख्य होत. पण पुढें सरकारनें या शिफारसी अंमलांत आणण्याची धडाडी दाखविली नाहीं व हल्लीं लॉर्ड्सभ म्हणजे पिढीजाद श्रीमंतांची एक अधिकारहीन संस्था असून यापलीकडे ति कांहीं किंमत नाहीं. इंग्लंडांत द्विसभात्मक कायदेमंडळ मध्ययुगापा चालू आहे. आधुनिक काळीं बहुतेक देशांत द्विसभात्मक कायदे स्थापिलीं गेलीं आहेत व अनेक ठिकाणीं तीं यशस्वी रीतीनें काम क आहेत. मात्र हल्लीं इंग्लंडांतील दुसऱ्या सभेस (हाउस ऑफ लॉ बेसुमार संख्या, आनुवंशिक हक्काचें जुनाट तत्त्व, व खऱ्या सत्तेचा अ त्रिदोष झाले असून हे दोष काढून टाकून लॉर्ड्ससभा जोमदार ब्रिटिश राष्ट्रापुढें महत्त्वाचा प्रश्न आहे. हल्लींच्या स्थितींत सर्व री सत्ता कॉमन्सच्या हातीं गेली असल्यानें इंग्लंडांत द्विसभात्मक कायदेमंडळ नामतः अस्तित्वांत आहे असें म्हणणें भाग आहे.

---

## ६. पार्लमेंटची कार्यपद्धति.

**१. पार्लमेंटची बैठक** (Session). दरसाल पार्लमेंट भरते; पण एकसारखी पार्लमेंट बसत नाहीं. तर ठराविक दिवसांची एक बैठक होते.

बैठक बहुधा फेब्रुवारीपासून ऑगस्टपर्यंत चालू असते. पार्लमेंटची बैठक चालू असते याचा अर्थ असा कीं लोकसभा ( कॉमन्स ) व उमरावसभा ( लॉर्ड्स ) यांचीं कामें चालू असतात. महायुद्धापासून पार्लमेंटची बैठक जानेवारीपासून डिसेंबरपर्यंत भरविण्याची वहिवाट पडली आहे. मध्यें ऑगस्ट-पासून नोव्हेंबरच्या सुरुवातीपर्यंत सुटी असते. तेव्हां पार्लमेंटच्या बैठकीचे ल्लीं दोन विषम भाग होतात. पहिला भाग मोठा असतो तो फेब्रुवारींत सुरू होऊन ऑगस्टपर्यंत टिकतो, व दुसरा छोटा असतो तो नोव्हेंबरांत सुरू होऊन डिसेंबरच्या वीस बावीस तारखेपर्यंत सुमारें दीड महिना चालतो. बैठक चालू असतां सभा रोजच्या रोज तात्पुरती तहकूब ( Adjourn ) करावी लागते. लागलीच दुसरे दिवशीं मागच्यापुढें काम सुरू होतें. बैठकी-च्या समाप्तीच्या वेळीं राजा तहकुबीचा हुकूम ( Prorogation ) काढतो मग बैठक संपते. या हुकुमांतच पार्लमेंटची पुनः केव्हां बैठक भरावयाची ती तारीख दाखल केलेली असते. निदान पांच वर्षांनीं पार्लमेंट बरखास्त (Dissolve ) झालीच पाहिजे. पार्लमेंट बरखास्त करावयाची म्हणजे राजा बरखास्तीचा जाहीरनामा काढतो व त्यांतच निवडणूक होऊन पुढील पार्लमेंट भरावयाची तो दिवसही सांगितलेला असतो. निवडणूक झाल्यावर हाऊस ऑफ कॉमन्सचें पहिलें काम स्पीकरची निवडणूक करणें हें होय. नंतर सभासद राजनिष्ठेची शपथ घेतात. कोणत्याही दिवशीं किमानपक्षीं किती सभासद हजर असले तर सभेचें काम चालावयाचें यासंबंधीं दोन्ही सभांचे नियम ठरलेले आहेत. कॉमन्ससभेंत निदान चाळीस सभासद हजर असले कीं सभेचें काम सुरू होतें व चालू रहातें, तर लॉर्ड्समध्यें सभेचें काम सुरू होण्यास व चालू रहाण्यास हजर सभासदांची किमान संख्या ( Quorum, कोरम ) अवघी तीन ठरलेली आहे. पार्लमेंटचें रोजचें काम बहुधा दुपारीं २॥ ते रात्रौ ११॥पर्यंत चालतें.

**२. पार्लमेंटची मुदत.** १६८८च्या क्रान्तीनें इंग्लंडांत सनदशीर युग सुरू झालें. तत्पूर्वी पार्लमेंटच्या बैठकी राजेलोकांच्या लहरीवर अवलंबून असत. दुसऱ्या चार्लसच्या कारकिर्दींत एकदां निवडलेली ‘ क्याव्हेलिअर पार्लमेंट ’ अठरा वर्षें टिकली तर पहिल्या जेम्सनें व पहिल्या चार्लसनें कित्येक वर्षें पार्लमेंट न भरवितांच राज्यकारभार केला. पार्लमेंट सत्ताधारी झाल्यावर

१६९४सालीं त्रैवार्षिक कायदा पास झाला. त्यायोगें तीन वर्षांतून एकदां तरी पार्लमेंट भरलीच पाहिजे व एकदां निवडलेली पार्लमेंट तीन वर्षांवर टिकावयाची नाहीं असे नियम झाले. एव्हांपासून पार्लमेंटची बैठक दरवर्षी भरूं लागली व निवडणूकही नियमितपणें होऊं लागली. १७१६त सप्तवार्षिक कायदा पास होऊन एकदां निवडलेल्या पार्लमेंटची कमाल मुदत सात वर्षांची ठरली. पुढें १९११सालपर्यंत ही व्यवस्था चालली. त्या वर्षी पास झालेल्या पार्लमेंट-अॅक्टनें पार्लमेंटची कमाल मुदत पांच वर्षें ठरविली. परंतु कर्मधर्मसंयोग असा कीं ज्या पार्लमेंटनें ही पांच वर्षांची मुदत ठरविली, तिच्याच हातून त्या कायद्याचें उल्लंघन झालें. १९१४सालीं महायुद्ध सुरू झालें, तेव्हां महायुद्ध चालू असतां देशांत निवडणुकीची दंगल उडविणें कोणास योग्य वाटलें नाहीं व १९१५सालीं पार्लमेंटनें एक कायदा पास करून आपली मुदत वाढवून घेतली. शेवटीं १९१०त निवडून आलेली ही पार्लमेंट १९१८सालीं आठ वर्षांनीं महायुद्ध संपल्यावर बरखास्त झाली. परंतु ही अपवादभूत गोष्ट घडली असून पार्लमेंटची हल्लींची कायदेशीर मुदत पांच वर्षांची ठरली आहे.

**३. राजाचें भाषण** ( King's Speech ). पार्लमेंटच्या बैठकीच्या आरंभीं हाउस ऑफ लॉर्ड्समध्यें राजाचें भाषण होतें. निवडणुकीनंतरची पहिलीच बैठक असल्यास स्पीकरची निवडणूक व सभासदांचा शपथविधि या दोन गोष्टी झाल्यावर राजाचें भाषण व्हावयाचें असा क्रम असतो. तें राजभाषण ऐकण्यास स्पीकरच्या पुढारीपणाखालीं कॉमन्ससभेचे सभासदही येतात. हें भाषण मंत्रिमंडळानें तयार केलेलें असतें. स्वदेशांतील व पराराष्ट्रीय राजकारणांतील महत्त्वाच्या गोष्टींचा त्यांत उल्लेख असतो व बैठकींत सरकार काय कामकाज करणार त्याची रूपरेखा आंखलेली असते. नंतर पार्लमेंटच्या दोन्ही सभांत राजभाषणावर चर्चा होते व या वेळीं भाषणांत ग्रथित झालेल्या सरकारी धोरणावर टीका करण्यास दोन्ही सभांना चांगली संधि मिळते. चर्चा संपल्यावर राजास दोन्ही सभांचें उत्तरात्मक भाषण ( Address in answer ) सादर करण्यांत येतें.

**४. बिलांचे प्रकार.** पार्लमेंटचें मुख्य काम म्हणजे कायदे करण्याचें. कायद्याच्या कच्च्या मसुद्यास बिल ( Bill ) असें म्हणतात. बिलाचा दोन्ही सभांत विचार होऊन त्यास पसंती मिळाली व त्याला पुढें राजाची संमति

मिळाली म्हणजे त्याला कायद्याचें स्वरूप येतें. बिलांचे दोन प्रकार होतात. एक खाजगी बिलें व दुसरा सार्वजनिक बिलें. खाजगी बिलें स्थानिक स्वरूपाचीं असतात. रेल्वे, ट्राम्वे बांधण्यास परवानगी, किंवा एखाद्या स्थानिक संस्थेची ड्रेनेज अथवा पाणी पुरवठ्याची योजना, असला या बिलांचा विषय असतो. खाजगी बिलें पार्लमेंटांत पास करून घेणें फार खर्चाचें असून स्थानिक व खाजगी योजनांस पार्लमेंटची संमति मिळविण्यास दुसऱ्या एका मार्गाचा अवलंब करणें सोईचें पडतें. तो म्हणजे आरोग्य खातें, अगर व्यापारी खातें असल्या सरकारी खात्यांकडून हंगामी हुकूम (Provisional order) मिळवावयाचा. सरकारी खातें चौकशी करून हुकूम देतें व पुढें 'हंगामी हुकूम' औपचारिक रीत्या पार्लमेंटपुढें मंजुरीकरितां मांडतें. अर्थात् आतां त्या योजनेस सरकारचा पाठिंबा मिळाल्यामुळें पार्लमेंट सहसा विरोध करीत नाहीं व ती मंजूर होते. बिलांचा दुसरा प्रकार जो सार्वजनिक बिलें (Public Bills), त्यांचे पुनः दोन प्रकार होतात. १ सामान्य सभासदानें पुढें मांडलेलीं, व २ सरकारनें पुढें मांडलेलीं. सार्वजनिक बिलांपैकीं आर्थिक बिलें हीं फार महत्त्वाचीं असल्यानें त्यांचा निराळा विचार करणें सोइस्कर होईल.

**५. उपक्रमाचा अधिकार** (Right of Initiation). सभेपुढें बिल मांडण्याचा अधिकार तत्त्वतः सभेच्या कोणाही सभासदास आहे. तथापि व्यवहारदृष्ट्या हा अधिकार सामान्य सभासदाकडून सहसा बजावण्यांत येत नाहीं. बहुतेक सर्व बिलें प्रधानमंडळाच्या प्रतिनिधींकडून सभेपुढें मांडण्यांत येतात. अशा बिलांस सरकारी बिलें म्हणतात. अलीकडे सरकारी बिलांचाच विशेष सुळसुळाट असून सामान्य सभासदांचा बिलांच्या उपक्रमाचा अधिकार जवळ जवळ लुप्तप्राय झाला आहे, व बिलें पहिल्यानें पुढें मांडण्याचा हक्क मंत्रिमंडळाच्या हातीं गेल्यानें त्याचें प्राबल्य फार वाढलें आहे.

**६. बिलाचे संस्कार**. कोणत्याही बिलाला कायद्याचें स्वरूप यावयाचें म्हटलें म्हणजे त्याला कॉमन्स व लॉर्ड्स या दोन्ही सभांतून कांहीं विशिष्ट संस्कारांतून जावें लागतें. (१) पहिल्यानें तें बिल कोणीं तरी सभेपुढें मांडावयाचें व मग त्याचें पहिलें वाचन व्हावयाचें; (२) नंतर त्याचें दुसरें वाचन व्हावयाचें. या वेळीं बिलांतील तत्त्व म्हणजे त्याचें प्रयोजन आणि सामान्य स्वरूप यासंबंधीं वादविवाद होऊन या मुद्द्यांची पूर्ण छाननी होते.

होमरूलसारख्या महत्त्वाच्या विषयावरील बिल असल्यास हें दुसरें वाचन आठवडेच्या आठवडे चालू रहातें. ( ३ ) या दुसऱ्या वाचनांतून बिल जर निभावलें तर सर्व *सभा कमिटी या नात्यानें बसावयाची व तिजकडून प्रकरण-वार त्या बिलाची छाननी व्हावयाची. जर कोणास दुरुस्त्या सुचवावयाच्या असल्या तर बिल + कमिटीपुढें असतांना त्या सुचवितां येतात व त्या पसंत झाल्यास बिलांत समाविष्ट करण्यांत येतात. (४) बिल कमिटींतून पार पडल्या-नंतर सर्व सभेस त्या बिलाचा रिपोर्ट करण्यांत येतो. कमिटीनें बिलांत फेर-फार केले असल्यास या रिपोर्टाच्या संस्काराच्या वेळींही आणखी वादविवाद होऊन नवे फेरफार होण्याचा संभव असतो. कमिटी या नात्यानें ज्याचा खल केलेला असतो अशा बिलांत त्या वेळीं फेरफार झाले नसल्यास त्या बिलापुरता रिपोर्टाचा हा संस्कार अजिबात वगळण्यांत येतो. ( ५ ) त्यानंतर बिलाचें तिसरें वाचन होऊन त्यावर सभेचीं मतें घेण्यांत येतात. या तिसऱ्या वाचनाचे वेळीं दुसऱ्या वाचनाप्रमाणें तपशील सोडून केवळ सामान्य दृष्टीनेंच बिलाचा खल होतो. या सर्व सोहळ्यांतून दोन्ही सभांमधून जेव्हां एखादें बिल यशस्वीपणें बाहेर पडेल तेव्हां त्याला पार्लमेंटची संमति मिळाली असें समजण्यास हरकत नाहीं. त्यानंतर एकदां त्यावर राजाची सही झाली म्हणजे त्या बिलाला पूर्णपणें कायद्याचें स्वरूप येतें.

**७. आर्थिक बिलें** ( Money Bills ), कन्ट्रोलर. कररूपानें पैसा उभारणें, सरकारला तो पुरविणें व खर्चावर देखरेख ठेवणें हें कॉमन्ससभेचें महत्त्वाचें काम होय. पावसाळ्यांत निरनिराळ्या खात्यांचे सरकारी अधिकारी

---

*सर्वच बिलांचा विचार करण्यास सर्व कॉमन्ससभा कमिटी या नात्यानें बसत नाहीं. सर्वसाधारण बिलांचा खल पार्लमेंटची निवडणूक झाल्याबरोबर सहा कायमच्या कमिट्या ( Standing Committee ) नेमिलेल्या असतात त्यांजपुढें होतो. या कमिट्यांत प्रत्येकीं ८०।९० सभासद असून एकंदर सभेंत निरनिराळ्या पक्षांच्या बलाचें जें प्रमाण असतें तेंच कमिट्यांतून राखिलेलें असतें. मात्र पैशासंबंधीं व इतर महत्त्वाच्या बिलांचा खल सर्व सभेच्या कमिटींत होतो.

+कांहीं प्रसंगीं दुसरें वाचन झाल्यानंतर कमिटीपुढें जाण्यापूर्वीं बिल एका निवडक कमिटीकडे ( Select Committee ) पाठविण्यांत येतें. ही कमिटी बहुधा बिलां-तील मुद्द्यांसंबंधीं चौकशी करण्याकरितां नेमिलेली नसून पुरावा गोळा करण्याचें काम करिते. अशा बिलास एकंदर सहा संस्कारांतून जावें लागतें.

आपल्या खात्याला पुढील सालीं काय खर्च लागणार याचीं अंदाजपत्रें ( Estimates ) तयार करितात व खजिन्याकडे पाठवितात. खजिन्यांत तीं मान्य झालीं कीं, खाजिन्याकडील मंडळी हा निरनिराळ्या खात्यांना लागणारा पैसा कररूपानें कसा उभा करावयाचा यासंबंधीं अंदाजपत्रें तयार करतात. पुढें क्याबिनेटमध्यें या सर्व अंदाजपत्रांवर खल होऊन तेथें त्यांजवर पसंतीचा छाप पडावा लागतो. मग या सर्व माहितीवरून फडणीस ( चॅन्सेलर ऑफ दी एक्स्चेकर ) पुढील वर्षाकरितां जमाखर्चाचें अंदाजपत्रक ( Budget ) तयार करितो. ३१ मार्चला वर्ष संपतें. त्याच्या अगोदर आपलें अंदाजपत्रक फडणीस कॉमन्ससभेपुढें मांडितो. या बजेटाचे मुख्य तीन भाग असतात. प्रथम जें वर्ष संपलें त्यांतील जमाखर्चाचा दुरुस्त अंदाज त्यांत असतो. मग भावी वर्षाचें कच्चें अंदाजपत्रक दिलेलें असतें. तिसरी गोष्ट म्हणजे उत्पन्नापेक्षां खर्च जास्त होणार असल्यास नवीन कर सुचविलेले असतात, व उत्पन्न खर्चाहून अधिक असल्यास कांहीं करांची माफी सुचविलेली असते. हाउस ऑफ कॉमन्स पुरवठा–कमिटी ( Committee of Supply ) या नात्यानें बसून निरनिराळ्या खर्चाच्या रकमांवर चर्चा करितें व या कमिटींत रकमा मंजूर करण्याचे ठराव पास होतात. त्याचप्रमाणें खर्चास लागणारा पैसा कररूपानें कसा उभा करावयाचा याचा खल हाउस ऑफ कॉमन्स हें साधन–कमिटी (Committee of Ways and Means ) या नांवानें बसून करितें, व करांसंबंधीं ठराव पास करितें. पुढें या ठरावांच्या आधारावर बिलें तयार होऊन तीं पास होतात. शेवटीं पुरवठा-कमिटींत पास झालेल्या ठरावांच्या आधारावर तयार केलेल्या सर्व बिलांचा मिळून एक कायदा ( Appropriation Act ) पास होतो, व साधन--कमिटींत पास झालेल्या करांसंबंधीं ठरांवाच्या आधारावर तयार केलेल्या सर्व बिलांचा मिळून कर--उभारणीचा कायदा ( Finance Act ) पास होतो. आर्थिक व्यवस्थेसंबंधीं पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ( १ ) आर्थिक बिलांसंबंधीं लॉर्डांस कांहींच अधिकार नाहीं. कॉमन्सनीं पास केलेलें आर्थिक बिल लॉर्डांनीं एक महिन्याच्या आंत पास केलें नाहीं तर राजाची संमति मिळून तें कायदा बनतें. ( २ ) खर्चासाठीं पैशाची मागणी

करावयाची ती प्रधानांनीं करावयाची व मग ती मागणी कॉमन्सनीं मंजूर करावयाची अशी वहिवाट आहे. केव्हांही सामान्य सभासदानें खर्च सुचवावयाचा नाहीं व सरकारनें सुचविलेल्या खर्चांत वाढही सुचवावयाची नाहीं; त्यानें सूचना करावयाची ती काटकसरीचीच करावयाची असा नियम आहे. सामान्य सभासदास जर खर्च सुचविण्याची मुभा ठेविली तर उधळपट्टी खास होईल व लोकांवरील कराचा बोजा फार वाढेल. तेव्हां सरकारनें मागणी करावी व कॉमन्सनीं ती पुरवावी हा प्रघात उत्तम आहे असें म्हणणें भाग पडतें.(३) तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरकारी खर्चाचे दोन भाग असतात. एक भाग पार्लमेंटच्या कायमच्या कायद्यांनीं मंजूर झालेला; या भागाला 'कन्सॉलिडेटेड फंड सर्व्हिसेस' असें नांव असून त्यांत राष्ट्रीय कर्जावरील व्याज, राजाची नेमणूक, न्यायाधिशांचे पगार इत्यादि खर्च येतात. दुसरा भाग म्हणजे एका वर्षापुरता मंजूर केलेला. हा पार्लमेंटनें मंजूर करावयाचा असतो. यांत सैन्य, आरमार, विमानदल यांचा खर्च व सर्व प्रधानांचा पगार हे येतात. याला 'सप्लाय सर्व्हिसेस' म्हणतात. हा खर्च ॲप्रोप्रिएशन ॲक्टनें एका वर्षापुरताच मंजूर करण्यांत येतो. या रीतीनें कॉमन्सचा कारभारीमंडळावर ( Executive ) चांगला दाब रहातो. आतां कॉमन्सचा तिजोरीवरील ताबा नीट रहावयाचा तर त्यांनीं पैसा मंजूर केल्यावर तो ज्या कार्यार्थ मंजूर केला तिकडेच तो खर्चिला जाणें जरूर आहे. हा खर्चावरील ताबा सिद्ध होण्यासाठीं एक कन्ट्रोलर ॲंड ऑडिटर जनरल ( मुख्य व्ययनियामक व हिशेबतपासनीस ) हा बडा अधिकारी नेमिलेला असतो. त्याच्याकडे खजिन्यांतून खर्च होणाऱ्या रकमांस मंजुरी देण्याचें व सर्व खात्यांचे हिशेब तपासण्याचें काम असतें. त्याच्या मंजुरीशिवाय खजिन्यांतून एक पैही खर्च केली जात नाहीं. तो सर्व हिशेब तपासतो व शेवटीं सर्व रकमा पार्लमेंटच्या हुकुमाप्रमाणें खर्च झाल्या असल्याचा रिपोर्ट करितो. त्याचा पगार कायम खर्चांतून होतो व अशा रीतीनें त्याचें स्वातंत्र्य राखिलेलें असतें. कन्ट्रोलरचा रिपोर्ट कॉमन्ससभेची 'पब्लिक अकाउन्ट्स कमिटी' तपासते व पार्लमेंटच्या मंजुरीप्रमाणें रकमा प्रत्यक्ष खर्चीं पडल्या असल्याबद्दल कॉमन्ससभेस अहवाल सादर करिते. अशा रीतीनें सरकारच्या जमाखर्चावर कॉमन्ससभेस आपला अंमल चालवितां येतो.

८. **इतर कामें व सरकारवर दाब.** पार्लमेंटमध्यें केवळ कायदे करण्याचें व तिजोरीवर ताबा ठेवण्याचें तेवढें काम चालत नाहीं, तर सरकारवर टीका करावयाची व सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नांचा खल करावयाचा हींही कामें होतात. सरकारी खात्यांतील व्यवस्थेसंबंधीं प्रधानांस प्रश्न विचारण्याचा प्रत्येक सभासदास हक्क असतो व त्यायोगें सरकारी कृत्यांचें स्पष्टीकरण करून घेण्याची सभासदांस चांगली संधी मिळते. प्रधानांस एखादी गोष्ट जाहीर करावयाची असली तर एखाद्या सभासदाकडून प्रश्न विचारवून त्याचें उत्तर देण्याच्या निमित्तानें ते आपलें कार्य उरकून घेतात. राज्यकारभाराच्या व्यवस्थे-संबंधीं अथवा एखाद्या सार्वजनिक प्रश्नाकडे सरकारचें लक्ष वेधण्यासाठीं विरोधी पक्षाचे पुढारी सभासद एखादा ठराव (Motion) सभेपुढें मांडतात. असला ठराव पास करून त्या विषयासंबंधीं आपलें मत सभेस व्यक्त करतां येतें. बाब महत्त्वाची असली व कॉमन्समध्यें ठराव सरकारविरुद्ध पास झाला तर यापुढें कॉमन्सचा मंत्रिमंडळावर विश्वास नाहीं असा त्याचा अर्थ होतो. तेव्हां राजीनामा तरी द्यावा किंवा जनता आपल्या बाजूची आहे असें वाटत असल्यास पार्लमेंट बरखास्त करण्याचा सल्ला राजास द्यावा यांपैकीं कोणता तरी मार्ग मंत्रिमंड-ळास स्वीकारावा लागतो.

---

## ७. मंत्रिमंडळ (Cabinet).

१. **क्याबिनेटचा उदय.** मध्ययुगापासून प्रिव्ही कौन्सिल म्हणून एक सरदारांचें मंडळ असे, त्याचा सल्ला इंग्लंडचे राजे राज्यकारभार चालवितांना घेत. राजाचे मंत्री या कौन्सिलचे सभासद असत, व राजाचे जे हुकूम निघत ते कौन्सिलच्या सल्ल्यावरून राजा ( King in Council ) काढी. स्टुअर्टांच्या काळीं प्रिव्ही कौन्सिलच्या सभासदांची संख्या पन्नासपर्यंत वाढली. कारभाराचें धोरण ठरवून तें अंमलांत आणण्यास थोडी मंडळी असणें सोईस्कर पडतें, अधिक असल्यास घोटाळा मात्र उडतो. तेव्हां दुसरा चार्लस प्रधानांना व प्रिव्ही कौन्सिलच्या इतर मुख्य सभासदांना तेवढें आपल्या खाजगी

खोलींत(Cabinet) बोलावूं लागला, व त्यांच्याशीं खल करून राज्यकारभाराचें धोरण ठरवूं लागला. अशा रीतीनें मंत्र्यांची सभा (Cabinet Council) राजाच्या अध्यक्षतेखालीं भरण्याची चाल पडली. पुढें तिसरा वुइल्यम व ॲन यांनीं मंत्र्यांची सभा भरविण्याचा क्रम तसाच पुढें चालविला व क्याबिनेट स्थिर झाली. १६८८च्या क्रान्तीनें राजसत्तेवर पार्लमेंटनें अनेक बंधनें घातलीं; परंतु क्रान्तीनंतर लवकरच प्रधानांवरील राजाची हुकमत जाऊन पार्लमेंटची हुकमत त्यांजवर चालू झाली. हाच क्रान्तीचा महत्त्वाचा परिणाम होय. १६८८ची क्रान्ति म्हणजे मुख्यतः व्हिग पक्षाची करामत होती. तिसऱ्या वुइल्यमनें फ्रान्सशीं एकसारखें युद्ध चालविलें, त्यास व्हिग लोक पाठिंबा देत व टोरी विरोध करीत. प्रथम वुइल्यमनें आपण एका पक्षाचे पुढारी होऊं नये, तर राष्ट्राचे पुढारी असावें या हेतूनें आपले प्रधान दोन्ही पक्षांतून नेमिले. पण पुढें प्रधानांचें एकमेकांशीं जमेना व कॉमन्समध्यें व्हिग पक्षाचें बहुमत असल्यानें त्या सभेशींही प्रधानांचें जमेना. कायदे करतांना सर्व बाजूंनीं विचार झाला पाहिजे, तेव्हां कायदेमंडळांत देशांतील निरनिराळ्या मतांची मंडळी असलेली उत्तम; पण त्या कायद्यांचा अंमल करण्याचें काम बजाविण्यास एकविचाराची मंडळी असणें सोइस्कर होय. ही गोष्ट या वेळीं संडर्लंड या सूक्ष्मदर्शी मुत्सद्यानें ओळखिली व कॉमन्समध्यें ज्या पक्षाचें बहुमत आहे त्या पक्षाचेच सर्व प्रधान नेमावे असा सल्ला दिला. ही संडर्लंडची युक्ति वुइल्यमनें अंमलांत आणिली. मग व्हिग मंत्रिमंडळ तयार झालें. तें व्हिग जंटो ( Whig Junto ) या नांवानें प्रसिद्ध आहे. पुढें टोरींची कॉमन्समध्यें सरशी झाली. तेव्हां वुइल्यमनें व्हिग काढून टोरी नेमिले. या व्यवस्थेनें प्रधानांची एकजूट राहून कॉमन्सचाही त्यांस पाठिंबा मिळूं लागला. पुढें ॲन राणीचा टोरीपक्षाकडे कल होता तरी युद्धानुकूल म्हणून व्हिग मंत्रिमंडळ नेमणें तिला भाग पडलें. अशी एकपक्षीय प्रधानमंडळाची ( Party Government ) सुरुवात झाली. प्रथम मंत्र्यांच्या सभेंत राजा अध्यक्ष होई व चर्चा चालली असतां स्वतः निर्णय देई. पुढें १७१४त हॅनोव्हर घराण्यांतील पहिला जॉर्ज राजा गादीवर आला, तो मात्र राज्यकारभारापासून अगदीं अलिप्त राहूं लागला. पहिला जॉर्ज व त्याचा मुलगा दुसरा जॉर्ज यांना इंग्लिश येत नव्हतें व इंग्लिश राज्यकारभारांत ते मुळींच

लक्ष घालीत नसत. अर्थात् त्यांनीं मंत्रिमंडळाच्या सभेस हजर राहणेंच सोडून दिलें; मग अध्यक्षपद सोडलें हें सांगणें नकोच. अशा वेळीं वॉल्पोल या कर्तबगार प्रधानाच्या हातीं राज्यकारभार गेला व त्यामुळें इंग्लंडच्या राज्यपद्धतीस एक विशिष्ट वळण लागलें. नव्या व्यवस्थेंत मंत्र्यांच्या सभेंत अध्यक्ष होण्याचें, चर्चेच्या वेळीं निर्णय देण्याचें, तसेंच इतर प्रधानांच्या नेमणुका करण्याचें काम वॉल्पोलनें आपल्याकडे घेतलें. अशा रीतीनें इतर प्रधानांवर वॉल्पोलचें वर्चस्व बसल्यानें तो पहिला मुख्य प्रधान म्हणून प्रसिद्ध आहे. यापुढें सर्व प्रधान कॉमन्ससभेंत ज्या पक्षाचें बहुमत असेल त्या पक्षाचे असावयाचे व मंत्रिमंडळावर हुकमत चालविण्याचें काम मुख्य प्रधानानें करावयाचें अशी व्यवस्था चालू झाली. आतां राज्यकारभाराच्या जबाबदारींतून राजा सर्वस्वी मुक्त झाला व प्रधान नामतः राजाचे नोकर पण वस्तुतः पार्लमेंटला जबाबदार अशी पद्धति रूढ झाली. सारांश दुसऱ्या चार्लसच्या वेळीं कारभारीमंडळी चर्चा करून राज्यकारभाराचें धोरण ठरवूं लागली, तिसऱ्या व्हुइल्यमच्या वेळीं ही कारभारीमंडळी एका पक्षाची असावयाची असा प्रघात पडला, व दैववशात् हॅनोव्हर घराण्याचे पहिले दोन राजे उदासीन निघाल्यानें मुख्य प्रधानाची उत्पत्ति झाली. अशा रीतीनें मुद्दाम घडवून आणिलेल्या कायद्यांनीं नव्हे, तर सहज निरनिराळे योगायोग जमून येऊन मंत्रिमंडळाच्या पद्धतीचा ( Cabinet Government ) उदय झाला. पुढें तिचा विकास होऊन तिचें हल्लींचें स्वरूप निश्चित झालें. ही क्याबिनेट पद्धति १६८८च्या क्रान्तीचा अप्रत्यक्ष पण महत्त्वाचा परिणाम असून कोणत्याही कायद्याचा तिला आधार नाहीं, तर ती रूढीवर ( Convention, कन्व्हेन्शन ) अधिष्ठित झाली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**२. क्याबिनेटचे पांच विशेष.** इंग्लंडांत मंत्रिमंडळाची पद्धति ( Cabinet system ) वॉल्पोलच्या वेळीं रूढ झाली व गेलीं दोनशें वर्षें तिचा अंमल त्या देशांत चालू आहे. अर्थात् या दीर्घकालांत तिचें स्वरूप निश्चित झालें असून कित्येक गोष्टी या पद्धतीचीं अवश्यक अंगें म्हणून ठरून गेल्या आहेत. त्या एकंदर पांच आहेत, त्या आपण आतां पाहूं.

( अ ) मंत्रिमंडळासंबंधीं पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे मंत्र्यांच्या सभांतून राजांची गैरहजिरी ही होय. पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज यांनीं इंग्लिश

भाषेच्या अज्ञानामुळें मंत्र्यांच्या सभेस हजर राहण्याचें सोडून दिलें. तिर
जॉर्जनें आपल्या हातीं सत्ता आणण्याची पुष्कळ खटपट केली, पण
नेटच्या सभेंत भाग न घेण्याचें धोरण त्यानें तसेंच चालविलें. अ
पुढें कायम राहिलें व हल्लीं राजानें क्याबिनेटच्या सभेस हजर रहावयाचें
हा इंग्लिश सनदशीर राज्यपद्धतीचा रूढिमूलक नियम होऊन बसला आहे.
गैरहजर राहिल्यानें मुख्य प्रधानाची उत्पत्ति झाली व मंत्र्यांना सभेंत मोकळ
मनानें चर्चा करितां येऊं लागली. तसेंच या व्यवस्थेनें राजा कांहीं अप
करीत नाहीं, ( The King can do no wrong ) हें सनदशीर त
प्रस्थापित होण्याची उत्कृष्ट सोय झाली, व त्याबरोबरच मंत्रिमंडळ आ
सर्व कृत्यांबद्दल पार्लमेंटला जबाबदार होय हा नियम अंमलांत आ

( आ ) मंत्रिमंडळाचा दुसरा विशेष म्हटला म्हणजे त्याला हाउस
कॉमन्समधील बहुमतवाल्या पक्षाचा पाठिंबा पाहिजे हा होय. निवडणुक
बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें मंत्रिमंडळ बनवावयाचें या पद्धत
विशेष सहज प्रस्थापित होऊं शकतो. तसेंच प्रधान कॉमन्स किंवा
सभेचा सभासद पाहिजेच हा नियमही या दृष्टीनें उपयोगीं पडतो.
न्सना जोंवर प्रधानांचें धोरण पसंत असतें तोंवर क्याबिनेटचा जोर
असतो. मात्र कॉमन्समध्यें जर त्यांचीं बिलें नापास होऊं लागलीं त
ळानें राजीनामा द्यावा किंवा पुनः पार्लमेंटची निवडणूक करावी याशि
तर नसतें. 'मंत्रिमंडळ कॉमन्समधील बहुमतवाल्या पक्षाची कार्यक
होय ' असें म्हणतात, त्यावरून हा दुसरा विशेष कळून येण्यासारखा

( इ ) दुसऱ्या विशेषाशीं निगडित असा मंत्रिमंडळाच्या पद्धतीच
विशेष आहे. तो म्हणजे सर्व प्रधान एकाच राजकीय पक्षाचे
जो राजकीय पक्ष कॉमन्समध्यें बहुसंख्य असतो त्याच पक्षाचे प्रधान
हें तत्त्व सावकाश अंमलांत आलें. ॲनच्या वेळीं व तिसऱ्या
मंत्रिमंडळांत बऱ्याच वेळां निरनिराळ्या पक्षांची भरती असे. पुढें ए
शतकांत विशिष्ट धोरणाचे लिबरल व कॉन्सर्व्हेटिव्ह असे दोन प्र
देशांत वावरूं लागले, व सुधारणा–कायद्यांनीं पार्लमेंट लोकमतनिदर्श
अर्थात् कॉमन्समधील बहुमतवाल्या पक्षाचेच सर्व प्रधान नेमण्यांत
पक्षास ' अधिकारारूढ पक्ष ' म्हणण्याची चाल पडली. अल्पसंख्

ी सरकारचे दोष दाखविण्यास दक्ष राहूं लागले व तो पक्ष 'विरोधी पक्ष' Majesty's Opposition ) म्हणून संबोधला जाऊं लागला. ीय मंत्रिमंडळाची पद्धति तिसऱ्या वुइल्यमच्या वेळींच प्रथम सुरू झाली व ं ती इतकी दृढमूल झाली आहे कीं, हीच पद्धति इंग्लंडची नेहमीं चालू णारी पद्धति होय असें मानण्यांत येतें. मात्र महायुद्धासारख्या संकटास ंड देतांना सर्व राष्ट्रानें एकीनें तें काम केलें पाहिजे यासाठीं त्या वेळीं निराळ्या पक्षांतील पुढाऱ्यांचें मिळून संमिश्र मंत्रिमंडळ ( Coalition vernment ) बनवितात; पण ही व्यवस्था अपवादभूत होय.

ई ) मंत्रिमंडळाचा चौथा विशेष म्हणजे सामुदायिक जबाबदारी ollective Responsibility ) होय. मंत्र्यांची सभा भरते, तींत होऊन जो निर्णय होतो तो सर्व मंत्रिमंडळानें मिळून केलेला ा. एखाद्या मंत्र्यानें चर्चेच्या वेळीं त्या निर्णयांत ग्रथित झालेल्या ा विरोध केलेला असला तरी तो निर्णय एकदां झाल्यावर तो सर्व ळाचा निर्णय असल्यानें त्याचा अंमल करण्यास सर्व मंत्रिमंडळानें एकीनें हिजे. याचाच एक महत्त्वाचा परिणाम म्हटला म्हणजे मंत्रिमंडळाच्या ळेली चर्चा गुप्त * राखावयाची, मुख्य प्रधानाच्या परवानगीशिवाय ष्टी बाहेर फोडावयाच्या नाहींत असा नियम आहे. पार्लमेंटशीं, जनतेशीं वागतांना मंत्रिमंडळानें एकीनें वागावयाचें असतें. ही एकी असावी कीं, क्याबिनेट जणूं एकच व्यक्ति आहे असें लोकांस वाटावें. ं मतभेद नसावेत किंवा नसतात असा याचा अर्थ नाहीं, तर राज्य-गीट चालावा म्हणून मुख्य प्रश्नांबाबत सर्व मंत्र्यांनीं एकीनें वाग-श्रय केलेला असतो इतकेंच. जर मंत्रिमंडळाचें एखादें महत्त्वाचें बिल ; तर सर्व प्रधानमंडळानें एकदम राजीनामा द्यावयाचा किंवा जनता

---

* टच्या सभांतील चर्चा टिपून ठेवण्याचा प्रघात पूर्वीं नव्हता. गेल्या महा- वेळीं लॉइड जॉर्जनें क्याबिनेटचें चिटणीसमंडळ (Cabinet Secretariat, सेक्रेटॅरिएट) नेमिलें. तेव्हांपासून क्याबिनेटच्या सभांची साग्र हकीकत लिहून ठेवण्याची वहिवाट पडली व तें काम या चिटणिसांवर सोंपविण्यांत आलें. तसेंच, निर्णय योग्य त्या खात्याच्या अधिकाऱ्यांकडे कळविण्याचें कामही हे हल्लीं उरकतात.

आपल्याला अनुकूल आहे असें वाटत असल्यास राजास पार्लमेंट बरखास्त करण्याचा सल्ला द्यावयाचा अशी वहिवाट साहजिकपणेंच रूढ झाली आहे. या मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीस राजकीय जबाबदारी असेंही केव्हां केव्हां म्हणतात. बाकी प्रधानानें आपापल्या खात्यांत केलेलें कृत्य किंवा दिलेला हुकूम कायदेशीर आहे कीं नाहीं याबद्दल तो प्रधान व्यक्तिशः जबाबदार असतो; म्हणजे तें कृत्य किंवा तो हुकूम बेकायदेशीर असेल तर त्या प्रधानावर कोर्टांत रीतसर खटला भरतां येतो. हीच प्रधानांची व्यक्तिगत जबाबदारी ( Individual Responsibility ) होय. ही सामुदायिक जबाबदारीहून भिन्न असून या दोहोंमधील भेद नीट मनांत बाणवावा.

( उ ) मुख्य प्रधानाची हुकमत ( Ascendency of the Prime Minister ) हा मंत्रिमंडळाच्या पद्धतीचा पांचवा विशेष होय. पार्लमेंटची निवडणूक झाली कीं बहुसंख्य पक्षाच्या पुढाऱ्यास राजा मुख्य प्रधान नेमतो; मग मुख्य प्रधान आपल्या अनुयायांपैकीं प्रमुख मंडळींतून इतर प्रधानांच्या नेमणुका करितो. मुख्य प्रधान हा देशांतील एका राजकीय पक्षाचा पुढारी असल्यानें त्याचें धोरण निश्चित असतें. इतर प्रधानांशीं सहानुभूतीनें वागून त्यांना तो योग्य दिशा लावून देतो. मंत्रिमंडळाच्या सभेंत योग्य रीतीनें चर्चा चालते व पुढें यामुळेंच मंत्रिमंडळ राजाशीं व पार्लमेंटशीं एकजुटीनें वागतें. "मुख्य प्रधान हा मंत्रिमंडळाच्या कमानीचा मधला चिरा होय" ( The Prime Minister is the keystone of the Cabinet arch ) हें मोर्लेचें वाक्य प्रसिद्धच आहे. मधला चिरा इतर चिऱ्यांच्या आधारानें आपल्या स्थानीं स्थिर होतो व त्या मधल्या चिऱ्यामुळें एकंदर कमान पूर्ण होते व टिकते. इतर प्रधानांचा मुख्य प्रधानास आधार मिळतो व मुख्य प्रधान इतरांस एका धोरणांत गोंवून सर्व मंत्रिमंडळाची मिळून एकशक्ति निर्माण करतो या दोन्ही गोष्टी मोर्लेच्या वरील अलंकारिक वाक्यांत ग्रथित झाल्या आहेत.

**३. मुख्य प्रधान.** क्याबिनेट–पद्धति सुरू झाली तेव्हांच वॉल्पोल मुख्य प्रधानगिरी गाजवूं लागला. पण मुख्य प्रधान ही पदवी इंग्लंडमध्यें दीर्घकाल अप्रिय होती व १९०५पर्यंत तिला सरकारी रीतीनें मान्यता मिळाली नव्हती. त्या वर्षीं मात्र लंडन ग्याझिटांत प्रिव्ही कौन्सिलच्या सभासदांची जी यादी

दिली आहे तींत आर्चबिशप ऑफ यॉर्कच्या मागून मुख्य प्रधानाचा निर्देश आहे. अशा रीतीनें मुख्य प्रधान हें पद औपचारिक रीत्या विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत मान्य नसलें तरी हें पद दोनशें वर्षांचें जुनें असून अठराव्या शतकांत वॉल्पोल व धाकटा पिट आणि एकोणिसाव्या शतकांत पील व ग्लॅडस्टन हे मुख्य प्रधान नामांकित होऊन गेले. मुख्य प्रधान राज्यकारभारांतील मुख्य स्थानीं विराजमान झाला असला तरी या जागेस पगार नाहीं. तेव्हां मुख्य प्रधान मंत्रिमंडळांतील दुसरी एखादी जागा पत्करितो. बहुतेक ती जागा म्हणजे "खजिन्याकडील पहिला लॉर्ड ( First Lord of the Treasury )" ही असते. या जागेला काम कांहींच नसतें. मात्र ती पगारी असल्यानें मुख्य प्रधानाला पगार मिळण्याची सोय होते. इतर प्रधानांस आपल्या खात्यावर देखरेख करणें, मंत्रिमंळाच्या सभेंतील चर्चेंत भाग घेणें, आणि पार्लमेंटच्या ज्या सभेचा तो सभासद असेल तींत सरकारी बाजूचें समर्थन करणें हीं तीन कामें करावयाचीं असतात. मुख्य प्रधानावर मुख्यतः पुढील पांच कामांची जोखीम पडते. ( १ ) मंत्रिमंडळाच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावयाचें व चर्चेच्या शेवटीं निर्णय व्हावयाचा तेव्हां अखेरचें मत त्याला असतें. इतर प्रधानांनीं त्याचें म्हणणें ऐकावें, नाहींतर आपल्या जागेचा राजीनामा द्यावा येवढाच मार्ग त्यांच्याकडे राहातो. ( २ ) सर्व प्रधानांच्या कामावर देखरेख ठेवून त्यांत मेळ राहील अशी व्यवस्था तो ठेवतो. मुख्यतः परराष्ट्रीय प्रधानाच्या कामावर मुख्य प्रधान विशेष काळजीपूर्वक देखरेख ठेवितो. परदरबारीं जाणारे खलिते त्याच्या नजरेखालून अवश्य जातात. ( ३ ) हल्लीं मुख्य प्रधान बहुतेक कॉमन्ससभेचा सभासद असतो. तेव्हां त्या सभेचा 'पुढारी' (Leader of the House) म्हणून सरकारी बाजू मांडण्याचें व तिचें समर्थन करण्याचें काम तो करतो. ( ४ ) कोणत्याही प्रश्नावरील मंत्रिमंडळाचे विचार राजास समजावून द्यावयाचें काम व राजाच्या इच्छा प्रधानांस कळवून मंत्रिमंडळाचें धोरण निश्चित करण्याचें काम त्याला करावें लागतें. जसा पार्लमेंटचा विश्वास मंत्रिमंडळावर असल्यानें तें पार्लमेंटच्यातर्फे व राजाच्या नांवानें कारभार चालवितें तसेंच मंत्रिमंडळाचें मुख म्हणजे मुख्य प्रधान होय. तेव्हां मंत्रिमंडळाचें धोरण राजापुढें किंवा पार्लमेंटपुढें मांडण्याचें काम तो करितो. ( ५ ) देशांतील एका नामांकित पक्षाचा पुढारी या नात्यानें व्याख्यानें

देऊन मुख्य प्रधान आपलें धोरण जनतेस वेळोवेळीं समजावून देतो, व निवडणुकीच्या वेळीं आपल्या पक्षास जनतेचा पाठिंबा मिळावा यासाठीं त्याचे प्रयत्न सतत चालू असतात. एकंदरीनें कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष, प्रधानांचा नेता, कायदेमंडळाचा पुढारी, मतदारांचा विश्वासनिधि, व राजाचा सल्लागार अशा पंचविध नात्यांनीं मुख्य प्रधानास कार्यें करावयाचीं असतात व जोंवर कॉमन्ससभेंतील बहुसंख्य सभासद त्याच्या पाठीशीं असतात तेथवर त्याच्या हातीं अमर्याद सत्ता असल्यानें 'राष्ट्रसूत्रधार' ही पदवी त्याला लावणें योग्य होईल.

४. **मंत्रिमंडळाची घटना.** हल्लीं इंग्लंडांत तीन प्रमुख राजकीय पक्ष आहेत; एक लिबरल, दुसरा कॉन्सर्व्हेटिव्ह व तिसरा लेबर किंवा मजूर. निवडणूक होऊन नवीन पार्लमेंट बनल्यावर कॉमन्समध्यें ज्या पक्षाचें बहुमत असेल त्या पक्षाच्या पुढाऱ्यास राजा मुख्य प्रधान नेमितो. मग तो मुख्य प्रधान आपल्या पक्षांतील प्रमुख मंडळीचें मंत्रिमंडळ तयार करतो. कॉमन्स-सभेंत कॉन्सर्व्हेटिव्हांची सरशी असली म्हणचे कॉन्सर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळ अधिकारारूढ होतें व त्या पक्षाच्या खालोखाल मतसंख्या असलेला पक्ष विरोधी पक्ष ( The Opposition ) म्हणून पार्लमेंटांत वागतो. मंत्रि-मंडळाची कांहीं तरी दिशा ठरलेली असते व कॉमन्ससभेंत त्याच्या बाजूचें मताधिक्य असेपर्यंत त्याला आपल्या दिशेनें कारभार चालवितां येतो. जेव्हां कॉमन्समध्यें मंत्रिमंडळाची बाजू खालावते व 'विरुद्ध' पक्षाचा जोर होऊन सरकारी बिलें नापास होऊं लागतात, तेव्हां मंत्रिमंडळ राजीनामा देतें; किंवा एकंदर देशांतील जनता आपल्या बाजूची आहे असें त्यास वाटत असल्यास पार्लमेंट बरखास्त करून नवी निवडणूक करण्याविषयीं राजास सल्ला देतें. जर नव्या पार्लमेंटांत मंत्रिमंडळास अनुकूल मंडळीचें मताधिक्य झालें तर तेंच मंत्रिमं-डळ कायम रहातें; नाहीं तर विरुद्ध पक्षाच्या मंत्रिमंडळाच्या हातीं राज्य-कारभार जातो. पार्लमेंटची कमाल मुदत पांच वर्षांची असते. तेव्हां निदान पांच वर्षांनीं निवडणूक व्हावयाचीच असते. कोणत्याही पक्षास अधिकारारूढ व्हावयाचें असेल तर आपल्या धोरणास जनतेची पसंती मिळविणें हाच त्याचा मार्ग होय. मतदारांनीं कॉमन्ससभेंत त्या पक्षाचे बहुसंख्य सभासद निवडून दिले कीं त्या पक्षाच्या पुढाऱ्यांच्या हातीं राज्यसूत्रें जावयाचीं. तेव्हां

इंग्लंडांत मतदारस्वरूपी जनतेच्या हातीं मंत्रिमंडळ बनविण्याचा सनदशीर अधिकार असल्यानें त्या देशांत जनता मुख्य राजकीय सत्ताधीश (Political Sovereign) आहे; तशीच तेथें वस्तुतः लोकशाही चालू असून नामतः राजसत्ता चालू आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

५. **मंत्रिमंडळाची रचना.** मंत्रिमंडळांतील प्रधानांची संख्या अनियमित असते. एकंदर संख्या सुमारें वीस बावीस असते. क्याबिनेटमध्यें बहुतकरून पुढील प्रधानांचा समावेश होतो.

१. **मुख्य प्रधान** (Prime Minister). खजिन्याकडील पहिला लॉर्ड.

२. **लॉर्ड चॅन्सेलर** (Lord Chancellor). हा न्यायखात्यांतील मुख्य अधिकारी असून लॉर्ड्ससभेचा अध्यक्ष असतो. याच्याकडे न्यायाधीश व न्यायखात्यांतील इतर बडे अधिकारी नेमण्याचें काम असतें.

३. **प्रिव्ही कौन्सिलचा अध्यक्ष** (Lord President of the Council).

४. **शिक्का बाळगणारा प्रधान** (Lord Privy Seal).

५. **फडणवीस** (Chancellor of the Exchequer). राज्यांतील आर्थिक व्यवस्था पाहणारा प्रधान. आयव्ययपत्रक कॉमन्सपुढें मांडून राष्ट्रीय जमाखर्चास पार्लमेंटची संमति मिळविणें हें याचें काम होय.

६. **परराष्ट्रीय मंत्री.** सुमंत (Secretary of State for Foreign Affairs).

७. **गृहमंत्री** (Secretary of State for Home Affairs). अन्तर्व्यवस्था. व्यक्तीवर दया करण्याच्या राजाधिकाराची बजावणी हा करितो.

८. **स्वायत्तराज्य-मंत्री व वसाहत-मंत्री** (Secretary of State for Dominion Affairs and Secretary of State for Colonial Affairs).

९. **युद्धमंत्री** (Secretary of State for War). सैन्यव्यवस्था.

१०. **भारतमंत्री** (Secretary of State for India).

११. **स्कॉटलंडचा मंत्री** (Secretary of State for Scotland).

१२. विमान-मंत्री ( Secretary of State for Air ).

१३. आरमार-खात्याचा प्रधान ( First Lord of the Admiralty ).

१४. व्यापार मंडळाचा अध्यक्ष ( President of the Board of Trade ). व्यापार व उद्योगधंदे यांची व्यवस्था.

१५. आरोग्य-प्रधान ( Minister of Health ).

१६. कृषि-प्रधान ( Minister for Agriculture and Fisheries ). शेती व मच्छेमारी यांची व्यवस्था.

१७. शिक्षण-मंडळाचा अध्यक्ष (President of the Board of Education ).

१८. मजूर-प्रधान ( Minister for Labour ),

१९. राजाच्या खाजगी जहागिरीचा व्यवस्थापक(Chancellor of the Dutchy of Lancaster ).

२०. सार्वजनिक रस्ते व इमारती या खात्यांचा मुख्य( First Commissioner of Works ).

२१. कायदेपंडित ( Attorney General ). कायद्यासंबंधीं सल्ला.

देशाचा राज्यकारभार चालविण्याचें जबाबदारीचें काम प्रधानमंडळावर (Ministry) पडतें. हें प्रधानमंडळ कॉमन्ससभेंतील बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें बनलेलें असून त्यांत सुमारें पन्नास मंडळी असतात. त्यांपैकीं वरच्या यादींत दिलेल्या मुख्य अशा वीस बावीस प्रधानांचें मिळून मंत्रिमंडळ ( Cabinet ) बनतें. क्याबिनेटच्या वारंवार सभा भरतात त्यांत क्याबिनेटमधील मंडळीच चर्चा करून आपलें धोरण निश्चित करितात व मग एकंदर प्रधानमंडळ तें धोरण अंमलांत आणण्याचें काम पार पाडतें. महायुद्धाच्या वेळीं झटपट निर्णय व्हावे म्हणून लॉइड जॉर्जनें अवघ्या पांच मंडळीची क्याबिनेट बनविली होती, ती युद्धमंडळ (War Cabinet) म्हणून प्रसिद्ध आहे. पुढें तर या चिमुकल्या क्याबिनेटमध्यें साम्राज्यांतील इतर घटकांचे मंत्री घेऊन त्यानें साम्राज्याचें युद्धमंडळ ( Imperial War Cabinet) बनविलें व साम्राज्यांतील सर्व घटकांची मायभूमीस महायुद्धांत मनमुराद मदत मिळ-

विली. पण हा केवळ अपवाद होता. महायुद्धानंतर पुनः पूर्वीसारखी वीस बावीस पुढाऱ्यांची क्याबिनेट बनविण्याची रूढि पुनः चालू झाली आहे.

मंत्रिमंडळाच्या वरील यादींतील नंबर तीन व चार या प्रधानांना खात्याचें असें मुळींच काम नसतें. तेव्हां अनुभवी मुत्सद्यांचा पोक्त सल्ला मिळावा यासाठीं या जागीं वृद्ध व ज्ञानी मुत्सद्यांची योजना करण्यांत येते. पार्लमेंटच्या दोन्ही सभांत एक एक प्रधान सभेचा पुढारी ( Leader of the House ) म्हणून वावरतो. त्याच्याकडे सभेचा कार्यक्रम ठरविण्याचें व त्या सभेंतील प्रधानांच्या कृतींत मेळ राखण्याचें काम असतें. सभेंत जेव्हां अडचणी उत्पन्न होतील तेव्हां त्यांतून मार्ग काढतांना सभेस त्याचा सल्ला उपयोगीं पडतो. कित्येक प्रधानांना पार्लमेंटांतील कामांत मदत करण्यास दुय्यम-प्रधान ( Under-Secretary ) असतात व त्यांचा प्रधानमंडळांत समावेश झालेला असतो. प्रधानांच्या हाताखालीं कायमचा अधिकारीवर्ग आपला कारभार चालवितो. एकंदरीनें राजकीय धोरण ठरविण्याचें काम म्हणजे राज्याचीं सूत्रें मंत्रिमंडळाच्या ( Cabinet ) हातीं असून तें धोरण अंमलांत आणण्याचें काम एकंदर प्रधानमंडळ ( Ministry ) बजावतें. राज्यकारभारावर प्रधानमंडळाचें ( Ministry ) कवच असतें, व हें कवच बदलावयाचें म्हणजे सुमारें पन्नास मंडळी बदलतात. खालचा अधिकारीवर्ग तसाच कायम रहातो. त्यास लोकमताच्या हेलकाव्यांची बाधा होत नाहीं.

६. **मंत्रिमंडळाचीं कामें व अधिकार.** १६८८च्या क्रांतीनें राजसत्तेवर पार्लमेंटनें अनेक निर्बंध घातले. पुढें लवकरच राज्यकारभार चालविण्यासाठीं मंत्रिमंडळाची पद्धति निघाली. अर्थातच मंत्रिमंडळाचें मुख्य काम म्हटलें म्हणजे पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांचा अंमल करून राज्यकारभार चालवावयाचा. मंत्रिमंडळाच्या सभेंत चर्चा होऊन निरनिराळ्या प्रश्नांवरील सरकारी धोरण निश्चित करण्यांत येतें, व त्या धोरणास अनुसरून कायमच्या अधिकारीवर्गाकडून प्रत्यक्ष कारभार चालविण्याचें काम प्रधानमंडळाच्या देखरेखीखालीं होत असतें. अधिकारीवर्ग तज्ज्ञ असतो व प्रधान हे लोकप्रतिनिधि असतात. या दोघांच्या संगनमतानें राज्यकारभार चालतो. आतां मंत्रिमंडळास करावें लागणारें दुसरें काम म्हणजे पार्लमेंटचें समाधान राखणें हें होय. मंत्रिमंडळ पार्लमेंटला जबाबदार असतें; त्यामुळें प्रधानांच्या कृत्यां-

संबंधानें पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारण्यांत येतात, तेव्हां त्यांचीं योग्य उत्तरें देऊन त्यांना पृच्छकांचें समाधान करावें लागतें. आपली आर्थिक व्यवस्था तर कॉमन्सना समजावून देऊन त्यांजकडून मंजुरी मिळवावी तेव्हां खर्च करण्याचा मार्ग प्रधानांस मोकळा होतो. कायदे करण्याचा हक्क वास्तविक पार्लमेंटचा; पण या कामांत मंत्रिमंडळानें अलीकडे आपला हात बराच शिरकविला आहे. पार्लमेंटसभेंत बिलांचा उपक्रम करण्याचा अधिकार ( Right of Initiation ) मंत्रिमंडळानें बहुतेक आपल्या हातीं घेतला आहे. सरकारी बिलांसाठीं पार्लमेंटच्या बैठकींपैकीं बरेच दिवस राखून ठेवण्यांत येतात, व सरकारच्या पाठीशीं हुकुमी बहुमत असल्यामुळें तीं पास होण्याचा बळकट संभव असतो. सामान्य सभासदाचें बिल अगोदर सभेपुढें येणें अवघड, आल्यास त्याला मताधिक्य मिळालें पाहिजे; पण असें फार क्वचित् घडून येतें. तेव्हां 'इंग्लंडमध्यें हल्लीं पार्लमेंटच्या मदतीनें कायदे करण्याचा अधिकार मंत्रिमंडळ गाजवितें'* असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. पूर्वीं राज्यकारभाराचा मुख्य भार राजावर असून त्याला राज्यकारभारासाठीं कांहीं खास हक्क असत. हल्लींदेखील त्यांपैकीं बरेच हक्क 'राजाचे खास अधिकार' ( Royal Prerogatives ) म्हणून प्रसिद्ध आहेत, व ते सर्व राजाच्या नांवानें मंत्रिमंडळ बजावतें. एकंदरीनें चर्चा करून धोरण ठरविणें, तें अंमलांत आणणें, त्यास पार्लमेंटची मंजुरी मिळविणें, कायदे करण्याच्या बाबतींत उपक्रमाचा अधिकार गाजविणें, व राजाधिकारांची बजावणी करणें असें पंचविध कार्य मंत्रिमंडळास करावयाचें असतें.

---

## ८. इंग्लंडच्या शासनसंस्थेचें स्वरूप.

**१. शासनसंस्थेचीं लक्षणें.** हल्लीं जगांतील राष्ट्रांच्या शासनसंस्था पाहिल्या तर बहुतेक राष्ट्रांतून कमीजास्त मानानें लोकशाही चालू आहे असें आपणास आढळून येतें. इंग्लंडच्या शासनसंस्थेचा विचार केल्यास तेथें राज-

*मास्टरमनकृत ब्रिटिश शासनसंस्थेचा इतिहास, पृष्ठ २२९.

सत्तेच्या पडद्याआड दडलेली लोकशाहीच चालू असल्याचें आपल्याला माहीत झालेंच आहे. अर्वाचीन काळांत म्हणजे सोळाव्या शतकापासून इंग्लंडांत अनेक चळवळी झाल्या. त्यांचें एक महत्त्वाचें फल म्हणजे आजची तेथील बरीच परिणत स्वरूपांत असलेली शासनसंस्था होय. तिचीं अनेक लक्षणें ठरून गेलीं आहेत; त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या लक्षणांचा आपण आतां विचार करूं; म्हणजे त्या शासनसंस्थेच्या स्वरूपाची आपल्याला सामान्य कल्पना येईल. (१) युनायटेड स्टेट्सची शासनसंस्था स्वातंत्र्ययुद्धानंतर १७८९सालीं झालेल्या घटनापत्रावर अधिष्ठित झालेली आहे. तसेंच फ्रेंच प्रजासत्ताक १८७५सालीं झालेल्या घटनापत्रावर उभारलेलें आहे. इंग्लिश शासनसंस्थेस आधारभूत असें घटनापत्र एका विशिष्ट कालीं झालेलें नाहीं. मॅग्ना चार्टा, पिटिशन ऑफ राइट, बिल ऑफ राइट्स, वारशाचा कायदा ( १७०१ ), एकोणिसाव्या शतकांत झालेले पार्लमेंट–सुधारणेचे कायदे, असे ब्रिटिश शासनसंस्थेचे आधार म्हणून दाखवितां येतील. पण या शासनसंस्थेस असले लेखविशिष्ट ( Written ) आधारच तेवढे नाहींत. हिच्यांतील प्रधानमंडळाची पद्धति आदिकरून अनेक महत्त्वाच्या गोष्टी परंपरा, संप्रदाय व प्रघात यांजवर अवलंबून आहेत. उदाहरणार्थ, कॉमन्ससभेंत पराभव झाला कीं, प्रधानांनीं राजीनामा द्यावा हा नियम तरी कोणत्याच कायद्यांत नमूद झालेला नाहीं. त्याला केवळ प्रघात ( Convention ) हा आधार आहे. तेव्हां ब्रिटिश शासनसंस्था केवळ कायद्यांवर उभारलेली नसून कित्येक कायद्यांबरोबर अनेक प्रघात तिच्या मुळाशीं आहेत. (२) अमेरिका, फ्रान्स वगैरे देशांत शासनसंस्थेंत बदल करावयाचा तर तो कायदेमंडळाला सहज करतां येत नाहीं. इंग्लंडमध्यें मात्र घटनात्मक कायदे व सामान्य कायदे असा भेद मुळींच नसून पार्लमेंट सामान्य कायद्यांप्रमाणेंच शासनसंस्थाविषयक कायदे मंजूर करूं शकते. शासनसंस्थाविषयक कायदे करण्याबाबत कांहीं विशेष व्यवस्था तेथें नाहीं. यावरून इंग्लिश शासनसंस्था लवचीक ( Flexible ) आहे, ताठर ( Rigid ) नाहीं असें म्हणतां येतें. १९१८चा पार्लमेंट–सुधारणा कायद्यासारखा महत्त्वाचा कायदा इतर कायद्यांप्रमाणें सामान्य मार्गानेंच पास होतो. मात्र इंग्लंडच्या शासनसंस्थेंत बदल सहज होऊं शकतात, यावरून तेथें नित्य बदल होत असतील व कोणतीच व्यवस्था टिकाऊ होत नसावी असें अनुमान काढलें तर तें अगदीं चूक होईल. (३) उत्क्रान्तिक्षमतेशीं निगडित

असें इंग्लिश शासनसंस्थेसंबंधीं आणखी एक महत्त्वाचें सूत्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या शासनसंस्थेचा दीर्घकालीन इतिहास जर नीट पाहिला तर त्या शासनसंस्थेच्या चरित्राचा एकसारखा अखंड ओघ ( Continuity ) चालू आहे असें दिसतें, व कोठें त्यांत एकदम मोठा खंड पडलेला आहे असें आढळून येत नाहीं. इंग्लिश शासनसंस्थेची प्रगति क्रमानें विकास होत होत झाली, क्रान्ति होऊन झाली नाहीं. जुनें चालत आलेलें जरूर तर व तितकें बदलावयाचें, केव्हां केव्हां जुनी गोष्ट कागदावर तशीच ठेवावयाची व्यवहारांत मात्र बदल करावयाचा म्हणजे प्रघात तेवढा पालटावयाचा, हा इंग्लिश लोकांच्या धिम्या स्वभावास अनुरूप असा मार्ग इंग्लिश शासनसंस्थेंत बदल करितांना स्वीकारण्यांत आला. याचा परिणाम असा झाला आहे कीं, इंग्लिश शासनसंस्थेंत अनेक बदल झाले तरी नामतः जुन्या गोष्टी कायम आहेत व परंपरा अखंड राहिली आहे. ( ४ ) इंग्लिश शासनसंस्थेचा पुढील एक धर्म म्हटला म्हणजे तिचीं निरनिराळीं अंगें जशीं दिसतात तशीं तीं नसतात, व असतात तशीं तीं फारकरून दिसत नाहींत. नामतः इंग्लंडांत राजसत्ता अजून कायम आहे व प्रधान हे राजाचे नोकर असें मानण्यांत येतें; पण वस्तुतः तेथें लोकशाही चालू असून प्रधानमंडळ कॉमन्समधील बहुमताला जबाबदार असतें. या धर्मामुळें इंग्लिश शासनसंस्थेचें स्वरूप आभासात्मक ( Unreal ) झालें आहे. ( ५ ) इंग्लिश शासनसंस्थेचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे पार्लमेंटची अमर्याद सत्ता--कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं अधिकार--होय. पार्लमेंटला कोणताही नवा कायदा करितां येतो किंवा असलेला बदलतां येतो यावरून कायदे करण्याबाबत पार्लमेंट सर्वसत्ताधीश (Legal Sovereign) आहे असें म्हणतात. (६)युनायटेड स्टेट्समध्यें निरनिराळीं संस्थानें व सर्व संस्थानांचें मिळून मध्यवर्ती सरकार यांचे परस्पर संबंध व अधिकार घटनापत्रानें ठरवून दिले आहेत. ते नियम पाळूनच निरनिराळ्या संस्थानांना व वॉशिंग्टन येथील मध्यवर्ती सत्तेला आपले व्यवहार पार पाडावे लागतात. अर्थात् तेथें मुख्य सत्ता मध्यवर्ती सत्तेच्या हातीं नसून ती संस्थानें व मध्यवर्ती सरकार यांच्यांत वांटून दिलेली आहे. अशीच स्थिति स्वित्झर्लंडच्या संयुक्त संस्थानांची आहे. तेव्हां या दोन्ही देशांतील शासनसंस्था बहुकेंद्र किंवा बहुपिंड ( Federal ) आहे असें आपण म्हणतों. ब्रिटिश शासनसंस्थेची अशी गोष्ट नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांत

अनेक देश समाविष्ट झालेले आहेत. पण कायदे करण्याची मुख्य सत्ता ब्रिटिश पार्लमेंटच्या हातीं आहे व तिनें केलेला कायदा ब्रिटिश साम्राज्यांतील कोणत्याही भागाला लागू होतो. साम्राज्यांतील इतर कोणत्याही कायदेमंडळानें केलेले कायदे ब्रिटिश पार्लमेंटला मर्यादा घालूं शकत नाहींत. अशा रीतीनें ब्रिटिश पार्लमेंटची मुख्य सत्ता (Sovereignty) अबाधित असल्यानें ब्रिटिश शासनसंस्था **एककेंद्र** (Unitary) आहे, बहुकेंद्र नाहीं हें सहज दिसून येतें.

(७) देशांतील बहुतेक प्रौढ स्त्रीपुरुषांनीं आपल्याला पसंत असे प्रतिनिधि कायदेमंडळांत कायदे करण्यासाठीं निवडून द्यावयाचे असतात हा लोकशाहींतील अतिशय महत्त्वाचा भाग होय. तेव्हां पार्लमेंट बनावयाची ती सर्वसाधारण जनसमाजाच्या इच्छेस अनुरूप अशीच बनते. लोकांना हा निवडणुकीचा हक्क नीट बजावितां यावा यासाठीं त्यांच्यांत राजकीय जागृतीची अपेक्षा असते. ही जागृति राखण्यास बहुतेक सर्व राष्ट्रांतून राजकीय पक्ष निघाले आहेत. इंग्लंडांत बहुतकरून दोन पक्ष जोरदार असतात. हल्लीं इंग्लंडांत कॉन्सर्व्हेटिव्ह, लेबर व लिबरल असे तीन पक्ष आहेत; पण त्यांपैकीं कॉन्सर्व्हेटिव्ह व लेबर हे दोन पक्ष तेथें विशेष प्रभावशाली आहेत. निवडणुकी नीट होण्यास, पुढें प्रधानमंडळ बनण्यास व एकंदर राज्यकारभार लोकमतानुसार चालण्यास पक्षपद्धति अत्यंत अवश्य होय. वास्तविक व्यक्तिशः एकेका मतदाराचें मत हें धान्याच्या एका कणाप्रमाणें क्षुद्र भासतें; पण असल्या मतांचे क्षुद्र कण एक करून त्यांजपासून राज्यचालक प्रचंड शक्ति निर्माण करण्याचें काम पक्षसंघटनेमुळें शक्य कोटींत येतें. तेव्हां ही पद्धति शासनसंस्थेच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाची ठरते.

(८) आणखी ब्रिटिश शासनसंस्थेविषयीं मनांत सहज भरणारी गोष्ट म्हणजे पार्लमेंटचें द्विसभात्मक (Bicameral) स्वरूप होय. या ब्रिटिश पार्लमेंटच्या गुणाचें जगभर अनुकरण होऊन बहुतेक देशांत द्विसभात्मक कायदेमंडळें अस्तित्वांत आलीं आहेत. इंग्लंडांतील कायदेमंडळाच्या दोन सभांपैकीं लॉर्ड्ससभेंत पिढीजाद श्रीमंतांना व स्वतःच्या कर्तबगारीनें मान्यतेस चढलेल्या थोर पुरुषांना प्रवेश मिळतो, तर कॉमन्ससभेंत सर्वसाधारण जनसमाजाचे प्रतिनिधि उपस्थित होतात. राष्ट्र या नात्यानें इंग्लंडचीं कर्तव्यें या दोन्ही सभा दृष्टिआड करीत नाहींत व त्यामुळें ब्रिटिश राष्ट्राची एकसारखी प्रगति चालू

आहे. हल्लीं मात्र लॉर्ड्ससभा बरीच दुर्बल झाली आहे व तिची योग्य सुधारणा करणें हा ब्रिटिश राष्ट्रापुढें महत्त्वाचा प्रश्न आहे. ( ९ ) ब्रिटिश शासनसंस्था **पार्लमेंटरी** संस्था आहे, म्हणजे इंग्लंडचें प्रधानमंडळ कायदेमंडळांतील कॉमन्ससभेला जबाबदार असतें. कॉमन्ससभेंतील बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें प्रधानमंडळ बनत असून त्याला सर्व कारभार कॉमन्ससभेच्या संमतीनें करावा लागतो. युनायटेड स्टेट्समध्यें लोकनियुक्त अध्यक्ष व मंत्री अशा प्रकारें कायदेमंडळावर अवलंबून नसतात; त्यामुळें तेथें अधिकारीवर्ग व कायदेमंडळ यांच्यामध्यें तेढ उत्पन्न झाली असतां कित्येक प्रसंगीं कायदेमंडळानें केलेले कायदे अध्यक्ष धाब्यावर बसवूं शकतो. परंतु इंग्लंडांतील प्रधानमंडळाच्या हातून तसें होण्याचा मुळींच संभव नाहीं. एकंदरीनें इंग्लिश शासनसंस्थेस लेखविशिष्ट कायदे व संप्रदाय या दोहोंचा आधार असून ती उत्क्रान्तिक्षम (Flexible) आहे; तिची परंपरा अखंड ( Continuity ) चालू असून तिचें स्वरूप आभासात्मक (Unreal ) झालें आहे; इंग्लिश पार्लमेंटच्या हातीं राष्ट्रांतील मुख्य सत्ता (Sovereignty ) असल्यानें ती एककेंद्र (Unitary) आहे; ही शासनसंस्था पक्षपद्धतीवर उभारलेली असून कायदेमंडळ द्विसभात्मक ( Bicameral ) आहे; तसेंच युनायटेड स्टेट्सप्रमाणें ती व्यक्तिप्रधान ( Presidential ) नसून पार्लमेंटप्रधान ( Parliamentary ) आहे हा तिचा शेवटचा महत्त्वाचा धर्म होय.

२. **टीकाकार**. प्रातिनिधिक राज्यपद्धति हल्लीं बहुतेक देशांतून चालू आहे. पण हल्लीं कित्येक लोकांचा या पद्धतीवरील विश्वास उडाला आहे, व तिच्यांत बदल सुचविण्यांत येत आहेत. या सुधारकांचे दोन प्रकार आहेत. एक सौम्य व विधायक सूचना करणारे आणि दुसरे विध्वंसक. पहिल्यांच्या मतें पार्लमेंटच्या हातून कायदे करण्याचें काम समाधानकारक होत नसल्यामुळें तिनें केलेले कायदे पुनः मतदारांपुढें म्हणजे जनतेपुढें मांडावे व त्यांची त्या कायद्यांस संमति मिळवावी. ही पद्धति स्वित्झर्लंडांत चालू असून सर्वजनसंमति ( Referendum, रेफरेन्डम ) या नांवानें प्रसिद्ध आहे. दुसरे टीकाकार म्हणजे मजूरवर्गांतील जहाल मंडळी. यांच्या मतें पार्लमेंटरी राज्यपद्धति हा एक भ्रमाचा भोपळा असून तो आतां फुटला आहे; तेव्हां सार्वत्रिक संपासारख्या ( General Strike ) जाज्वल्य उपायांचा अवलंब करून हल्लींचें सरकार

नष्ट करावें व त्याच्या जागीं सर्व राष्ट्राच्या हिताकडे लक्ष पुरविणारें गरिबांचें कनवाळू असें सरकार निर्माण करावें. हें मत म्हणजे चालू शासनसंस्थेच्या अस्तित्वावरच गदा आणणारें आहे. १९२६त ट्रेड यूनियन कौन्सिलनें सार्वत्रिक संप पुकारला होता; पण एकंदर ब्रिटिश बहुजनसमूहानें त्याला विरोध केला व तो संप एका आठवड्यांतच मोडला. पुनः *सार्वत्रिक संप होऊं नये व चालू शासनसंस्थेचें जीवित धोक्यांत पडूं नये यासाठीं मजूर वर्गाचे हक्क न बुडवितां काय उपाय करावा हा ब्रिटिश जनतेपुढें जिव्हाळ्याचा प्रश्न आहे व ती तो कसा सोडवितें इकडे जगाचे डोळे लागून राहाणें साहजिक आहे.

---

## परिशिष्ट १:—सनावली.

ग्रंथ संग्रहालय दा. क्र. 342 शाखा

१२१५ मोठी सनद ( मॅग्ना चार्टा ).
१२९५ नमुनेदार पार्लमेंट ( मॉडेल पार्लमेंट ).
१५३४ इंग्लंड व वेल्स यांचें ऐक्य.
१६२८ हक्कसंरक्षणाचा अर्ज ( Petition of Right ).
१६७९ व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा ( Habeas Corpus act ).
१६८१ व्हिग व टोरी या पक्षांचा उदय.
१६८९ रक्तशून्य राज्यक्रान्ति. हक्कांची सनद. ( Bill of Rights ).
१६९४ एकपक्षीय प्रधानमंडळास आरंभ ( Beginning of Party Government ).
१६९५ मुद्रणस्वातंत्र्य ( Freedom of the Press )
१७०१ वारशाचा कायदा ( Act of Settlement ). न्यायाधीश स्वतंत्र झाले.
१७०७ स्कॉटलंडचें ऐक्य.
१७११ बारा टोरी लॉर्ड बनविले.

---

* सार्वत्रिक संप (General Strike) बेकायदेशीर ठरविणारें 'ट्रेड यूनिअन बिल' कॉन्सर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळानें पार्लमेंटपुढें आणिलें आहे. त्याचें दुसरें वाचन मंजूर होऊन त्या बिलावर कमिटीपुढें ऊहापोह चालू आहे व मजूर पक्ष त्याच्या कलमाकलमास व ओळीओळीस विरोध करीत आहे ( मे १९२७ ).

१७१६ सप्तवार्षिक कायदा (Septennial Act).

१७१९ पीरेज बिल.

१७२१ पहिला मुख्य प्रधान वॉल्पोल अधिकारारूढ झाला.

१७७१ पार्लमेंटचे वादविवाद प्रसिद्ध करण्याची हरकत दूर झाली.

१८०० आयर्लंडचें ऐक्य.

१८३२ पहिला सुधारणा-कायदा (मध्यम वर्गास मताधिकार मिळाला).

१८३६ कॉमन्ससभेंतील मतविभागणीच्या याद्या (Division Lists) प्रसिद्ध होऊं लागल्या.

१८६७ दुसरा सुधारणा--कायदा (शहरांतील मजुरांस मताधिकार).

१८७० सक्तीचें शिक्षण.

१८७२ गुप्त मतदानपद्धति (Vote by Ballot).

१८८५ तिसरा सुधारणा--कायदा (खेड्यांतील मजुरांस मताधिकार).

१८९१ मोफत शिक्षण.

१८९३ मजूर पक्षाचा पार्लमेंटांत प्रवेश.

१९११ पार्लमेंट ॲक्ट.

१९१८ चौथा सुधारणा कायदा (स्त्रियांस मताधिकार).

१९२२ दक्षिण आयर्लंडला स्वराज्य.

१९२४ पहिलें मजूर मंत्रिमंडळ.

---

## परिशिष्ट २:—स्मरणीय वचनें.

१. Democracy is government of the people, by the people, and for the people. लोकशाही ही लोकांची, लोकांकडून चालविली गेलेली व लोकहितकारी शासनसंस्था होय.—अॅब्रहाम लिंकन.

२. Government without the consent of the governed is the very definition of slavery. लोकांच्या संमतीशिवाय चाललेलें राज्य म्हणजेच गुलामगिरी—डीन स्विफ्ट.

३. Parliament is a deliberative assembly of one nation, with one interest, that of the whole; where,

not local purposes, not local prejudices, ought to guide, but the general good, resulting from the general reason of the whole. पार्लमेंट म्हणजे सर्व राष्ट्राचें मिळून एक हित पाहणारी एका राष्ट्राची सभा होय. तींत स्थानिक उद्देश, व स्थानिक पूर्वग्रह यांचे पाठीस लागतां कामा नये, तर एकंदर मंडळीच्या बुद्धीला पटेल अशा सर्वसाधारण हितावर नजर ठेविली पाहिजे.–एडमंड बर्क (१७७४).

४. If the sovereignty of Parliament gives the form, the supremacy of the law of the land determines the substance of our ( the English ) constitution. मुख्य सत्ता पार्लमेंटची, या तत्त्वाच्या आधारावर इंग्लिश शासनसंस्थेची रूपरेषा ठरून गेली व देशांतील कायद्याच्या श्रेष्ठत्वामुळें तिच्या अन्तर्द्रव्याचा निश्चय झाला–डायसी.

५. Royal Prerogative is the discretionary authority of the executive. अधिकारिवर्गाचा तारतम्य वापरण्याचा अधिकार याचेंच नांव राजाचे विशेष हक्क—डायसी.

६. Though beside an ideal House of Commons the Lords would be unnecessary, and therefore pernicious, beside the actual House of Commons a revising and leisured legislature is extremely useful, if not quite necessary. आदर्शभूत कॉमन्ससभा असतां लॉर्ड्स अनवश्यक ठरले तरी आहे त्या हाऊस ऑफ कॉमन्सबरोबर दुरुस्ती करण्यासाठीं सुखवस्तु लोकांची दुसरी सभा असणें अगदीं अवश्य नसलें तरी अतिशय उपयोगाचें आहे—बेज्हॉट.

७. The virtue, spirit, and essence of a House of Commons consists in its being the express image of the feelings of the nation. कॉमन्ससभेचा सद्गुण, तत्त्व व सार हें कीं, ती सभा राष्ट्राच्या भावनांची प्रत्यक्ष मूर्ति असते—बर्क (१७७०).

८. From the momemt when its sole right to tax the nation was established by the Bill of Rights,

and when its own resolve settled the practice of granting none but annual supplies to the Crown, the House of Commons became the supreme power in the state. जेव्हां राष्ट्रावर कर बसविण्याचा कॉमन्सचा अनन्यसाधारण हक्क 'हक्कांच्या सनदेनें' प्रस्थापित झाला व तिच्याच ठरावानें राजाचा वार्षिक मुदतीपुरता खर्च मंजूर करण्याची वहिवाट पडली, त्या वेळेपासून कॉमन्ससभा राष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ शक्ति ठरून गेली—ग्रीन.

९. The Cabinet is a committee of the legislative body selected to be the executive body. क्याबिनेट म्हणजे कायदेमंडळांतून निवडलें गेलेलें कारभारीमंडळ, दुसरें तिसरें कांहीं नाहीं—बेज्हॉट.

१०. While every act of state is done in the name of the Crown, the real executive government of England is the Cabinet. इंग्लंडांत सरकारचें प्रत्येक कृत्य राजाच्या नांवानें होत असलें तरी अंमलबजावणीचा खरा अधिकार (खराखुरा कारभार) क्याबिनेटच्या हातीं असतो—डायसी (१८८५).

११. The Cabinet is a unit-a unit as regards the sovereign, and a unit as regards the legislature. राजाशीं व कायदेमंडळाशीं वागतांना मंत्रिमंडळ एक धोरणानें व एक विचारानें वागतें, जणूं काय सर्व मंत्रिमंडळ मिळून एक व्यक्तिच आहे—मोर्ले.

१२. To say that at present the Cabinet legislates with the advice and consent of Parliament would hardly be an exaggeration. हल्लीं पार्लमेंटच्या संमतीनें व सल्ल्यानें क्याबिनेट कायदे करते असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति नाहीं—लोवेल.

१३. Party is a body of men united for promoting by their joint endeavours the national interest upon some particular principle in which they are all agreed. ज्या एका विशिष्ट तत्त्वासंबंधीं सर्वांचें एकमत आहे त्या

तत्त्वास अनुसरून संयुक्त प्रयत्नांनीं राष्ट्रहित साधण्यास्तव एक झालेला मानवसंघ म्हणजे पक्ष होय—बर्क (१७७०).

१४. Parliamentary government, as worked out in England, rests on a nice equipoise between the legislative and executive power, vesting ultimate control in the former, but permitting a wide discretion to the latter. इंग्लंडांत चालू असलेली पार्लमेंटरी राज्यपद्धति कायदेमंडळ व अधिकारीवर्ग यांच्यामधील सत्तेच्या योग्य समतोलावर अधिष्ठित आहे. तींत कायदेमंडळाकडे अंतिम ताबा, पण अधिकारीवर्गास आपलें तारतम्य चालविण्यास पूर्ण सवड ठेविली आहे—मेरियट.

१५. The foundation of all parliamentary taxation is its necessity for the public service as declared by the Crown through its constitutional advisers. राजानें आपल्या सनदशीर सल्लागारांतर्फे (मंत्र्यांतर्फे) सार्वजनिक उपयोगासाठीं दाखविलेली अवश्यकता हा पार्लमेंटरी करांचा पाया होय—अर्स्किन मे.

१६. Of all the existing political traditions in England, the least known to the public, and yet one of those most deserving attention, is that which governs the relation between the expert and the layman. इंग्लंडमध्यें हल्लीं चालू असलेल्या राजकीय परंपरांपैकीं लोकांना अगदीं गैरमाहीत, पण अतिशय लक्षांत घरण्यासारखी म्हटली म्हणजे ती कीं, जिच्या योगें अभ्यस्त अधिकारी व अनभ्यस्त लोकप्रतिनिधि यांचा मेळ नीट बसतो—लोवेल.

१७. Socialism means that all socially created wealth shall be owned by the community, and that its distribution shall be directed by the community for the good of the community. समाजसत्तावाद म्हणजे समाजामुळें उत्पन्न झालेली संपत्ति समाजाच्या मालकीची असावी व तिची वांटणी समाजाच्या हितार्थ समाजानें करावी—फिलिप स्नोडन (१९०९).

## परिशिष्ट ३:—पारिभाषिक शब्दांचा कोश.

Abs olute Rule ( ॲबसोल्यूट रूल ); अनियंत्रित राज्य.

Act ( ॲक्ट ); कायदा.

Address ( ॲड्रेस ); राजाच्या भाषणास पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं केलेलें उत्तरात्मक भाषण.

Adjourn ( ॲडजर्न ); तात्पुरती तहकूब करणें. पार्लमेंट चालू असतां सभा रोजच्या रोज तात्पुरती तहकूब करणें. सभा तात्पुरत्या तहकुबीची सूचना मंजूर करिते व मग तात्पुरती तहकूब ( बहुशः एक दिवसापुरती ) होते. काम जेथें संपलें तेथून दुसऱ्या दिवशीं पुढें चालू होतें.

Appropriation ( ॲप्रोप्रिएशन ); ज्या विशिष्ट बाबीवर खर्च करण्यासाठीं पार्लमेंटनें पैसा मंजूर केला त्या बाबीवरच तो खर्च करावयाचा हें तत्त्व. निर्णीतविनियोगतत्त्व.

Appropriation Bill (ॲप्रोप्रिएशन); बिल सैन्य, आरमार, विमानदल व मुलकी खातें ( सिव्हिल सर्व्हिसेस ) यांच्या एकंदर वार्षिक खर्चास मंजुरी देणारें बिल.

Aristocracy ( ॲरिस्टॉक्रसी ) ; महाजन–सत्ता. श्रीमंतांचा अंमल.

Ballot ( बॅलट ); गुप्तमतदान.

Benevolent despot (बेनिव्होलंट डेस्पट); अनियंत्रित लोकहितकर्ता.

Bicameral ( बायक्यामेरल ); द्विसभात्मक, दुशाखी, द्विदल.

Bill ( बिल ); कायद्याचा कच्चा मसुदा.

Bolshevism ( बोल्शेविझम ); कामकरी–संघसत्ताक राज्य असावें हें मत.

Budget ( बजेट ); जमाखर्चाचें अंदाजपत्रक, आयव्ययपत्रक.

Bureaucracy ( ब्युरॉक्रसी ); नोकरशाही.

Cabinet ( क्याबिनेट ); मंत्रिमंडळ.

Candidate ( क्यान्डिडेट ); उमेदवार, प्रतिनिधि म्हणून निवडून येण्यासाठीं उभी राहिलेली व्यक्ति.

Capitalism ( क्यापिटॅलिझम ); भांडवलशाही.

Central Government ( सेन्ट्रल गव्हर्मेंट ); मध्यवर्ती सरकार.
Civil List ( सिव्हिल लिस्ट ); राजाच्या खाजगी खर्चाकरितां तोडून दिलेली नेमणूक, राजाची नेमणूक.
Collective responsibility ( कलेक्टिव्ह रिस्पॉन्सिबिलिटी. ); मंत्रि-मंडळाची सामुदायिक जबाबदारी.
Committee of Supply ( कमिटी ऑफ सप्लाय ); पुरवठा-कमिटी.
Committee of Ways and Means (कमिटी ऑफ वेज् ॲन्ड मीन्स ); साधन-कमिटी.
Communist ( कम्युनिस्ट ); संपत्तीची सारखी वांटणी व्हावी, संपत्तीवर खाजगी मालकी नसावी, व सर्व संपत्ति समाजाची समाईक समजली जाऊन प्रत्येकास तिचा सारखाच उपयोग व्हावा अशा मताचा. समाईकस्वामित्ववादी.
Compulsory Education (कम्पल्सरी एज्युकेशन ); सक्तीचें शिक्षण.
Conservative ( कॉन्सर्व्हेटिव्ह ); पुराणमतवादी.
Consolidated Fund ( कन्सॉलिडेटेड फंड ); एकत्रितनिधी.
Constituency ( कॉन्स्टिटयुअन्सी ); मतदारसंघ.
Constitution ( कॉन्स्टिटयूशन ); शासनसंस्था, राज्यघटना.
Constitutional ( कॉन्स्टिटयूशनल ); सनदशीर.
Constitutional King ( कॉन्स्टिटयूशनल किंग); घटनाविषयक नियमांनीं बद्ध असा राजा, नियमबद्ध राजा.
Controller and Accountant General ( कन्ट्रोलर ॲन्ड अकाउन्टन्ट जनरल ); मुख्य व्ययनियामक व हिशेबतपासनीस.
Convention ( कन्व्हेन्शन ); प्रघात, रिवाज, रूढि.
Co-operation ( कोऑपरेशन ); सहकार.
Co-operative Society (कोऑपरेटिव्ह सोसायटी);सहकारी पतपेढी.
Customs (कस्टम्स); बंदरावर किंवा सरहद्दीवर घेतलेली जकात, आयात-निर्यात-कर, आगतनिर्गत-कर.
Death-duty ( डेथ ड्यूटी ); मृताच्या जिंदगीवरील कर.
Debate (डिबेट); वादविवाद.

Delegate ( डेलिगेट ); प्रेषित. दूत.
Democracy ( डिमॉक्रसी ); लोकशाही.
Despot ( डेस्पट ); अनियंत्रित राजा, अनियंत्रित अधिकारी, सुलतान.
Dictator ( डिक्टेटर ); सर्वाधिकारी.
Direct Democracy ( डिरेक्ट डिमाक्रसी ); नागरिक राज्य. सर्व प्रौढ नागरिकांनीं चालविलेलें राज्य. ( अथेन्स, रोम व व्हेनिस येथें अशीं राज्यें होतीं ).
Dissolve ( डिझॉल्व्ह ); बरखास्त करणें.
Divine Right of Kings ( डिव्हाइन राइट ऑफ किंग्ज ); राजांची ईश्वरदत्त सत्ता.
Division ( डिव्हिजन ); विभागणी. प्रत्यक्ष दोन भाग करून अनुकूल व प्रतिकूल सभासदांचें मापन.
Division List ( डिव्हिजन लिस्ट ); मतविभागणीची यादी.
Dominion status ( डॉमिनिअन स्टेटस ); साम्राज्यांशभाक् स्वराज्य.
Election ( इलेक्शन ); निवडणूक.
Election Agent ( इलेक्शन एजंट ); निवडणुकींत उमेदवाराचा मुखत्यार.
Election dispute ( इलेक्शन डिस्प्यूट ); निवडणुकीचा तंटा.
Electorate ( इलेक्टरेट ); मतदारवर्ग.
Equal Electoral Districts ( ईक्वल इलेक्टोरल डिस्ट्रिक्ट्स ); समानसंख्येचे मतदारसंघ.
Estate ( एस्टेट ); वर्ग.
Evolution ( इव्होल्यूशन ); उत्क्रान्ति, विकास.
Excise ( एक्साइझ ); मालाच्या उत्पत्तीवरील अन्तर्गत कर, उदाहरणार्थ License परवाना, Spirits दारू, व Tobacco तंबाखू यांवरील कर.
Executive (एक्झिक्यूटिव्ह); राज्यचालक, अधिकारीवर्ग, कारभारीमंडळ.
Executive Power ( एक्झिक्यूटिव्ह पॉवर ); चालकत्वाचा अधिकार, अंमलबजावणीची सत्ता.

Expert ( एक्सपर्ट ); तज्ज्ञ, अभ्यस्त.
Federal ( फेडरल ); अनेककेंद्र, बहुपिंड, अनेकावयवी. संयुक्त.
Finance Bill ( फिनॅन्स बिल ); वर्षांतील एकंदर कर-व्यवस्थेस मंजुरी मागणारें बिल. कर-उभारणीचें बिल.
Financial ( फिनॅन्शिअल ); आर्थिक, पैशासंबंधीं, आयव्ययसंबंधीं.
Flexible ( फ्लेक्झिबल ); लवचीक, उत्क्रान्तिक्षम.
Franchise ( फ्रॅन्चाइझ ); मताधिकार.
Free Education ( फ्री एज्युकेशन ); मोफत शिक्षण.
General Strike ( जनरल स्ट्राइक ); सार्वत्रिक संप.
Go to the country ( गो टू दी कन्ट्री ); लोकमत अजमावणें, निवडणूक करणें.
Government Bill ( गव्हर्मेंट बिल ); सरकारी बिल, प्रधानानें पुढें मांडिलेलें बिल.
Government by consent (गव्हर्मेंट बाय कन्सेन्ट). लोकसंमत शासन.
Hereditary Chamber ( हेरिडिटरी चेंबर ); जींत आनुवंशिक हक्कानें बहुतेक सभासद बसतात ती लॉर्ड्स-सभा, वतनदार-सभा.
Home Rule ( होम रूल ); साम्राज्यांकित स्वराज्य. ( लष्करी व परराष्ट्रीय कामें वगळून ).
Imperial Conference ( इम्पीरिअल कॉन्फरन्स ); साम्राज्यपरिषद.
Imperial Preference ( इम्पीरिअल प्रेफरन्स ); साम्राज्यविषयक व्यापारी सवलती.
Individual liberty ( इन्डिव्हिज्युअल लिबर्टी ); व्यक्तिस्वातंत्र्य.
Individual Responsibility ( इन्डिव्हिज्युअल रिस्पॉन्सिबिलिटी ); व्यक्तिगत जबाबदारी.
Industrial Revolution (इन्डस्ट्रिअल रेव्होल्यूशन); औद्योगिक क्रांति.
Initiation ( इनीशिएशन ); उपक्रम, उपक्रमाचा अधिकार.
Interpellation ( इन्टरपेलेशन ); प्रश्न विचारणें.
Judicial ( ज्युडीशिअल ); न्यायासंबंधीं.
Judiciary ( ज्युडिशिअरी ); न्यायमंडळ, न्यायखातें.

King's Speech ( किंग्ज स्पीच ); बैठकीच्या आरंभींचें राजभाषण.
Labour Party ( लेबर पार्टी ); मजूर पक्ष.
Layman ( लेमन ); अनभ्यस्त, इंग्लंडांत अनभ्यस्त लोकप्रतिनिधींच्या ताब्यांत अभ्यस्त अधिकारी वागतात.
Leader of the House ( लीडर ऑफ दी हाउस ); सभेचा पुढारी, सभानायक.
League of Nations ( लीग ऑफ नेशन्स ); राष्ट्रसंघ.
Legal Sovereign ( लीगल साव्हरिन ); कायदे करण्याच्या बाबतींत सत्ताधीश. विधिसत्ताधीश.
Legislative ( लेजिस्लेटिव्ह ); कायदे करण्यासंबंधीं, विधिविषयक.
Legislature ( लेजिस्लेचर ); कायदेमंडळ. विधिमंडळ.
Letters Patent ( लेटर्स पेटंट ); अधिकारदायक राजपत्र, सनद.
Liberal ( लिबरल ); उदारमतवादी.
Lord High Chancellor ( लॉर्ड हाय चॅन्सेलर ); लॉर्ड्ससभेचा अध्यक्ष व मुख्य न्यायाधिकारी.
Lower House ( लोअर हाउस ); कॉमन्ससभा, प्रतिनिधिसभा.
Mandate ( मॅन्डेट ); मतदारांचा प्रतिनिधीस आदेश, आदेशाचें तत्त्व.
Member of Parliament (मेंबर ऑफ पार्लमेंट); पार्लमेंटचा सभासद.
Ministry ( मिनिस्ट्री ); प्रधानमंडळ. क्याबिनेटमध्यें समाविष्ट न झालेले प्रधानही मिनिस्ट्रींत येतात.
Mob-rule ( मॉब-रूल ); समूहसत्ता, पुंडाई.
Monarchy ( मॉनर्की ); राजसत्ता.
Money Bill ( मनी बिल ); आर्थिक बिल, सरकारी खर्चासाठीं रक्कम मंजूर करणारें किंवा कररूपानें पैसा उभा करणारें बिल.
Motion ( मोशन ); सूचना, सभेपुढें मांडलेला ठराव.
Parliamentary Constitution ( पार्लमेंटरी कॉन्स्टिटयूशन ); पार्लमेंट-प्रधान शासनसंस्था.
Parliamentary privilege ( पार्लमेंटरी प्रिव्हिलेज ); पार्लमेंटच्या सभासदांचे विशेष हक्क. उदाहरणार्थ Freedom from

arrest पकडले न जाण्याचा हक्क, Freedom of Speech भाषणस्वातंत्र्याचा हक्क.

Party ( पार्टी ); पक्ष.

Party Government (पार्टी गव्हर्मेंट);एकपक्षीय मंत्रिमंडळाची पद्धति.

Political responsibility ( पोलिटिकल रिस्पॉन्सिबिलिटी ); राजकीय जबाबदारी.

Political Sovereign ( पोलिटिकल सॉव्हरिन ); राजकीय सर्वसत्ताधीश, अंतिम सत्ताधीश.

Poll ( पोल ); मत–मोजणी.

Polling Officer ( पोलिंग ऑफिसर ); मतनोंदणीच्या कामावर देखरेख करणारा अधिकारी, मतदान–देखरेखदार.

Polling Station (पोलिंग स्टेशन); मतनोंदणीची जागा, मतदानस्थल.

Power of the Purse ( पॉवर ऑफ दी पर्स ); तिजोरीवरील ताबा.

Power of the Sword ( पॉवर ऑफ दी सोर्ड );. सैन्यावरील सत्ता.

Presidential Constitution ( प्रेसिडेन्शिअल कॉन्स्टिटयूशन ); अध्यक्ष-प्रधान शासनसंस्था.

Premier ( प्रीमिअर ); मुख्य प्रधान.

Prime Minister ( प्राइम मिनिस्टर ); मुख्य प्रधान.

Private Bill ( प्रायव्हेट बिल ); स्थानिक बिल.

Private Member's Bill ( प्रायव्हेट मेंबर्स बिल ); सामान्य सभासदानें पुढें मांडिलेलें बिल.

Proclamation ( प्रॉक्लमेशन ); जाहीरनामा, राजाचा हुकूम.

Proportional Representation ( प्रपोर्शनल रेप्रिझेन्टेशन ); प्रमाणशीर प्रातिनिधिकपद्धति.

Prorogue ( प्रोरोग ); तहकूब करणें, बैठकीच्या शेवटीं पार्लमेंट तहकूब करणें, ही तहकुबी राजा जाहीरनामा काढून घडवून आणतो.

Publication of debates ( पब्लिकेशन ऑफ डिबेट्स ); वादविवादाचें प्रकाशन.

Public Bill ( पब्लिक बिल ); सार्वजनिक बिल, सर्व देशाला लागू असें बिल.

Quorum ( कोरम ); अवर संख्या, सभेचें काम सुरू करण्यास व चालू ठेवण्यास अवश्य अशी हजर सभासदांची किमान संख्या.

Referendum ( रेफरेन्डम ); लोकमतपृच्छा.

Reform ( रिफॉर्म ); सुधारणा.

Register of voters ( रजिस्टर ऑफ व्होटर्स ); मतदारांची यादी.

Representative ( रेप्रिझेंटेटिव्ह ); प्रतिनिधि.

Representative Government ( रेप्रिझेंटेटिव्ह गव्हर्मेंट ); प्रातिनिधिक राज्यपद्धति.

Republic ( रिपब्लिक ); लोकसत्ताक राज्य.

Returning Officer ( रिटर्निंग ऑफिसर ); मतदारसंघाची व्यवस्था पाहणारा मुख्य अधिकारी, मतदान-व्यवस्थापक.

Revolution ( रेव्होल्यूशन ); क्रांति.

Right of Closure ( राइट ऑफ क्लोझर ); वादविवाद समाप्त करण्याचा अधिकार.

Right of veto ( राइट ऑफ व्हेटो ); अमान्यतेचा अधिकार.

Rigid ( रिजिड ); ताठर, दृढ, उत्क्रान्त्यक्षम.

Royal Prerogative ( रॉयल प्रेरॉगेटिव्ह ); राजाचे विशेष हक्क, राजाधिकार.

Rule by Force ( रूल बाय फोर्स ); लष्करी अंमल.

Rule of Law ( रूल ऑफ लॉ ); कायद्याचें राज्य.

Self-determination ( सेल्फ डिटर्मिनेशन ); स्वयंनिर्णय.

Socialism ( सोशिॲलिझम ); समाजसत्तावाद. संपत्तीच्या उत्पत्तीचीं साधनें राष्ट्रीय मालकीचीं असावीं व तिची वाटणी एकंदर जनतेच्या हितास धरून व्हावी हें मत. स्पर्धा टाकून सहकारावर समाजाच्या सर्व उद्योगाची मांडणी करावी हें मत.

Socialist ( सोशिॲलिस्ट ); समाजसत्तावादी.

Social Reform ( सोशल रिफॉर्म ); समाज-सुधारणा. ( Old age

pensions ) म्हाताऱ्यांना बैठें वेतन, ( Unemployment Insurance ) बेकारीकरितां तरतूद, ( Sickness Insurance ) आजारीपणाकरितां तरतूद, हे तीन मोठे समाजसुधारणेचे कायदे विसाव्या शतकांत घडून आले.

Sovereign ( सॉव्हरिन ); सर्वसत्ताधीश.

Sovereignty ( सॉव्हरिन्टी ); मुख्य सत्ता.

Speaker ( स्पीकर ); कॉमन्ससभेचा अध्यक्ष.

Spiritual Peers ( स्पिरिच्युअल पीअर्स ); धार्मिक उमराव, लॉर्ड्स सभेंत बसणारे आर्चबिशप व बिशप.

Standing Committee ( स्टॅंडिंग कमिटी ); कायम कमिटी, ( कॉमन्स-सभेंत अशा सहा कमिट्या असतात ).

Standing Orders ( स्टॅंडिंग ऑर्डर्स ); कॉमन्सनीं किंवा लॉर्डांनीं सभेच्या कार्यपद्धतीचे केलेले कायमचे नियम. आचार–नियम.

State ( स्टेट ); स्वतंत्र राष्ट्र राज्य.

Statute-book ( स्टॅट्यूट-बुक ); कायदेपुस्तक. विधिग्रंथ.

Summoning of Parliament ( समनिंग ऑफ पार्लमेंट ); पार्लमेंट बोलावणें.

Temporal Peers ( टेम्पोरल पीअर्स ); लौकिक उमराव, गृहस्थ-पेशाचे उमराव.

Three Estates ( थ्री एस्टेट्स ); तीन वर्ग. इंग्लिश पार्लमेंट; धार्मिक उमराव (Spiritual Peers), लौकिक उमराव ( Temporal Peers ), व सामान्यजन ( Commons ) असे तीन वर्ग तींत अन्तर्भूत होतात म्हणून इंग्लिश पार्लमेंटला हें नांव लावण्यांत येतें.

Tory (टोरी); राजाचे अधिकार कमी करूं नयेत असें म्हणणारा, पुराणमतवादी.

Trade-Union ( ट्रेड यूनिअन ); मजूर-संघ.

Unicameral ( युनिकॅमेरल ); एकसभात्मक, एकशाखी, एकदल.

Unitary ( युनिटरी ); एककेंद्र, एकपिंड, एकावयवी.

Universal Suffrage ( युनिव्हर्सल सफ्रेज ); सार्वत्रिक मताधिकार.
Unwritten Constitution ( अन्‌रिटन कॉन्स्टिटयूशन ); अलिखित घटना.
Upper House ( अपर हाउस ); लॉर्ड्‌ससभा.
Vote ( व्होट ); मत.
Vote of Censure ( व्होट ऑफ सेन्शर ); निंदाव्यंजक ठराव.
Voter ( व्होटर ); मतदार.
Whig ( व्हिग ); रक्तशून्य राज्यक्रान्तीचा वाली, उदारमतवादी.
Writ ( रिट ); निमंत्रणपत्रिका. हिचे दोन प्रकार; एक खास, व दुसरी सामान्य निमंत्रणपत्रिका ( Common Writ ).
Written Constitution ( रिटन कॉन्स्टिटयूशन ); लेखविशिष्ट घटना, घटनापत्र, लिखित घटना.

---

## परिशिष्ट ४:—हल्लींचें मंत्रिमंडळ.

१९२४ नोव्हेंबरपासून कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाची सरशी असून त्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ आहे.

१. मुख्य प्रधान, खजिन्याकडील पहिला लॉर्ड व कॉमन्ससभेचा पुढारी—स्टॅन्ल बाल्ड्‌विन
२. परराष्ट्रीय प्रधान-ऑस्टिन चेंबर्लेन.
३. लॉर्ड प्रिव्ही सील व लॉर्ड्‌ससभेचा पुढारी—मार्किस ऑफ सॉल्झबरी.
४. लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ दी कौन्सिल—अर्ल बाल्फोर.
५. लॉर्ड चॅन्सेलर—व्हायकाउंट केव्ह.
६. फडणवीस—विन्स्टन चर्चिल.
७. गृहमंत्री—जॉयसन हिक्स.
८. वसाहतमंत्री—अॅमरे.
९. युद्धमंत्री—वर्दिंग्टन इव्हॅन्स.
१०. भारतमंत्री—लॉर्ड बर्कनहेड.
११. विमान-प्रधान-सॅम्युएल होअर.
१२. आरमार-मंत्री—ब्रिजमन.
१३. व्यापारमंडळाचा अध्यक्ष-लिस्टर.
१४. कृषिप्रधान—ग्विनेस.
१५. स्कॉटिश मंत्री—गिल्मूर.
१६. आरोग्यप्रधानने्व्हिल चेंबर्लेन.
१७. शिक्षणमंडळाचा अध्यक्ष—पर्सी.
१८. मजूरप्रधान—मेटलंड.

राजाच्या खाजगी जहागिरीचा व्यवस्थापक--सेसिल.
सार्वजनिक रस्ते व इमारती या खात्यांचा मुख्य--व्हायकाउंट पील.
२१. कायदेपंडित--हॉग.
कॉमन्सचा स्पीकर--व्हिट्ले.

---

# मुख्य मुख्य मंत्र्यांचीं संक्षिप्त चरित्रें.

**१. बाल्ड्विन** स्टॅन्ले ( १८६७-     ). हा १९०८त कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षातर्फे पार्लमेंटांत निवडून आला. महायुद्ध सुरू झाल्यावर संयुक्त प्रधानमंडळ बनलें तेव्हां याचा त्यांत समावेश झाला. चढत चढत तो १९२२-त फडणवीस झाला. पुढें बोनर लॉ वारल्यावर कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाचें पुढारीपण त्याजकडे गेलें. १९२४ नोव्हेंबरपासून कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाला असून मुख्य प्रधान हें पद बाल्ड्विनला मिळालें आहे.

**२. चेंबर्लेन**, ऑस्टेन ( १८६३-     ). प्रसिद्ध वसाहत-मंत्री जोसेफ चेंबर्लेन याचा हा वडील मुलगा. हा १८९२त पार्लमेंटचा सभासद होऊन १८९५-त आरमाराकडील सिव्हिल लॉर्ड ही प्रधानमंडळांतील जागा त्यास मिळाली. पुढें १९०२ ते १९०५पर्यंत तो फडणवीस होता. त्या वर्षी कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारच्युत झाला व चेंबर्लेनची जागा गेली. पुढें महायुद्ध सुरू झाल्यावर संयुक्त प्रधानमंडळ बनलें, तेव्हां १९१५ ते १९१७पर्यंत तो भारतमंत्री होता. १९२४नोव्हेंबरपासून तो परराष्ट्रीय मंत्री या पदावर आरूढ झाला आहे. त्याच्या हातून १९२५त लोकार्नोचा तह घडून आला; त्यामुळें जर्मनीचा राष्ट्रसंघांत प्रवेश झाला आहे व युरोपची शांतता कायम टिकण्याचा संभव पुष्कळ वाढला आहे.

**३. चर्चिल**, विन्स्टन ( १८७४-     ). सर रॅन्डॉल्फ चर्चिल या प्रसिद्ध कॉन्सर्व्हेटिव्ह मुत्सद्याचा वडील मुलगा. हॅरोच्या शाळेंत सामान्य शिक्षण झाल्यावर तो सॅन्डहर्स्ट येथें लष्करी ज्ञानांत तरबेज झाला. १८९९ ते १९०२पर्यंत झालेल्या बोअर युद्धांत तो सामील झाला होता. पुढें महायुद्धाच्या वेळीं १९१६त लेफ्टनंट कर्नल या नात्यानें फ्रान्सच्या रणांगणावर त्यानें कामगिरी बजाविली. त्यानें लष्करी कामें केलीं त्याप्रमाणेंच राजकारणांतही

चांगला लौकिक मिळविला. प्रथम १९००त कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षात तो कॉमन्ससभेंत निवडून आला. पुढें जोसेफ चेंबर्लेनची टॅरिफ रिफॉर्मची कल्पना पसंत न पडल्यानें तो त्या पक्षांतून फुटला. मग १९०५त लिबरल पक्षातर्फे कॉमन्ससभेंत निवडून आला. या वेळीं हुशारीबद्दल त्याची ख्याति झाली असल्यानें त्याचा प्रधानमंडळांत सहज प्रवेश होऊन निरनिराळ्या जागा त्याला मिळत गेल्या. १९११ ते १९१५पर्यंत तो आरमार-मंत्री होता. त्या वर्षी डार्डानेल्झवरील मोहीम अयशस्वी झाल्यानें त्याला राजीनामा द्यावा लागला. १९१७त लॉइड जॉर्ज मुख्य प्रधान झाल्यावर दारूगोळ्याच्या मंत्र्याचें काम त्याजकडे आलें. १९२२पर्यंत तो संयुक्त प्रधानमंडळांत होता. पुढें दोन वर्षे त्याचा पार्लमेंटांत प्रवेश झाला नाहीं. शेवटीं आपल्या मताची उलटापालट करून तो पुनः कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षातर्फे उभा राहिला व निवडून आला. १९२४ नोव्हेंबरपासून तो फडणविसाच्या जागेवर आहे. नामांकित वक्ता व लेखक म्हणून याचा चांगला लौकिक असून त्याचीं रसाळ युद्धवर्णनें व प्रवासवृत्तें प्रसिद्ध आहेत.

**४. बर्कनहेड,** अर्ल ऑफ (१८७२- ). बर्कनहेड येथील शाळेंत शिकून यानें ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत उच्च शिक्षण घेतलें. तेथें हुशार विद्यार्थी म्हणून हा लवकरच विख्यात झाला. कायदेशास्त्राच्या परिक्षेंत १८९५त पहिला वर्ग मिळवून पुढें १९००पर्यंतचा काल त्यानें निरनिराळ्या कॉलेजांतून अध्यापनाचें काम करण्यांत घालविला. १९०६त कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षातर्फे कॉमन्ससभेंत निवडून आला व थोड्याच दिवसांत त्यानें आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर त्या सभेवर छाप पाडिली. महायुद्धाच्या वेळीं कांहीं काळ त्यानें रणांगणावर काम केलें. पुढें संयुक्तप्रधानमंडळांत त्याला निरनिराळ्या जागा मिळत गेल्या. तो १९१९-२२पर्यंत लॉर्ड हाय चॅन्सेलर होता. १९२४ नोव्हेंबरपासून तो भारतमंत्र्याच्या पदावर आहे. तो उत्कृष्ट कायदेपंडित म्हणून नांवाजला असून त्यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं आन्तरराष्ट्रीय कायद्यावरील त्याचा ग्रंथ विशेष प्रसिद्ध असून त्याच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या. त्याला अर्ल ऑफ बर्कनहेड ही पदवी १९२२त मिळाली.

दा. क्र. 3824

# शुद्धिपत्र.

**विशेष सूचनाः**—२६ पृष्ठावर तेराव्या ओळीच्या आरंभापासून सोळाव्या ओळींतील ( २ ) पर्यंत पुढील मजकूर वाचावा.

झाला आहे. आर्थिक बिलांचा उपक्रम कॉमन्ससभेंतच व्हावा ही रूढि १४०७ सालापासून पडली असून तसल्या बिलांत फेरफार करण्याचा अधिकारही लॉर्डांनीं अर्वाचीन कालांत फारसा गाजविला नाहीं. आर्थिक बिल नामंजूर करण्याचा तेवढा अधिकार लॉर्डांस असे व त्याचा त्यांनीं १८६१ व १९०५ या दोन सालीं चांगलाच उपयोग केला. पुढें १९११च्या पार्लमेंट—ॲक्टनें लॉर्डांस असलेला हा फेटाळणीचा अधिकार काढून घेतला व तेव्हांपासून राष्ट्रीय जमाखर्चाच्या बाबतींत लॉर्ड्ससभेस काडीचाही अधिकार राहिला नाहीं. त्या कायद्यानें असें ठरलें कीं, पैशासंबंधीं बिल कॉमन्सनीं पास केलें व एक महिन्याच्या आंत त्यास लॉर्ड्ससभेची मंजुरी मिळाली नाहीं तर राजसंमति मिळून तें कायदा बनावें. इतर बिलांच्या बाबतींतही १९११च्या कायद्यानें लॉर्ड्ससभेचे अधिकार पुष्कळच कमी केले. तेव्हांपासून अशी व्यवस्था झाली कीं, पैशांखेरीज इतर बिल कॉमन्ससभेनें लागोपाठ तीन बैठकींत मंजूर केलें व लॉर्डांनीं तें दर वेळीं फेटाळून लाविलें किंवा कॉमन्सना अमान्य अशा दुरुस्त्या त्यांत केल्या तरी राजसंमति मिळून कॉमन्सनीं पास केलेल्या स्वरूपांत तें कायदा बनावें. मात्र कॉमन्ससभेच्या पहिल्या बैठकींत झालेलें त्या बिलाचें दुसरें वाचन व तिसऱ्या बैठकींतील तिसरें वाचन यांजमध्यें पुरा दोन वर्षांचा काल गेला असला पाहिजे अशी मर्यादा घालण्यांत आली. आणखी पार्लमेंट—ॲक्टनें दिलेल्या या अधिकाराचा उपयोग नुक्त्याच निवडून आले[illegible] रितां यावा यासाठीं पार्लमेंटची कमाल मुद[illegible] ी ठरविण्यांत आली. तसेंच आर्थिक बिलांखेरी[illegible] सभापैकीं कोणत्याही सभेंत व्हावा अशी क[illegible] पि अलीकडील प्रत्यक्ष व्यवहार पाहतां बहुतेक [illegible] कॉमन्ससभेपुढेंच प्रथम मांडण्यांत येतात. तेव्हां उपक्रमाच्या दृष्टीनेंही हल्लीं लॉर्ड्ससभेस कॉमन्सहून दुय्यम दर्जा प्राप्त झाला आहे ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे.

REFBK-0003425

## रा. रा. गो. अ. मोडक यांचीं इतर पुस्तकें.

१. **मुलांचा महाराष्ट्र** ( आ. चौथी ):—किं. २ रुपये. पृष्ठें ६२४. शिवशाहीपासून पेशवाईअखेर मराठ्यांचा इतिहास. लेखनाची राष्ट्रीय दृष्टि. मुंबई इलाख्यांत लायब्ररया व बक्षिसें यांजकरितां मंजूर. सेंट्रल प्राव्हिन्सेस ( वऱ्हाड व नागपूर ) हायस्कूल बोर्डानें ' हायस्कूल सर्टिफिकेट ' परिक्षेस वाचनपुस्तक नेमिलें आहे.

२. **लहान मुलांचा महाराष्ट्र.** ( आ. चौथी )—किं. ४ आणे. पृष्ठें १२८. महाराष्ट्राच्या इतिहासांतील थोर व्यक्ति व महत्वाचे प्रसंग यांची माहिती. चित्रांचा समावेश. मुंबई इलाख्यांत आणि 'मध्यप्रांत व वऱ्हाड' मध्यें मराठी शाळांसाठीं क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर.

३. **लहान मुलांचा हिंदुस्थान** ( आ. दुसरी ):—किं. ६ आणे. पृष्ठें १९६. श्रीरामचंद्रापासून रणजितसिंगापर्यंत हिंदुस्थानच्या इतिहासांतील तीस विभूतींचीं चरित्रें. ऐतिहासिक संगतीस धरून रचना. इंग्रजी पहिल्या इयत्तेस क्रमिक पुस्तक म्हणून उपयोगी व मंजूर.

४. **इंग्लंडचा सोपा इतिहास** ( आ. दुसरी ):—किं. सव्वा रुपया. पृष्ठें ३२०. १४८५च्या पूर्वीचा संक्षिप्त वृत्तांत. पुढील काळचें १९१९पर्यंत जरूर तितकें विस्तृत वर्णन. मुंबई इलाख्यांत आणि ' वऱ्हाड व नागपूर ' मध्यें इंग्रजी दुय्यम शाळांतून क्रमिक पुस्तक म्हणून उपयोगी व मंजूर.

५. **इंग्लंडचा इतिहास भाग पहिला व दुसरा** (आ. दुसरी ):—किं. २। रुपये. पृष्ठें ७२०. ख्रि. पू. ५५पासून इ. स. १४८५ पर्यंतची संक्षिप्त माहिती. पुढील काळचा १९२४ पर्यंतचा सविस्तर वृत्तांत. मुंबई इलाख्यांत दुय्यम शाळा व ट्रेनिंग संस्था यांजमध्यें आणि ' वऱ्हाड व नागपूर' प्रांतांत हायस्कूलमधील नऊ, दहा व अकरा या वर्गांत क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर.

---

प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर व रा. गो. अ. मोडक यांनीं लिहिलेला

भूमितिप्रवेशः—किं. एक रुपया. मुंबई इलाख्यांत आणि 'वऱ्हाड व नागपूर ' मध्यें दुय्यम शाळांतून टेक्स्ट बुक म्हणून मंजूर.